
# पाऊलवाटा हमरस्ता होतांना

## मनरेगा अनुभव कथा



प्रगती अभियान

**प्रगती अभियान संस्था**, सातत्याने रोजगार हमी योजना - महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना या विषयी काम करत आहे. गावागावतून लोकांमधे जाऊन या कायद्यातील योजनांची अंमलबजावणी प्रभावी व्हावी यासाठी प्रयत्न करत आहे. गावात बैठका घेऊन योजनांची माहिती देणे, ज्यांना या योजनांची गरज वाटते त्यांना ते मिळवण्याचे मार्ग दाखवणे, ज्या गावात अधिक कामांची गरज लोक मांडतात तेव्हा त्या गावातील तरुण-तरुणींचे प्रशिक्षण करुन त्यांना योजना गावात आणण्यासाठी सक्षम करणे, गावातील ग्रामपंचायत सदस्य, पंचायत समिती सदस्य यांचे प्रशिक्षण करणे, ग्रामरोजगार सेवक, तांत्रिक सहाय्यक या शासनाच्या कर्मचा-यांचे प्रशिक्षण करणे असे काही उपक्रम संस्थेच्या मार्फत राबवले जातात. या सर्व उपक्रमांच्यासाठी संस्था प्रशिक्षण साहित्य तयार करते, ज्यामधे ग्राम रोजगार सेवक पुस्तिका, स्वयंसेवी संस्थांमधील कार्यकर्त्यांसाठी पुस्तिका, विविध पोस्टर्स, रेडिओ कार्यक्रम, व्हिडीओ फिती, कार्यकर्त्यांनी मांडलेल्या कथांचे पुस्तक अश्या विविध स्वरुपात साहित्य निर्माण केलेले आहे.

याचबरोबर प्रगती अभियान संस्था आपल्या व अन्य देशातील नावाजलेल्या संशोधन संस्थांच्या साथीने रोजगार हमी योजना - महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना या विषयी संशोधनात्मक अभ्यास करत आहे.

विविध स्वयंसेवी संस्थांच्या गटाच्या एकत्रित प्रयत्नातून विविध राज्य सरकारे आणि केंद्र सरकार यांच्याबरोबर संवादातून महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या धोरणात्मक सुधारणांसाठीही संस्थेने भरीव योगदान दिलेले आहे.

प्रगती अभियान संस्था रोजगार हमी योजना या विषया बरोबरच अल्पभूधारक आणि सीमान्त शेतकऱ्यांच्या उपजिवीकेची साधने आणि संसाधने यांवर काम करत आहे.

**महाराष्ट्र राज्यभरातील विविध संस्था, कार्यकर्ते, गावकरी व नरेगा मजूर यांच्या अनुभवांचे कथन कार्यकर्त्यांच्या लेखणीतून**


**संकलन व प्रकाशन : प्रगती अभियान, नाशिक**

**एप्रिल २०२२**

प्रगती अभियान

**नोंदणीकृत पत्ता :** 'उर्जस', प्लॉट नं. ७, रविकिरण कॉलनी,
चेतनानगर, नाशिक - ४२२ ००९.
फोन : ०२५३-२५००३९७

**प्रकाशन : प्रगती अभियान**

e-mail : pragati.abhiyan@gmail.com
website : www.pragatiabhiyan.org

**मुद्रक :**
**योरा प्रिंट हाऊस,**
बी-१/३, स्कायलाईन टॉवर,
रेजिमेंटल मॉल समोर, बिटको पाईंट,
नाशिकरोड - ४२२ १०१.
फोन : ०२५३-२४६२२६१, ९४२२२ ५७२९३
e-mail : rahul.yora@gmail.com

# ❊ अनुक्रमणिका ❊


| नं. | कथा व लेखक | पान नं. |
|---|---|---|
| १) | **हानपाड्याचं ओसाड रान बहरलं** – मोहन अवतार | ०५ |
| २) | **जेव्हा राज्य शासन आणि स्वयंसेवी संस्था हातात हात घालून काम करतात** – समाज प्रगती सहयोग | ०७ |
| ३) | **रोहयोचा दुहेरी फायदा: मजुरी मिळाली आणि फळबागही फुलली** – लक्ष्मीकांत जाधव | ०९ |
| ४) | **गावकऱ्यांनी साथ दिली, कामाची पोच वाढली** – संगिता जाधव | ११ |
| ५) | **अपंग व्यक्तींनाही हवी रोजगार हमी** – संगिता तुमडे, कुरखेडा | १३ |
| ६) | **घेतला नरेगाचा ध्यास, सोडला दारूचा नाद** – चंद्रकांत कुंवर | १४ |
| ७) | **आमचे रमेशभाऊ, बिनपगारी पण फुल अधिकारी!** – आनंद बांबळे | १५ |
| ८) | **आधी नियोजन, मग काम** – मोहन खाडम | १७ |
| ९) | **आणि डोंगर हिरवागार झाला** – धनाजी धोतरकर | १८ |
| १०) | **मजुरांची मागणी गावात कामाची, ते देण्याची जबाबदारी सांगा कुणाची?** – शर्मिला केदार | १९ |
| ११) | **रोजगार हमी: समज कमी – गैरसमजच जास्ती** – अक्षय आगे | २१ |
| १२) | **करोनाच्या संकटकाळात, रोजगार हमीची साथ** – केशव गभाले | २३ |
| १३) | **लोकांना समजलं: लोकांनी केलं** – पंढरी हेकडे | २५ |
| १४) | **जेव्हा पोच मिळेल, तेव्हा पेच सुटेल** – अर्चना ठोके | २६ |
| १५) | **माझ्या शिकण्याचा प्रवास: रोजगार सेवक ते रोजगार हमी सल्लागार** – गोकुळ सोनोने | २७ |
| १६) | **कोविडकाळात मिळाला रोजगार हमी आधार** – शंकर श्रावण भरडे | २९ |
| १७) | **मनरेगातून शेततळी, करी समृद्ध शेतकरी** – जीवन राठोड | ३० |
| १८) | **स्थलांतराला कंटाळलेल्या दामूला मिळाली नरेगाची साथ** – सुनिल घोडे | ३२ |
| १९) | **महिलांची एकी, रोजगार हमीच्या कामावर दाटी** – शालू कोल्हे | ३३ |
| २०) | **पूर्ण १०० दिवसांचा रोजगार मिळवणारे सितारामपेठ** – शंकर श्रावण भरडे | ३४ |
| २१) | **मासेमारी व्यवसायाला रोजगार हमीची जोड** – शंकर श्रावण भरडे | ३६ |
| २२) | **पालकांना शेतीची आणि मुलांना शाळेची गोडी लावणारा खोमारपाड्याचे शिक्षक** – केशव गभाले आणि आनंद बांबळे | ३७ |
| २३) | **दहा वर्षात कोटंबीचा कायापालट** | ३९ |
| २४) | **कोविडकाळात मनरेगाला प्राथमिकता देणारी नाशिक जिल्हा परिषद** – आश्विनी कुलकर्णी | ४१ |
| २५) | **नरेगातून ग्रामसमृध्दी सुशासनातून समृध्दीकडे** | ४३ |
| २६) | **पालकांना शेतीची आणि मुलांना शाळेची गोडी लावणारा खोमारपाड्याचे शिक्षक** – केशव आणि आनंद | ४७ |
| २७) | **दहा वर्षात कोटंबीचा कायापालट** | ४९ |


प्रगती अभियान

# प्रस्तावना

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायद्याच्या अंतर्गत विविध योजना राबविल्या जातात, त्यांची आकडेवारी मिळते आणि संपूर्ण भारतातील प्रत्येक गावातील प्रत्येक मजूर कुटुंबाची माहिती मिळते. यामुळे आपल्याला महाराष्ट्रातील कामकाजाची तुलना संपूर्ण भारताच्या सरासरी बघून समजते, इतर राज्यांशी तुलना करता येते आणि महाराष्ट्रातील कामाचा वर्षागणीक आलेख मांडता येतो.

संपूर्ण भारतात साधारण साठ-सत्तर हजार कोटी रुपये वर्षाला खर्च होत असताना, मागील दोन वर्षांत कोरोना महामारीच्या संकट काळात यामध्ये एक लाख कोटीच्या वर वार्षिक खर्च झालेला आहे. सध्या आर्थिक उलाढाल कमी होऊन अर्थव्यवस्था कठीण काळात असताना मनरेगाचे महत्त्व अधिकच वाढलेले आहे हे सर्वच जाणून आहेत.

महाराष्ट्रात जवळजवळ साठ लाख मजूर मनरेगा रोजगार हमी योजनेच्या कामावर असतात. महाराष्ट्रात अठराशे ते चोवीसशे कोटी रुपये असा मागील काही वर्षातील वार्षिक खर्च आहे. पूर्वी पेक्षा जास्त गावातून काम होत आहे (फक्त हजारच्या आसपास ग्रामपंचायतीतून कामे होतांना दिसत नाही), जास्त कुटुंबं कामावर येत आहेत (पंधरा ते वीस लाख कुटुंबं), परंतु प्रत्येक कुटुंबास मिळणारे काम कमी होत आहे. हे प्रमाण प्रती कुटुंब, दर वर्षी सत्तेचाळीस दिवस सरासरी वरून चाळीसवर आलेले आहे.

मनरेगातून घरकूल, शोषखड्डे अशी काही कामे आपसुक काढली जातात; पण जेव्हा पाणलोट विकासासाठीची कामे काढायची असतात; जेव्हा मृदसंधारण वृक्षलागवडीची कामे मोठ्या प्रमाणावर करायची असतात; जेव्हा गावात पाणीसाठवण क्षमता वाढवण्यासाठी कामे हवी असतात तेव्हा ग्रामपंचायत, पंचायतसमिती, तेथील प्रशिक्षित मनुष्यबळ हेच गावाचा कायापालट करताना दिसतात. गावातील विविध घटक सक्रिय होऊन मनरेगा गावाच्या विकासासाठी राबवतानाची उदाहरणे पुष्कळ आहेत.

महाराष्ट्रातील बहुतांशी शेतकरी कुटुंबेही सीमान्त शेतकरी, कोरडवाहू शेती करणारे शेतकरी आहेत. ते जसे शेतकरी आहेत तसेच ते शेत मजूरही आहेत. म्हणून त्यांच्या शेतातील सपाटीकरण, बांधबंदिस्ती, फळबाग, शेततळे, बांबू लागवड, विहीर,या आणि अशा व्यक्तीगत लाभाच्या योजनेतून त्यांचे उपजीविकेचे साधन अधिक फलदायी करता येऊ शकते.

शेती बरोबरच कुक्कुटपालन, शेळीपालन वा मत्स्यव्यवसाय करणारे किंवा ज्यांना सेंद्रिय खते तयार करायचे आहे, अशांनाही व्यक्तिगत योजनांचा लाभ घेऊन आपल्या कमाईत वाढ करण्याच्या संधी मिळवता येऊ शकते.

मनरेगा-रोहयोतून संपूर्ण गावाच्या विकासासाठी सोयी-सुविधा उपलब्ध होऊ शकतात हे आज अनेक अभ्यासातून सिद्ध झालेले आहे.

पण गावात मनरेगा राबवताना येणाऱ्या अडचणी कमी नाहीत. गावकऱ्यांना योजनेच्या सर्व तरतुदी माहीत नाहीत ही जशी अडचण आहे, तशी काही ठिकाणी, काही वेळेला शासनाची राबवण्याची तयारी कमी पडते ही अडचणीही सातत्याने अनुभवायला मिळते. अशा अनुभवांच्या देवाण-घेवाणीतूनच हे पुस्तक आकाराला आले आहे. लाख-कोटींच्या आकडेवारीच्या मागील हे चेहरे आहेत. हे चेहरे संस्थांमधील कार्यकर्त्यांच्या प्रवासातील निराशा आणि वैताग या बरोबरच उत्साह आणि समाधान या दोन्हीचे दर्शन त्यांनीच लिहीलेल्या अनुभवऱ्यातून घडवतात.

बुद्धपौर्णिमा २०२२

**अश्विनी कुलकर्णी**

# पुस्तिकेविषयी

आडवाटेची पाऊलवाट होते अन पाऊलवाटेचा हमरस्ता. हे पुस्तक जितके मनरेगा नामक हमरस्त्याचे आहे, तितकेच तो घडवण्यात हात असलेल्या, आडवाट चालून चालून त्याची पायवाट केलेल्या कार्यकर्त्यांचे आहे.

ज्या कार्यकर्त्यांनी कागदावरची नरेगा गावागावांपर्यंत, गावातल्या गरजू मजुरांपर्यंत नेली, त्यांनी लिहिलेल्या या अनुभवकथा आहेत.

काम करणाऱ्यांनी लिहिते झाले पाहिजे, हा प्रगती अभियानचा सुरुवाती पासून आग्रह राहिलेला आहे. कारण प्रत्यक्ष लोकांसोबत काम करणारी व्यक्ती सगळ्या गोष्टी जितक्या जवळून आणि बारकाईने बघते तितके बाकी कोणीच बघत नाही. खरंतर कार्यकर्त्यांनाही लिहावेसे वाटते, पण कधी त्यांच्याकडे लिहिण्याची उसंत नसते, कधी लिहून काही सांगण्याची सवय नसते. या अडचणी लक्षात घेऊन प्रगती अभियानने लेखन कार्यशाळा घेतली. ज्याला आम्ही "Write-shop" असे म्हटले. कार्यशाळा, शिबिरांना "Work-shop" म्हणतो, तसेच हे दोन दिवसांचे 'राईट शॉप' मार्च २०२२ च्या पहिल्या आठवड्यात पार पडले. या दोन दिवसात सहभागींनी केवळ लेखन केले. कामातले त्यांना जिव्हाळ्याचे वाटलेले प्रसंग, घटना निवडल्या, त्यावर लेखन केले, ते इतरांना वाचून दाखवले, त्यांचा फिडबॅक घेऊन सुधारणा केल्या, पुन्हा लेखन केले. या लेखन-वाचन-फिडबॅक प्रक्रियेतून त्यांनी आपल्या अनुभव कथांना आकार दिला. नरेगासंबंधीच्या सर्व कथा संपादित करून, त्यात आवश्यक माहितीची भर घालून त्यांना अंतिम रूप दिले आणि त्यांचेच संकलन या पुस्तकात केले आहे.

कार्यकर्त्यांनी त्यांचे अनुभव सांगितले पाहिजेत, लिहिले पाहिजेत, असे आम्हाला का वाटते ? याची तीन मुख्य कारणे आहेत.

पहिले कारण, आसपास नरेगाला पोषक परिस्थिती नाही, कारण याची नीट माहितीच लोकांमध्ये नाही. तरीही चिकाटीने आणि जिद्दीने काम करण्याचे आव्हान कार्यकर्ते पेलत आहेत, त्यांचे हे प्रयत्न समोर येणे आवश्यक आहे, म्हणून लिहिले पाहिजे.

रोहयोचे बीज फार पूर्वी महाराष्ट्रातच रोवले गेले. नंतर कायदा होऊन देशभर मनरेगा अस्तित्वात आली. गावातल्या गावात रोजगार आणि गावविकासाचे साधन होण्याची क्षमता-ही मनरेगाची सामर्थ्ये आहेत. अशा सामर्थ्यशाली मनरेगाचा प्रवास मात्र तितक्याच खाचखळग्यांनी भरलेला आहे. कदाचित मनरेगा ही अशी एक मात्र शासकीय योजना असेल जिच्याबाबतीत सगळेच उदासीन आहेत. ज्यांच्यासाठी ही योजना आहे ते मजूर व शेतकरी, आणि ज्यांनी योजना राबवायची ती खालपासून वरपर्यंतची यंत्रणाही. याची अनेक, वेगवेगळी कारणे असतील, पण नकारात्मकता सार्वत्रिक आहे. लोकांच्या मनातली उदासिनता, नकारात्मकता दूर करण्यापासून होणारी कार्यकर्त्यांच्या कामाची सुरुवात आणि त्यानंतरचे काम सुरू होण्याचे व त्यानंतरचे तितकेच एकेक अवघड टप्पे. ही अवघड वाट केवळ आणि केवळ कार्यकर्त्यांच्या प्रयत्नातून सुकर होते, म्हणून त्यांचे प्रयत्न समोर येणे गरजेचे आहे.

दुसरे कारण, आपण केलेल्या कामाकडे आपण पुन्हा वळून पाहणे आवश्यक असते, त्यातून आपल्याला शिकता येते, म्हणून लिहिले पाहिजे. एखादे काम सुरू होताना कार्यकर्त्यांना प्रशिक्षण दिले जाते. प्रशिक्षणातून महत्त्वाची माहिती मिळते. मात्र त्या माहितीचा जेव्हा आपण वापर करतो तेव्हाच माहिती आपल्याला खऱ्या अर्थाने समजायला लागते. आपल्या कामाच्या या अनुभवातून माहितीचे ज्ञानात रूपांतर होते. बऱ्याचदा कामाच्या भाऊगर्दीत आपण काम करत जातो, अनुभव येतात, पण त्या अनुभवातून शिकायचे राहून जाते. आपल्या कामातून शिकणे, काय केल्याने फायदा झाला, काय गोष्टी कामी आल्या, काय आल्या नाहीत, कोणत्या गोष्टी करायचे राहून गेले हे व असे प्रश्न स्वत:ला विचारणे, त्यांची उत्तरे शोधणे यातून आपली समज वाढते. नव्या गोष्टी लक्षात येतात. लिहिण्यातून या स्व-शिक्षणाला मदत मिळते.

तिसरे कारण, आपण जसे इतरांच्या कामातून शिकतो, प्रेरणा घेतो. तसेच आपले काम, आपले अनुभव इतरांसाठी प्रेरणादायी ठरू शकतात. आपल्या कामाची ताकद त्यातून वाढते. म्हणूनही कार्यकर्त्यांनी लिहिले पाहिजे.

या पुस्तकात समाविष्ट असलेल्या अनुभवकथा मनरेगाचे जे चित्र पुढे आणतात ते महत्त्वाचे आहे.

- त्यातील काही तीन-चार वर्षे किंवा त्याहून अधिककाळ मनरेगाचे काम ज्या गावात झालेत्या विषयीच्या आहेत. जिथे मजुरांना नियमित कामे मिळाली, शेतात जलसंधारणाची कामे झाल्याने शेतीचे उत्पादन वाढले, गावातील संसाधने संपन्न व्हायला मदत झाली. केवळ काही वर्षांच्या नियोजनबद्ध प्रयत्नातून कितीतरी मोठे बदल साधले गेले हे वास्तव या कथा पुढे आणतात.
- जेव्हा तालुका व जिल्हा प्रशासन विशेषत: प्रशासकीय अधिकारी, रोजगार हमीचे महत्व ओळखून कामाच्या आखणीला महत्व देतात, तेव्हा या योजनेची प्रभावी अंमलबजावणी शक्य होते. लोकांना रोजगार मिळतो आणि लोकोपयोगी कामंही भरपूर प्रमाणात होतात. हे वास्तव दर्शवणाऱ्या कथाही यामध्ये आहेत.
- बाकी बहुतांश कथा पहिल्या एक-दोन वर्षात मनरेगा गावात रुजवताना काय अडचणी, अनुभव आल्या त्याविषयीच्या आहेत. कार्यकर्ते व लोकांनी केलेल्या पाठपुराव्याने प्रशासनाला त्यांची मागणी पूर्ण करणे भाग पडले हे यांतून दिसते. मनरेगासाठी पूर्व-नियोजनाची गरज असल्याचे यांतून पुढे येते.
- कोविडकाळात गावात अडकून पडलेल्या हजारो मजुरांना मनरेगामुळे आधार मिळाला आणि ही कामे निघण्यासाठीही कार्यकर्त्यांनी पाठपुरावा केल्याचे अनुभव या कथांतून समोर येतात.
- मनरेगा लोकांपर्यंत नेण्यातील कामाचे अनेक बारकावे या कथा टिपतात: गावात गरजू कुटुंबे कशी ओळखायची, मजुरांच्या अडचणींचा पाठपुरावा कसा करायचा, कामांचे नियोजन व आराखडा कसा करायचा, कधी संघर्षात्मक तर कशी लवचीकतेचे धोरण कसे ठेवायचे, वेळप्रसंगी स्थानिक स्वयंसेवी संस्थेची व अन्य कोणाची मदत कशी घ्यायची, अधिकाऱ्यांबरोबर मुद्देसूद संवाद कसा साधायचा. या व अशा गोष्टी केवळ अनुभवातूनच समजू शकतात.

गडचिरोली सारख्या जिल्ह्यात अपंगांना मनरेगात सामावून घेण्याचे प्रयत्न होत आहेत, तर बाकी ठिकाणी छोटे शेतकरी, भूमीहीन मजूर, एकल महिला, परिघाबाहेरील समुदायांना नरेगातून सन्मानाने जगण्याचे साधन भेटत आहे. अगदी छोटेसे शेततळेदेखील एका अल्प भूधारक शेतकऱ्याचे जगणे सुकर करते, कारण त्याच्या शेतात पाणी आल्यावर तो एकाऐवजी दोन पिकं घेऊन उत्पन्न वाढवतो; एक असं गाव जिथं पाणी नाही म्हणून गावातल्या लग्नाळू मुलांची लग्नं खोळंबत होती, ते काही वर्षे नरेगाच्या शिस्तबद्ध अंमलबजावणीने जलमय व रोजगार संपन्न झाले; या बदलांपासून ते नरेगाच्या कामातील बारीक सारीक तपशील आपल्यापर्यंत आणणाऱ्या या अनुभवकथा आहेत. नरेगाचे सच्चेपण, त्याची ताकद समजण्यासही पुस्तिका मदत करेल असे मनापासून वाटते.

**– विद्या कुलकर्णी**

# १) हानपाड्याचं ओसाड रान बहरलं

**मोहन अवतार**

'रोहयोच्या कामाला जाऊया रं! पण पैसा मिळंल का?' हा लोकांचा पहिला प्रश्न. हा प्रश्न मी गेल्या काही वर्षात खूपदा ऐकलय. माझ्या गावातल्या मजुरांनीच मला हा प्रश्न पहिल्यांदा विचारला. 'केलेल्या कामाचं पैसं नाही मिळालं, तर तू देशील का?' हा दुसरा प्रश्नही विचारला. मी म्हटल 'हो, देईन.' ही घटना आहे २०१२ ची. मी नुकतंच प्रगती अभियानचं रोहयोचं ट्रेनिंग घेऊन गावी आलो होतो. शिकलेलं प्रत्यक्षात आणायची माझी परीक्षा तेव्हा सुरू झाली. ही परीक्षा मी उत्तम पास झालो, ज्यानं माझ्या गावाचं रूप पालटलं. त्याचीच ही गोष्ट.

मी मोहन अवतार, नाशिक जिल्ह्याच्या त्र्यंबकेश्वर तालुक्यातलं हानपाडा हे माझं गाव. या गावात सर्व आदिवासी घरे आहेत. गावात एकूण बारा पाडे आहेत. पूर्वीपासून पाण्याची टंचाई. एप्रिल-मे महिन्यात तर पाण्याची समस्या आणखीच वाढायची. सर्व वाड्यांवर दोनतीन दिवसातून एकदा टँकरने पाणी पुरवठा नेमानं लागायचा. एरवी रात्रंदिवस करुन हंडाभर पाण्यासाठी सकाळपासून नंबर लावायचा, तेव्हा हंडाभर पिण्याचं पाणी मिळायचं. गावात लोक मुलीही द्यायला तयार नसायचे. साऱ्या तालुक्यात आटणकाळ म्हणून गावाची ओळख!

२०१२ मध्ये गावात प्रगती अभियानची टीम आली. गावात नरेगातून काम मिळू शकेल. नीट कामं केली तर पाण्याची समस्या दूर होऊ शकेल, असं त्यांनी सांगितलं. गाव कार्यकर्ता म्हणून लोकांनी माझं नाव पुढं केलं. नाशिकला प्रशिक्षणाला जाऊन रोजगार हमी शिकून आलो.

त्यावेळी शेतीची सगळी कामं पूर्ण झाली होती. गावात पैसे मिळतील असं दुसरं कुठलंच काम नव्हतं. आपण रोजगार हमीतून काम काढूया मी लोकांना म्हटलं. गाव मीटींग घेऊन काम कसं मिळवायचं हे त्यांना समजावलं. लोकांचा विश्वास बसला तेव्हा ते काम मागायला तयार झाले. सुरुवातीला एकूण ८५ मजुरांनी कामाचा अर्ज भरला. ग्रामसेवकाला भेटून अर्ज दिले आणि पोच घेतली. पंधरा दिवस होऊन गेले तरी काम सुरू होईना. ग्रामसेवक टाळाटाळ करू लागला. मजुरांनाही कामाची गरज होती. मग मी बेकार भत्याचा अर्ज भरला आणि ग्रामसेवकाला म्हणालो 'आम्ही हा अर्ज तालुक्याला द्यायला चाललोय'. कायद्याला घाबरुन ग्रामसेवकानं लगेच काम काढलं. तालुक्याला जाऊन शेततळ्याच एस्टीमेट तयार करुन दुसऱ्या दिवशी शेततळ्याचं काम सुरू करतो असा शब्द दिला.




मजूर मोठया उत्साहाने कामाला लागले. एक हफ्त्याचे काम झालं. केलेल्या कामाचा दाम किती झाला हे अजून माहिती झालं नव्हतं. मोजमाप झालं तेव्हा मजुरांनी तांत्रिक सहाय्यकांना 'किती रोज पडला?' म्हणून विचारलं. रू १३८ रोज पडला. २०१२ मध्ये हा दर मजुरांना समाधानकारक वाटला. प्रत्येकाला दोन हफ्त्याची एकूण १९३६ रुपये मजुरी मिळाली. हे समजल्यावर मजुरांमध्ये कामाची उत्सुकता वाढली. सलग काम करुन एका पाठोपाठ पाच शेततळ्यावर मजुरांनी त्यावर्षी काम केलं.

मी कामासाठी सरपंच आणि ग्रामसेवकांकडे सतत पाठपुरावा करायचो, शेवटी वैतागून त्यांनी माझीच ग्राम रोजगार सेवक म्हणून नियुक्ती केली. हे माझ्यासाठी चांगलंच झालं. मी आता रोहयोसाठी हक्कानं पुढाकार घेऊ शकलो. पहिल्या वर्षीच्या शेततळ्यांचा अनुभव खूप चांगला होता. पावसाळ्यात त्यांत मोठया प्रमाणात पाणी साठलं. त्या वर्षी पाण्याच्या पातळीत वाढ झाली आणि मे महिन्यात बसणाऱ्या टंचाईची झळ थोडी कमी जाणवली.

मग दरवर्षी आम्ही मोठया प्रमाणार पाणी अडवा, पाणी जिरवा यांवर कामं काढू लागलो. शेततळी बांधणं, दगडी बांध बांधणं, तळ्यातला गाळ काढणं ही कामं नियमित व्हायला लागली. ज्या गंगाराम लासू जाधव यांच्या शेतात शेततळं झालं त्यांना तर मोठया प्रमाणात फायदा झाला. डोंगरापाशी उतारावर शेतजमीन होती, जेव्हा शेततळ झालं तेव्हा वाहणारं संपूर्ण पाणी अडवून ज्या ठिकाणी जाईल अशी जागा निवडून शेततळं बांधलं. आता पावसाळ्यात भात, नागली, उडीद याबरोबरच उन्हाळी पिकही घेता येऊ लागली. शेततळं बांधलेल्या इतर शेतकऱ्यांनापण असाच फायदा झाला. माझ्याही शेतात मी शेततळं बांधलं. ओसाड पडलेल्या माळरानावर आता आंबा, काजू अशा झाडांची लागवड केली. त्यातून थोडंफार उत्पन्न पैसे मिळू लागलं. आता बऱ्याच शेतकऱ्यांची शेतातली कामं वाढली, त्यामुळं ते शेतातंच घर बांधून राहायला लागले. मीही शेतात घर केलं.

२०१२ पासून आता दरवर्षी आम्ही मनरेगातून वेगवेगळी कामं करतो. हे काम इथल्या मजुरांच्या सवयीचं झालं आहे. गावातल्या संसाधनांचा शाश्वत विकास होऊन गावालाच फायदा मिळाला. मजुराला काम मिळतं, शेतकऱ्याला फायदा होतो. कामासाठी बाहेर जायची वणवण थांबली, शेती फुलली. गावातली पाणी टंचाईही कायमची दूर झाली. दरवर्षी रोहयोतून जलसंधारणाची कामं करून पाच-सहा वर्षात पाण्याची समस्या हटवली. हानपाडाची एक नवी ओळख आम्ही तयार केली.

आमच्या गावातल्या अंगणवाडी सेविकाही या कामामुळे खुश झाल्या आहेत. एकदा मला भेटून त्यांनी सांगितलं, 'गावात रोजगार हमीची कामं मिळाल्यामुळं कुपोषण कमी झालंय!' मला आश्चर्य वाटलं. तेव्हा त्या म्हणाल्या, 'पावसाळ्यात मुलं कुपोषित होतात, मग आम्ही खूप मेहनत घेऊन त्यांना त्यातुन बाहेर काढतो, बालक सुदृढ करतो. पण पावसाळ्यानंतर हीच बाळं पुन्हा आईवडिलांच्या बरोबर कामासाठी स्थलातरं करतात आणि तिथं तर त्यांची आबाळ होते. म्हणून परत येतात तेव्हा त्यांची नावं परत कुपोषित मुलांच्या यादीत येतात. दर वर्षी हाच अनुभव यायचा. पण स्थलांतर कमी झालं आणि कुपोषित मुलांचं प्रमाणही कमी झालं आहे.' अंगणवाडी ताईनी नरेगाला दिलेली ही केवढी मोठी पावती आहे!



# २) जेव्हा राज्य शासन आणि स्वयंसेवी संस्था हातात हात घालून काम करतात

## समाज प्रगती सहयोग

समाज प्रगती सहयोग (एसपीएस) ही मध्य प्रदेशातील स्वयंसेवा संस्था आहे. तिथल्या देवास जिल्ह्यातल्या बागली तालुक्यातील एका दुर्गम आदिवासी खेड्यात वसलेल्या या संस्थेचे काम मात्र राज्यभर आणि राज्याबाहेरही पसरलेले आहे. लोकांना सक्षम करणे, संघटित करणे हे या संस्थेचे मुख्य काम आणि त्यामध्ये त्यांनी नरेगाचा खूप चांगला वापर करुन घेतला आहे. लोकांपर्यत माहिती नेण्याबरोबरच यंत्रणेचा क्षमता विकास करून नरेगाच्या प्रभावी अंमलबजावणीचे काम केले आहे. मध्य प्रदेशातील या संस्थेने महाराष्ट्रातील नरेगाच्या कामातही महत्त्वाचे योगदान केले आहे.

जेव्हा एखादा कायदा होतो, योजना येते तेव्हा त्याच्या चोख अंमलबजावणीसाठीची यंत्रणाही उभारावी लागते. मनरेगाचा प्रवासही अशा टप्प्यातून झालेला आहे. २०११ मध्ये महाराष्ट्र नरेगा केडर उभारले गेले, म्हणजे नरेगासाठी आवश्यक रोजगार सेवक व तांत्रिक सहाय्यक ही पदे निर्माण झाली. नव्याने नेमलेल्या लोकांना त्यांच्या जबाबदाऱ्या निभावण्यासाठी प्रशिक्षणाची गरज होती. तत्कालिन नरेगा सचिवांनी या कामासाठी समाज प्रगती सहयोगचे सहकार्य मागितले आणि संस्थेने ते मान्यही केले.

२०११-१२ पासून या कामाची सुरुवात झाली. नरेगा केडर म्हणजे मुख्यत: रोजगार सेवक, तांत्रिक सहाय्यक आणि ग्रामसेवक यांना प्रशिक्षण देण्याची जबाबदारी संस्थेने स्वीकारली. नरेगातून जी कामे होतात त्यांचा तांत्रिक दर्जा चांगला करण्यासाठी आणि अंमलबजावणी सुरळीत करण्यासाठी केडर सज्ज करणे हे या प्रशिक्षणाचे हेतू होते. विदर्भातल्या अमरावती जिल्ह्यातला मागास व कुपोषित परिसर म्हणून ओळखला जाणारा मेळघाटमधले चिखलदरा व धारणी हे दोन तालुके या प्रशिक्षणासाठी निवडण्यात आले. जर दळणवळण, लाईट इत्यादी सुविधा व अन्य बाबतीत अत्यंत प्रतिकूल परिस्थिती असलेल्या या भागांमध्ये नरेगा राबवण्याचे प्रशिक्षण यशस्वी झाले तर ते इतरही होऊ शकले असते, ही या निवडीमागील धारणा होती.



प्रशिक्षणाच्या पूर्वतयारीचा भाव म्हणून एसपीएसने धारणीमध्ये याआधी झालेल्या नरेगाच्या कामांची पाहणी केली. जलसंधारणाची अनेक कामे झाली होती, त्यातून मजुरांना रोजगारही मिळलेला होता. मात्र जलसंधारणाची परिस्थिती फारशी सुधारलेली नव्हती. याचे कारण झालेली कामे तांत्रिकदृष्ट्या परिपूर्ण नव्हती वा सदोष होती. उदाहरणार्थ, आवश्यकतेपेक्षा अधिक उतार असलेल्या जमिनींवर सीसीटी तयार केले होते, ज्यामुळे माती वाहून जाण्याला अटकाव होण्याऐवजी गती मिळत होती; शेततळी मोठया प्रमाणावर बांधली होती, पण त्या त्या परिसराची गरज न पाहता सगळीकडे समान आकाराची तळी केली होती (१५मी x १५मी x ३मी किंवा २०मी x २०मी x३मी) आणि काही ठिकाणी तर मुरमाड जमिनीवर तळी केल्याने पाणी थांबत नव्हते व अपेक्षित लाभ मिळत नव्हता; दगडीबांध, सिमेंट बंधारे (चेक डॅम) सारखी एकाच प्रकारची कामे करण्यात आली होती.

केलेल्या कामातील त्रुटी अभ्यासून त्या टाळण्यासाठी तांत्रिक समज विकसित करण्याचे काम एसपीएसने प्रशिक्षणातून केले. जल संधारण आणि मृदा संधारणाच्या कामांवर भर देण्यात आला. या प्रशिक्षणामध्ये जल-मृदा संधारणाची पायाभूत तत्वे समजून देण्यात आली. सर्वेक्षण पद्धती आणि प्रभावी अंमलबजावणीच्या उपाययोजना यांचाही समावेश केला. कामाची जागा अचूक निवडणे, स्थानिक मालाचा वापर करून बांधकाम, मातीची धूप आणि पाण्याचा प्रवाह रोखण्यासाठीच्या विविध उपाययोजना यांचे प्रशिक्षण तांत्रिक सल्लागारांना देण्यात आले. रोजगार सेवक व ग्रामसेवकांना इतर विभागांशी समन्वय साधण्याबरोबरच गावपातळीवरील तयारीचे प्रशिक्षण देण्यात आले. कामाची मागणी व नोंदणी वाढवण्यासाठी जाणीवजागृती, 'रोजगार दिवस' व 'काम मांगो अभियान' यासारख्या उपक्रमांचे आयोजन, पंचायत लोकप्रतिनिधी व महिला बचत गटांना गाव आराखड्यासाठी मदत करणे, ग्रामसभेने कामाचे अग्रक्रम ठरवून मंजूर करणे, त्याचे अंदाजपत्रक तयार करणे या व अशा प्रत्येक टप्प्याची चोख तयारी करून घेण्यात आली. प्रशिक्षणानंतर प्रत्यक्ष फिल्डवरील कामात सहाय्य करण्यात आले. २०१२ पासून एसपीएस ने दिलेले हे सहकार्य आजतागायत चालू आहे, ज्यामुळे नरेगाची प्रभावी अंमलबजावणी व्हायला मदत झाली. जल व मृदा संधारणाची वेगवेगळ्या प्रकारची आणि तांत्रिकदृष्ट्या सरस कामे उभारली गेली.

नरेगा विषयातील तज्ज्ञ स्वयंसेवी संस्था आणि राज्य शासन यांच्यातील यशस्वी भागीदारीचे हे उत्तम उदाहरण आहे. नरेगा म्हणजे अकुशल मजुरांना रोजगार देणारी योजना, पण या अकुशल कामगारांकडून करून घ्यायच्या कामांचे नियोजन, आखणी कुशलतेने व योग्य तांत्रिक ज्ञानावर आधारित असली पाहिजे, हे एसपीएसच्या कामातून जसे लक्षात येते. तसेच योजनेच्या अंमलबजावणीसाठी संबंधित जबाबदार यंत्रणेला प्रशिक्षण देण्याचे आणि प्रशिक्षणानंतरही सहाय्य करण्याचे महत्त्वही समजून येते.

आज २०२२ या अर्थिक खर्चाचा लेखा जोखा पाहिला असता असे दिसते की एकटया अमरावती जिल्हयाने २५१ कोटी रुपये वार्षिक खर्च केलेला आहे. इतका मोठा खर्च जेव्हा ग्रामीण संसाधन निर्मितीवर होतो तेव्हा खूप शाश्वत विकास कामे होतात. हे चित्र पाहून इतर जिल्हे ही कामाला लागले आहे.



# ३) रोहयोचा दुहेरी फायदा: मजुरी मिळाली आणि फळबागही फुलली

**लक्ष्मीकांत जाधव**

महाराष्ट्र आणि गुजरात या दोन राज्यांच्या सीमेवरच्या सापुतारा या थंड हवेच्या ठिकाणाहून अगदी जवळ असलेला सुरगाणा तालुका. नाशिक जिल्ह्यामधील आदिवासी लोकसंख्या जास्त असलेल्या तालुक्यांपैकीच हा पण एक तालुका. टिपिकल आदिवासी भागासारखा डोंगराळ दऱ्याखोऱ्या असणारा उंच सखल भाग सुरगाणा तालुक्यात आढळतो. अती पावसाच्या प्रदेश असूनही जानेवारीपासूनच पाणी टंचाई जाणवायला सुरुवात होते. इथले लोक पावसाळ्यातला शेतीचा कामाचा सीजन वगळता नेहमीच स्थलांतर करताना आढळतात.

आजकाल या भागात एखाद्या गावात आपण गेलो तर रोहयोची मजुरी आणि रोहयोची फळबाग अशी लोकांत चर्चा रंगलेली आढळून येते. याला कारण विनायक भडांगे या ऐन पंचविशीतील तरुणाने सुरू केलेला अभिनव प्रयत्न. त्याने रोहयोचा उपयोग करून फळबाग लागवड केली. साधारणत: २०१९ च्या एप्रिल महिन्यात सुरगाणा तालुक्यातील बार्हे या बाजारपेठेच्या गावाजवळील १० ग्रामपंचायतीमध्ये विनायक भडांगे या कार्यकर्त्याच्या मदतीने नरेगाची माहिती देणे व नेहमीच हंगामी स्थलांतरीत आदिवासींनी काम मिळवून देण्याचे प्राथमिक उद्दिष्ट ठेवून काम सुरू केले. सुरुवातीला नाशिकच्या प्रशिक्षणात सहभागी होऊन विनायकने समजून घेतली. रोहयोमधून कोणकोणती कामं होऊ शकतात हे त्याला समजले. यातून फळबाग लागवडही होऊ शकते हे त्याच्या लक्षात आले. आपल्या भागात फळबागेला पोषक वातावरण आहे आणि जवळच गुजरातमधली धरमपूरची बाजारपेठसुध्दा आहे हे त्याला माहित होते. मग काय? विनायकने गावात बैठका घेण्याचा व रोहयोची माहिती देण्याचा सपाटाच लावला. सुरुवातीच्या गाव बैठकांमध्ये त्याच्या लक्षात आले लोकांना रोहयोमध्ये काम मागणी करावी लागते हेच माहिती नाही. लोकांना एवढेच माहिती होते कि रोजगार हमीचे काम म्हणजे जंगलात खड्डे काढणे किंवा गावातील एखादा दुसरा तलावातला गाळ काढणे. ग्रामपंचायत आणि रोजगार सेवक हे मजुरांना म्हणजे गावातील लोकांना खूप सारी मदत करू शकतात, पण हे त्या मजुरांना आणि रोजगार सेवकाला तसेच अगदी सरपंचाना सुध्दा माहिती नव्हते.



विनायकने गावबैठकांमध्ये लोकांनाच प्रश्न विचारण्यास सुरुवात केली. जंगलात झाडे लावता तशी तुमच्या शेतात लावता येतील का? कोणती झाडे लावायला तुम्हाला आवडेल? सुरुवातीला लोकांनी विचारले कि तुम्ही आम्हाला फळबाग लावून द्याल का? सरकारकडून कशी मिळणार आम्हाला फळबाग? मग आतापर्यंत आम्हाला का नाही दिली फळबाग? अश्या सगळ्या प्रश्नानी लोकांनी विनायकाला भंडावून सोडले. विनायकने मग रोजगार सेवकाना मदतीला घेऊन तालुक्यातील कृषी अधिकाऱ्याबरोबर संयुक्त बैठका घ्यायला सुरुवात केली. सुरुवातीला कृषी अधिकाऱ्यांनी बैठकीला येण्यास टाळाटाळ केली. पण विनायकने मी तुम्हाला इतर कामात पण मदत करेल या बोलीवर कृषीच्या अधिकाऱ्यांना गाव बैठकांना येण्यास भाग पाडलेच. या गावबैठकांमध्ये विनायकने लोकांना फळबागेचे महत्त्व, फायदे, लागवड व निगा राखणे याविषयी माहिती द्यायला सुरुवात केली. लोकांनाही माहिती आवडायला लागली. लोकांनी मग फळबागा लावण्याविषयी माहिती विचारायला सुरुवात केली की आम्हाला फळबाग लावायची आहे आम्ही काय करू? विनायकने रोजगार हमी योजनेतून फळाबाग लागवड होऊ शकते हे सांगितले. संपूर्ण ऑगस्ट महिनाभर विनायक फळबाग लागवड करू इच्छिणाऱ्या १० गावातल्या शेतकऱ्यांची माहिती गोळा करत होता. त्यासाठी लागणाऱ्या कागदपत्रांची माहिती देत होता. २०१९ च्या ऑक्टोबर महिन्यात विनायकने १० ग्रामपंचायतींमधून रोहयो अंतर्गत फळबाग लागवडीसाठीचे आणि इतरही कामांचे मागणी अर्ज नियोजन आराखडा बनविण्यासाठी ग्रामसेवकांकडे सुपूर्द केले. यामध्ये ७२ शेतकऱ्यांनी फळबाग लागवडीसाठी मागणी केली होती.

मार्च २०२० मध्ये कोविडमुळे रोहयोची कामे थोडी विलंबाने सुरू झाली. पण कोविड नियमावलीमुळे रोहयो मजुरांना शक्यतो त्यांच्या शेतावर काम देण्यात यावे हा शासन निर्णय झाला. त्यामुळे या १० ग्रामपंचायतींच्या क्षेत्रात रोहयोअंतर्गत फळबाग लागवड हा कार्यक्रम सन २०२०-२१ या आर्थिक वर्षाच्या सुरुवातीला हाती घेण्यात आला. यावेळी बेडसे (५), कोटंबी (६), वाघनाखी (६), मास्तेमान (४), म्हैसमाळ (२), शिरीषपाडा (२), सांबरखल (३), बिजुरपाडा (३), आणि रोंगाणे (१) अश्या ९ गावात सुमारे ३२ लाभार्थ्यांना एप्रिलमध्ये रोहयोमधून आंबा फळबाग लागवडीचा लाभ मिळाला. रोहयोअंतर्गत खड्डे खोदण्याची मजुरी, निंदनी सारख्या आंतरमशागतीची मजुरी मिळाली. तसेच यामध्ये खत व औषधे यासाठी सलग तीन वर्षे अनुदानही मिळते. या सर्व अनुदानाची रक्कम ५० हजाराच्या पुढे जाते. आता या फळबागा तिसऱ्या वर्षात पदार्पण करत आहेत. विनायकच्या प्रयत्नामुळे पहिल्याच वर्षी ३२ लोकांना रोहयोमधून फळबागा मिळाल्या. त्याच्याच स्वत:च्या गावात गेल्या तीन वर्षापासून रोहयोअंतर्गत आंबा फळबाग लागवडीसाठी सहा लोक लाभ घेत आहेत. या लोकांना प्रती एकर प्रमाणे ४६०००/- हजार इतका लाभ मिळाला आहे. या रक्कमेतील १२०००/- रक्कम त्यांच्याच शेतात त्यांच्याच आंबावाडीची निगा घेण्यासाठीच्या मजुरीपोटी थेट त्यांच्या बँकेत जमा झाली आहे. या लोकांना आणि विनायकला खात्री आहे की फक्त एवढाच हंगाम थांबलो की पुढच्या वर्षीपासून किमान १० हजार रुपये तरी या फळबागांचे उत्पन्न सुरू होईल. शिवाय तलावातला गाळ काढणे, गाव अंतर्गत रस्ता आणि घरकुल ही कामंदेखील मोठ्या प्रमाणात होत आहेत. हे सगळे बघून आता इतर गावातील लोक विनायककडे त्यांनाही मार्गदर्शन करावे अशी मागणी करत आहेत.





प्रगती अभियान

# ४) गावकऱ्यांनी साथ दिली, कामाची पोच वाढली

**संगिता जाधव**

पळसुंडे हे पालघर जिल्ह्यातल्या मोखाडा तालुक्यातलं आदिवासी बहुल गाव. पळसुंडे आणि आजूबाजूच्या सहा-सात वाड्यांमध्ये दर उन्हाळ्यात पाणी टंचाई व्हायची. महिलांना हंडाभर पाण्यासाठी मैलोनमैल भटकंती करावी लागायची. इथल्या लोकांनी वर्षानुवर्षे अशी कष्टात काढली. मुंबईच्या पाटकर ट्रस्टला ही समस्या समजली तेव्हा त्यांनी मदतीचा हात पुढे केला. गावात पाण्याची टाकी बांधून जवळील विहिरीचे पाणी या टाकीत टाकून पिण्याच्या पाण्याची व्यवस्था ट्रस्टने केली. ज्यामुळे पळसुंडे गावासह आजूबाजूच्या सहा-सात वाडया-पाडयांची पिण्याच्या पाण्याची समस्या सुटली. पण तात्पुरती, जोवर विहीरीत पाणी आहे तोवरच ते मिळणार.

याच दरम्यान २०१९ मध्ये पाटकर ट्रस्टचे संचालक चंद्रकात पाटकर यांनी नरेगाविषयी आश्विनीताईंचा लोकमत वर्तमानपत्रातला लेख वाचला आणि लागलीच फोन करुन नरेगाबद्दल सविस्तर माहिती घेतली. सोबतच संस्थेविषयीही जाणून घेतले. पळसुंडे आणि आसपासच्या गावांचा पाण्याचा प्रश्न कायम स्वरुपी सोडविण्यासाठी नरेगा उपयुक्त ठरेल हे ओळखून पाटकरांनी प्रगती अभियानकडे सहकार्य मागितले.

एप्रिल २०१९ मध्ये प्रगती अभियानने पळसुंडे आणि आसपासच्या पाच गावातील लोकांसाठी मिळून नरेगा प्रशिक्षणाचे आयोजन केले. पळसुंडे, आडोशी, भुरटेकी, डोलारा, सडकवाडी या गावांमध्ये आधी गाव मिटींगा घेतल्या. गावातील युवकांना प्रोत्साहित केले आणि त्यातून ज्यांनी सहभागी व्हायची तयारी दाखवली त्यांची तीन दिवसांची कार्यशाळा घेतली. ज्यामध्ये नरेगाची सर्वांगीण माहिती प्रात्यक्षिके व सराव यांसह दिली. काम मागणी म्हणजे काय, काम मागणीसाठी कोणती कागदपत्रे हवी, नरेगात काम कसे मिळते, कोणती कामे नरेगातुन होतील, कशी होतात, नरेगाचा मजुराला म्हणजेच छोटया शेतक-याला काय फायदा होतो. आराखडा म्हणजे काय या व अशा माहितीसह काम मागणीचे प्रात्यक्षिकदेखील केले. अपेक्षित परिणाम झाला कार्यशाळेनंतर सगळे युवक कामाला लागले आणि एकेका गावातून काम मागणीची सुरुवात झाली. ब्राम्हणपाडातल्या १५० लोकांनी मागणी केली, पण काम फक्त २५-३० मजुरांनाच मिळाले. शोषखड्डे आणि गाळ काढण्याची काम सुरू झालं. पळसुंडेमधेही काम सुरू झाले. तिथेही मागणी केलेल्यांपैकी केवळ २२-२३ मजुरांनाच काम मिळालं. काम निघेनिघेपर्यंत मे महिना सरला आणि शेतीच्या कामांना सुरुवात झाली. शेती हंगामात डिसेंबरपर्यंत नरेगाचे काम थांबले. पुढल्या वर्षी २०२० मध्ये प्रगती अभियानने नागली विकास प्रकल्पाच्या कामासाठी हीच गावे निवडली आणि पुढे नरेगाच्या कामानेही इथे चांगले रुप धरले. २०२० मध्ये लोकांनी जास्त प्रमाणावर व वेळेत मागणी केली. नंतर बिगर शेती हंगामात नरेगा काम करायचे हा रिवाज या गावात सुरूझाला. आज या प्रत्येक गावात ३०० ते ४०० मजूर नरेगाचे काम करतात. मोठ्या प्रमाणावर कामं होत आहेत. पाच गावातलं नरेगाचं वारं इतर गावांपर्यंतही पोचलं आहे आणि आसपासची जवळपास २० गावं नरेगाच्या कामाशी जोडली गेली.

एप्रिल २०१९ मध्ये झालेल्या आमच्या कामाच्या सुरुवातीपासून ते एप्रिल २०२२ पर्यंत असे तीन वर्षांचे चित्र समोर आणले तर तालुक्यात भरीव फरक झालेला दिसून येतो. पाच गावांपासून सुरू झालेल्या कामाचा प्रसार पंचवीस गावापर्यंत गेला आणि त्याचे पडसाद तालुक्यातील सर्व ठिकाणी पडले. ते असे की, २०१९-२० साली २१,४१८ मनुष्यदिवस काम झाले होते, तर २०२१ मध्ये ३६,४१८ मनुष्यदिवस (आधीच्या वर्षीपेक्षा १५,००० मनुष्यदिवस जास्त) झाले आणि ते वाढत जाऊन २०२२ मध्ये ४४,४१८ (आधीच्या वर्षीपेक्षा ८००० मनुष्यदिवस जास्त) झाले. सुरुवातीच्या वर्षात ४३ लाखाचे काम झाले, ते दोन वर्षात सव्वा कोटी रुपयांवर गेले. शिवाय या कामांमध्ये विविधताही आहे. पाणी सिंचनाची ५७६ कामे झाली, १००१ वैयक्तिक कामे (घरकुल जनावरांचे गोठे, शौचालय, शोषखड्डे इत्यादी), तसेच शाळांचे खेळाचे मैदाने आणि गावजोड रस्ते अशा ग्रामीण पायाभूत सुविधांची कामे मोठ्या प्रमाणात झाली. ज्याचा कायमस्वरूपी फायदा आहे.

एकत्रित कामाचे हे यश आहे. पंचायत समिती, ग्रामपंचायत, जिल्हाधिकारी या शासकीय यंत्रणेची आणि समविचारी स्वयंसेवी संस्थांची मोलाची साथ मिळाली. आम्ही केलेल्या कामाला त्यांनी वेळोवेळी प्रतिसाद दिला. काम मागणी वेळेवर स्वीकारणे, वेळेवर मोजमापे घेणे, पेमेंट वेळेत करणे आणि मुख्य म्हणजे संस्थेच्या कामावर विश्वास दाखविणे, ह्या सगळ्याच्या एकत्रित परिणामामुळे यश प्राप्त झाले. संस्थेने जर एक लाख रुपये खर्च केला तर कामाच्या रूपात शासनाचा कोट्यवधीचा निधी गावात आला, गरीब कुटुंबाची उपजिविका साधली, ज्याचे मोल करताच येणार नाही, असे आहे.

१३ जानेवारी २०२१ या शासन निर्णयातील संस्था कराराच्या नियमानुसार आम्ही पूर्ण महाराष्ट्रभर नरेगा पोहचवू हा मोठा विश्वास आम्हाला या कामाने दिला.



## मागेल तिला काम, मागेल त्याला काम

मागणी केल्यावर पंधरा दिवसात काम सुरु करणे कायद्याने बंधनकारक आहे.

काम मागणी करतांना पुढील महिन्यांची तारीख घालूनही मागणी करता येते. उदाहरणार्थ ऑगस्ट मध्येच डिसेंबरच्या दहा तारखेपासून काम हवे आहे अशी मागणी देता येते. त्याची पोच पावती मिळली पाहिजे.



## ५) अपंग व्यक्तींनाही हवी रोजगार हमी

**संगिता तुमडे, कुरखेडा**

अशोक डोमाजी खेवले, वय ३४ वर्षे. शिक्षण १२ वी पास आणि मराठी व इंग्रजी टाइपिंगमध्येही गती. गडचिरोलीतील आरमोरी तालुक्यापासून ३४ किलोमीटर असलेल्या बोरी गावचे रहिवासी असलेले अशोक विवाहित असून त्यांना दोन मुली आहेत. अशोक जन्मापासून अस्थिव्यंग आहेत. अपंगत्वाची टक्केवारी ८६% इतकी आहे. त्यांना चालता येत नाही. शांत, संयमी स्वभावाच्या अशोकने आपल्या अपंगत्वाचा कधी बाऊ केला नाही की त्याची ओझे मानले नाही. उलट सतत शिकत राहून शिक्षणाबरोबरच विणकाम, एम्ब्रॉयडरी, शिवणकाम अशा अनेकविध कलाही अवगत केल्या. जोडीला शेतीकाम केले. 'आम्ही आमच्या आरोग्यासाठी' या आमच्या संस्थेच्या सहाय्यानं त्यांनी एक छोटसं किराणा दुकान सुरूकेलं व ते चालवून स्वबळावर त्यांनी आपला उदरनिर्वाह चालू ठेवला. शेतीच्या दिवसात अशोक शेतीकामावरही जातात, स्वतःच्या शेतीतले काम उरकले की दुसऱ्याकडे मजुरीने कामासाठी जातात. अपंगत्वामुळे चालता येत नसल्याने लोक त्यांना आपल्या पाठीवर मांडून शेतात घेऊन जातात.

'आम्ही आमच्या आरोग्यासाठी' ने २००९ पासून विकलांग व्यक्तींच्या अधिकारासाठी कामाला सुरुवात केली. दिव्यांग व्यक्तींना एकत्र करणे, त्यांचे बचतगट व संघटना बनविणे, वेगवेगळ्या विषयांच्या प्रशिक्षणातून त्यांची क्षमतावृद्धी करणे, योजनांबाबतची समज विकसित करणे आणि त्या मिळवण्यासाठी सक्षम करणे असे या कामाचे स्वरूप आहे. या कामामध्ये सुरुवातीपासून अशोकचा पुढाकार होता. त्याच्या परिसरामध्ये 'अपंग परिसर संघ वडधाही संघटना' स्थापन करण्यामध्ये त्यांचे योगदान मोठे आहे. यातून अनेक अपंग स्त्री, पुरुषांना त्यांच्या हक्काच्या योजना मिळवण्यासाठी त्यांनी प्रवृत्त केले.

बोरी गावात नरेगाच्या कामावरही अशोक जातो. दिव्यांग व्यक्तीला क्षमतेनुसार काम द्यावे ही मागणी त्यांनी लावून धरलेली आहे. दरवर्षी झेपेल त्यानुसार तो नरेगाचे काम करतो व लोकही त्याला सामावून घेतात. यावर्षीपासून अशोक आता नरेगा कामावर मजुरांची हजेरी घेण्याचं काम करतो आहे. या कामाचा त्याला रु. २५२ रोज मिळतो. आपल्या अपंगत्वाचा बाऊ न करता झेपेल त्या कामासाठी तयार असणाऱ्या अशोक उदाहरणाने आणखी बऱ्याच दिव्यांग लोकांना पुढे येण्याचे बळ मिळाले. तेही आपल्या क्षमतेनुसार नरेगाचे काम मिळावे अशी मागणी करू लागले आहेत. त्यांच्या मागणीला प्रतिसादही मिळाला. यावर्षी कोरची, कुरखेडा, आरमोरी, वडसा, गडचिरोली तालुक्यातील एकूण २६ दिव्यांग व्यक्तींनी नरेगाचे काम केले. अपंग आहे म्हणजे दुसऱ्यावर अवलंबून जगले पाहिजे असे नाही, समाजाने आपला दृष्टीकोन बदलला तर अपंग व्यक्तीही वेगवेगळ्या प्रकारे योगदान देऊ शकते, हे अशोकने आपल्या जगण्यातून दाखवून दिले आहे.



# ६) घेतला नरेगाचा ध्यास, सोडला दारुचा नाद

**चंद्रकांत कुंवर**

नाशिकच्या पेठ तालुक्यातील असलेल्या गावंध ग्रामपंचायतीत एकूण चार आदिवासी पाडे आहेत. गावंध पाड्यातील रहिवासी असलेले धनराज वसंत ठाकरे त्यांची ही गोष्ट.

मी अगदी सुरुवातीपासून प्रगती अभियानसोबत काम करतो आहे. गावोगावी जाऊन नरेगाची माहिती लोकांना द्यायची, त्यांना कामाची मागणी करायला प्रवृत्त करायचे, साथ द्यायची हे माझं काम. याच ओळखीमुळे धनराज माझ्याकडे आला. पण आमच्या भेटीचा किस्सा जरा वेगळाच आहे.

२०२१ मध्ये नोव्हेंबर महिन्याच्या १२ तारखेला धनराज माझ्या गावच्या वस्तीवर आला. खूप प्यायला होता, पण शुद्धीत होता आणि त्याला माझ्याशी बोलायचं होतं. मोठ मोठ्या आवाजात तो मला जाब विचारत होता, 'तुम्ही आमच्या गावात का येत नाही? आमच्या लोकांना काय कामाची गरज नाहीये का?'

मद्यपान केलेल्या अवस्थेत असला तरी धनराज काहीतरी मुद्द्याचं बोलतोय म्हणून मी संवाद चालू ठेवला.

मी विचारलं, 'तू मला असं का बोलतोयस? नीट उलगडून सांग.'

तो म्हणाला 'मला तुमची गरज आहे. मी दारू पितो म्हणून माझ्या गावातील लोक मला 'बेवडा' समजून दुर्लक्ष करतात.'

'का बरं असं?'

'मला रोजगाराचं काम करायचंच. लोकांनी मला तुमचा पत्ता दिला आणि म्हणाले तू यांच्याकडे जाऊन शिकून घे. म्हणून तुमच्या सोबत येऊन बोललो.' धनराज सगळं व्यवस्थित बोलत होता. त्याच्या भेटायला येण्याचा हेतूही स्पष्ट होता.

मी विचारलं, 'मी तुला कशी मदत करू शकतो? तुझ्या गावात तुलाच पुढं होऊन काम करायला पाहिजे.'

तो म्हणाला, 'मला कामाची सगळी माहिती द्या.'

एव्हाना त्याची उतरली होती आणि तो नीट बोलू लागला होता.

आम्ही सोबत बराच वेळ घालवला. मी त्याला मनरेगाची माहिती समजावली.

माहिती तर मी दिली, पण तो काही करेल असं मला वाटत नव्हतं. माझ्याही मनात होतं, हा बेवडा काय करणार? त्याची परीक्षा घ्यायची म्हणून मी त्याला म्हटलं गावातल्या मजुरांचे काम मागणी अर्ज भरले पाहिजेत. ते आण.

त्यानंही जिद्द सोडली नाही. गावंध आणि पळशी या दोन गावातील १०० मजुरांची मागणी भरून गामपंचातीत दाखल करून दाखवली. पोच मिळवली आणि कामंही सुरू झालं. 'बेवडा' म्हणून त्याला कमी लेखणाऱ्यांना त्यांनी आपल्या कृतीतून उत्तर दिलं. मजुरांना काम मिळवून देण्यासाठी धडपडणाऱ्या धनराजनं दारुही सोडली. मला एक महिन्यानी भेटला तेव्हा म्हणाला मी आता घेत नाही. त्याला नरेगाचं व्यसन जडलं. या व्यसनानं मजुरांना काम मिळवून दिलं आणि धनराजला नवी सन्मानाची ओळख मिळवून दिली.

आजवर कित्येक जणांना मी काम मागायला प्रवृत्त केलं, पण नरेगानं कुणी दारू सोडायला प्रवृत्त होईल असं मला कधी वाटलं नव्हतं. ते धनराजनं करुन दाखवलं.



# ७) आमचे रमेशभाऊ, बिनपगारी पण फुल अधिकारी !

**आनंद बांबळे**

मोखाडा तालुक्यातील सडकेच्या कडेला वसलेलं सडकवाडी हे साधारणे पाचशे लोकसंख्येचं आदिवासी बहुल गाव. गावातले बहुतेक लोक शेती आणि मजुरीवर अवलंबून असलेले.

रमेश सक्रू बरफ हे याच सडकवाडीतील एक तरुण प्रगतशील शेतकरी. वय पस्तीस–चाळीसच्या आसपास. बारीक अंगकाठी. आणि मनमिळाऊ स्वभाव. त्यांच्या घरची आर्थिक परिस्थिती बेताचीच. शेतीही पाच एकराच्या आत. घरात चार मुलं, पत्नी आणि आजारी आई असा परिवार.

आपलं शिक्षण फक्त तिसरीपर्यंत झालं याची खंत त्यांच्या मनात आहे. एक दिवस त्यांनी मला त्यांचं शिक्षण का मध्येच सुटलं हे सांगितलं. किस्सा फारच अजब होता. ते म्हणाले, आम्हाला शाळेत शिकवायला एक बाई होत्या. शाळेत यायच्या त्याच जाम दारू पिऊन. आम्हा मुलांकडून खूप कामं पण करुन घ्यायच्या. शिकवायच्या काहीच नाही, पण त्यांची लाकडे वगैरे आणणं, बाकी वैयक्तिक कामं जी करतील त्यावरुन मुलांचं पास–नापास ठरवायच्या. कामाला नाही म्हटलं तर मारायच्या. या त्यांच्या कामाला आणि माराला कंटाळून मी शाळा सोडली रमेशभाऊ हसत हसत हा किस्सा सांगतात, पण आपण शिकू शकलो नाही याची खंत त्यांना वाटते.

घरातले सगळ्यात मोठे असल्या कारणाने लग्न झालं अन घरातील जबाबदाऱ्या अंगावर आल्या. तसं त्यांनी शेतीकडेच पूर्ण लक्ष दिलं आणि भात, नागली, वरई, उडीद, खुरसणी ही पिकवायला सुरुवात केली.

गावातले बहुतेक शेतकरी लहान आहेत. त्यांची गुजराण फक्त शेतीवर होत नाही. बिगर शेती हंगामात स्थलांतर करावे लागते. रोजगार हमी राबवून स्थलांतर रोखता येईल, गावातच रोजगार निर्माण करता येईल, याची संस्थेने माहिती दिली. लोकांचा समज होता की नरेगात कोणती कामं घ्यायची हे सरकार ठरवतं. प्रशिक्षणातून त्यांचा गैरसमज दूर झाला. गावात कोणकोणती कामं करायची हे ग्रामस्थांनी ग्रामसभेत चर्चा करुन ठरवायचे, पंचायत समितीला सुचवायचे आणि पंचायत समितीकडून मान्यता मिळाली की गावातली कामं सुरू होतात – ही प्रक्रिया त्यांना समजली. नाशिकमध्ये प्रशिक्षणाला येऊन रमेशभाऊंनी नरेगाची सखोल माहिती करुन घेतली. नमुना चार काम मागणी अर्ज भरणे, कामाचे मोजमाप, कामाची मजुरी, खात्यात पैसे जमा होण्याचा कालावधी या सर्व टप्प्यांची रमेशभाऊंना व्यवस्थित माहिती झाली. त्यामुळे गावात रोहयोच्या कामातही त्यांनी पुढाकार घेतला. गावातल्या तरुणांना मार्गदर्शन केलं. नरेगात मजुरी तर मिळतेच, शिवाय गावाचा सर्वांगीण विकासही करू शकतो, हे त्यांनी लोकांना पटवून दिलं.

२०१९–२० या वर्षापासून सडकवाडीत नरेगाची कामं सुरू झाली. पहिल्या वर्षात शाळेच्या मैदानाचं सपाटीकरण, बंधाऱ्याचा गाळ काढणे, फॉरेस्ट नाला बांध अशी विविध कामं झाली. नमुना ४ भरून काम मागणी करणे, काम १५ दिवसात मिळेल याकडे लक्ष देणे, ग्रामसेवकाने प्रतिसाद दिला नाही तर पंचायत समितीत जाणे, कामाचे मोजमाप करणे आदी गोष्टी गावातल्यांना नीट समजू लागल्या. ते आता ग्रामसभेत उपस्थित राहून नरेगाची कामे सुचवतात. यांमुळे नंतरच्या वर्षातही नरेगाची कामे नियमितपणे होऊ लागली. ज्यामध्ये नाला सरळीकरण, दगडी बांध बांधकाम, फळबागा, भात खाचर आदी कामांची भर पडली. दरवर्षी २८०–३०० मजूर नरेगाच्या कामावर असतात. ज्यांना पूर्वी बाहेर जाऊन काम शोधावे लागायचे त्यांना गावातच रोजगार मिळू लागला. सार्वजनिक आणि वैयक्तिक दोन्ही प्रकारची कामे काढली जात आहे. सडकवाडीप्रमाणेच मोखाडा तालुक्यातल्या २५ गावांमध्ये नरेगाची कामे सुरू असून जवळपास २५००–३००० मजुरांना त्यांच्या गावातच रोजगार मिळाला आहे.

साधारण मे २०१९ मध्ये प्रगती अभियानने सडकवाडीमधील शेतकऱ्यांना नागली विकास कार्यक्रमाची ओळख करून दिली. त्यातही रमेशभाऊंनी पुढाकार घेतला आहे आणि इतर शेतकऱ्यांना प्रेरित केले. आता आपले प्रश्न घेऊनही लोक त्यांच्याकडे येतात. रेशन कार्ड बनवणे, घरगुती गॅसचे प्रश्न, घरकुलांचे प्रश्न इत्यादी सामाजिक प्रश्नांवरही रमेशभाऊ पुढे होऊन काम करतात. प्रयोगशील सामाजिक कामात पुढाकार घेणारे रमेशभाऊ आता गावातील प्रश्नांचं पुढारपण करू लागले आहेत. ‘बिन पगारी पण फुल अधिकारी’ या जिद्दीनं आणि आपलेपणानं ते लोकांच्या मदतीला तयार असतात.





## मागेल तेव्हा काम, मागेल तितके काम

आपल्याला जितके दिवस काम
करण्याची इच्छा आहे तितके
दिवस काम मिळवता येते

महाराष्ट्र सरकार – ३६५ दिवस कुटूंबाला काम देते
केंद्र सरकार – १00 दिवस कुटूंबाला काम देते

गावात एखादे काम सुरु झाले
आणि ते लवकर संपले तर
लगेच नविन कामाची मागणी करता येते.



# ८) आधी नियोजन, मग काम

**मोहन खाडम**

धाब्याचा पाडा म्हणजे दुर्गम गावाची परिसीमा असलेलं गाव. नाशिक जिल्ह्याच्या पेठ तालुक्यातील गांगोडबारी ग्रामपंचायतीत येणारं हे आदिवासी बहुल ४०० लोकवस्तीचं गाव दमणगंगा नदीच्या किनारी वसलेलं आहे. गावाला दोन बाजूंनी नदीच्या पाण्याचा वेढा आहे. इथले रहिवासी कातकरी कुटुंबातले पांडूभाऊ शेवरे यांची ही कथा.

गावातले सगळेजण पावसाळ्यात शेती करतात, पण शेतीवर भागत नाही त्यामुळे बाहेर ऊसतोडीवर किंवा खडी फोडायच्या कामावर जातात. बाहेर गेल्यावर काम मिळालं की तिथंच बारदानाची झोपडी बांधून राहायचं, काम मिळालं नाही तर रस्त्यावर राहायचं आणि सकाळी सकाळी नाक्यावर जाऊन कामासाठी उभं राहायचं, हा यांचा वर्षानुवर्षांचा रिवाज.

इथं नरेगाची माहिती द्यायला पहिली बैठक घेतली, तेव्हा सगळे मजूर जमले. त्यांना नरेगाची माहिती पहिल्यांदाच मिळत होती. गावात काम निघालं तर करायची सगळ्यांची तयारी होती. कोणकोणती कामं करता येतील हेही त्यांच्याशी चर्चा केल्यावर ठरत गेलं. यानंतर २४ मजुरांनी काम मागणी अर्ज भरला. पांडूभाऊ अर्ज घेऊन ग्रामपंचायतीत गेले, पण ग्रामसेवकानं ते घेतले नाहीत. 'आता काय करू?' त्यांनी संस्थेला फोन केला. 'अर्ज बीडीओकडे नेऊन द्या,' त्यांना सांगितलं.

बीडीओ साहेबांनी ऐकून घेतलं, अर्ज स्वीकारले आणि गावात दगडी बांधाचं काम सुरू झालं. ज्यावर २४ मजुरांना १२ दिवस काम मिळालं आणि प्रतिदिन रु.२५० मजुरी मिळाली. या मजुरांचा अनुभव बघून बाकीजण पुढे आले. १३० मजुरांनी काम मागणी अर्ज केला. त्याला अनुसरुन गाळ काढण्याचं काम सुरू झालं आणि ते तीन आठवडे चाललं. नरेगातून मागितल्यावर काम मिळतं, हक्काचा रोजगार गावातच मिळतो ही खात्री पटली. तीन शेतकऱ्यांना विहिरी मिळाल्या. बाकी कामेही गाव आराखड्यांत समाविष्ट झाली. गावात काय पाहिजे याचं नियोजन गावातल्यांनीच करायला पाहिजे, खालून वर नियोजन जायला पाहिजे, वरुन खाली लादायला नको, हे विकासाचं समीकरण आपण मांडतो. धाब्याचा पाडा गावकऱ्यांनाही ते आता समजलं आहे.





# ९) आणि डोंगर हिरवागार झाला

**धनाजी धोतरकर**

लोकांची जिद्द, प्रशासनाचं सहकार्य आणि स्वयंसेवी संस्थेची साथ एकत्र आल्यावर एखाद्या प्रदेशाचा कसा कायापालट होतो हे पहायला तुळजापूर तालुक्यातील बसंवतवाडीला नक्की या. उस्मानाबाद जिल्ह्यातल्या आठ तालुक्यातील एक तुळजापूर तालुका इथल्या आई तुळजाभवानी मुळे आणि बालाघाटाच्या डोंगरपट्ट्यांमुळे सर्वपरिचित आहे. कुसळी गवताचा तालुका अशीही या दुष्काळग्रस्त तालुक्याची दुसरी एक ओळख आहे. येथील हे बसंवतवाडी हे गाव. या गावात २०१५-१६ मध्ये पडलेला इथला शेवटचा दुष्काळ. पाणी, चारा, रोजगार सगळ्या समस्यांचा अतिरेक झाला. लोकांनी ठरवलं की सामूहिक श्रमदान करायचं आणि परिस्थिती पालटून टाकायची. गावानं निश्चय केला. काम सुरूकेलं. पण श्रमदान तरी किती दिवस करणार? मग रोजगार हमीचा पर्याय पुढे आला.

शासकीय अधिकाऱ्यांनी परिसराला भेट दिली आणि जलसंधारणासाठी करायच्या कामाचे नीट नियोजन झाले. पहिल्या वर्षी चारी, बंधारी, वृक्ष लागवड झाली. मजुरांच्या सोईचं काम गावालगतच्या डोंगरावर सुरू झालं. नंतर गावात १०० शोषखड्डे १०० परस बागा झाल्या. परसबागेसाठी १५ नमुन्याची बियाणं लोकप्रबोधनने उपलब्ध करून दिलं. जिल्हाधिकाऱ्यांच्या हस्ते बियाणांचं वाटप करून गावाला प्रोत्साहित करण्यात आलं. गावात विकासाची बाकी कामंही सुरू राहिली.

रस्ते, विहिरी, घरकुल, गोठे इत्यादी एकेक कामं नरेगातून होत राहिली. त्याचे परिणाम हळूहळू दिसू लागले. शोषखड्यांमुळे रोगराई थांबली. परसबागेमुळे कुपोषण कमी झालं. दोन-तीन वर्षांच्या प्रयत्नातून डोंगर परिसर हिरवागार दिसू लागला. कुसळी गवताचा डोंगर ही ओळख पालटून गेली.









प्रगती अभियान

# १०) मजुरांची मागणी गावात कामाची, ते देण्याची जबाबदारी सांगा कुणाची?

**शर्मिला केदार**

जून २०२१. सोलापूरच्या सांगोला तालुक्यात रोजगार हमीच्या जागृतीचे काम सुरू होतं. करोनाकाळात लोकांना जमवून मिटींगा घेणे अवघड झाल्याने योजनेच्या माहितीचे बॅनर गावात लावले होते आणि माहिती पत्रकेही वाटली होती. गावातला बॅनर वाचून आलेगावच्या रत्नाकर जाधव यांनी आपणहून संपर्क साधला. आपल्या गावात रोजगार हमीचं काम सुरू व्हावं ही त्यांची इच्छा होती. त्यांनीच गावातल्या मजुरांना गोळा केलं आणि ऑगस्टमध्ये पहिली बैठक ठरली.

दहा ऑगस्टला आलेगावच्या रामोशी समाज मंदीरात झालेल्या बैठकीमध्ये गावाची, गावातल्या मजुरांची परिस्थिती समजली. वयाने चाळीशीच्या जवळपास असलेले, मध्यम शरीरयष्टीचे, कपाळावर अष्टगंध लावलेले रत्नाकर जाधव गावात रोजगार हमीचं काम सुरू व्हावं यासाठी का धडपड करताहेत हे त्यांना प्रत्यक्ष भेटल्यावर समजलं.

रत्नाकर जाधव रामोशी समाजाचे आहेत. या समाजाची घरं गावाबाहेर आहेत. त्यामुळे गावात उपलब्ध असणारं कामही त्यांना कमीच मिळतं. करोनाकाळात तर गावातल्या मजुरांच्या संख्येतही वाढ झाली आहे. त्यामुळे जे काम गावात उपलब्ध होतं तेही मागणीच्या तुलनेत कमी होतं. ते आणि त्यांच्यासारख्या अल्पभूधारक/भूमीहीन मजुरांना रोजगारासाठी गावाबाहेर जावं लागतं. काही ऊसतोडणीवर जातात, तर काही डाळींब छाटायला तर कुणी आणखी मिळेल त्या कामावर जातात. कुठलंही काम करायची त्यांची तयारी आहे पण सुरक्षिततेची हमी तर हवी ना! काही महिन्यांपूर्वी घडलेल्या प्रसंगानं सगळ्यांच्याच मनात धास्ती होती. गावातलाच एक मजूर दुचाकीवरुन मजुरीसाठी दुसऱ्या गावी जात असताना त्याला अपघात झाला. जीव वाचला, पण पायाला गंभीर दुखापत झाली. त्यांचा उपचाराचा खर्चही खूप झाला आणि आता कष्टाची कामंही करता येत नाहीत. जर गावातच रोजगार असता तर जोखीम पत्करुन बाहेर जायची वेळ त्याच्यावर आली नसती, असं वाटून त्यांना रोजगार हमीच्या कामाबद्दल जाणून घ्यायचं होतं. रोजगार हमीमध्ये मजुरांच्या सुरक्षिततेच्या तरतुदी आहेत आणि कामावर असताना दुखापत झाली तर नुकसान भरपाई मिळू शकते, हे त्यांना आवर्जून सांगितलं.





या मिटींगनंतर मजुरांनी जॉब कार्ड काढून घेतले. त्यालाही तीन महिने लागले. खरंतर हे काम नियमानं दोन दिवसात व्हायला हवं. मग नोव्हेंबरमध्ये ३७ जणांनी काम मागणीचा अर्ज भरला. पण ग्रामपंचायतीने अर्ज जमा करुन घेतलाच नाही. जॉब कार्ड अपडेट केलेली नाहीत.. 'आता रोजगार सेवक नाही', 'तुम्ही मागणी करता, पण नंतर कामावर येत नाही'. अशी काही ना काही कारणे दिली गेली. पुन्हा ग्रामसेवक आणि सरपंचांना भेटून मजुरांनी कामाची मागणी केली, आम्हाला गावात काम पाहिजे हे सांगितलं. ग्रामसेवकाने अर्ज ठेवून घेतले, पण पोच दिली नाही आणि पंधरा दिवसांनी या म्हणून सांगितलं. त्यांनी सांगितलेल्या वेळेत ग्रामपंचायतीतून काहीच हालचाल होत नाही हे लक्षात आल्यावर पंचायत समितीमध्ये गट विकास अधिकाऱ्याची भेट घेतली. त्यांना फॉर्म दिले आणि आत्तापर्यंतची सर्व माहिती सांगितली. पंचायत समितीमध्ये चहा बिस्कीटही मिळालं, पण पोच काही मिळाली नाही! 'ग्रामसेवकाला पोच द्यायला सांगतो' त्यांनी आश्वासन दिलं. काम मागणीचे अर्ज भरले नोव्हेंबरमध्ये आणि त्याचा पाठपुरावा करण्यात दोन महिने गेले. डिसेंबर संपत आला तरी काम तर सोडाच, अर्जांची पोच पण मिळत नव्हती. 'आम्ही कामाच्या मागणीचे अर्ज कलेक्टर ऑफिसला जमा करतो' असं म्हटल्यावर बीडीओंनी हालचाल केली, ग्रामसेवकांना गावात काम काढायला सांगितलं. मजुरांना आशेचा किरण दिसू लागला.

ग्रामसेवक, सरपंच यांची बैठक झाली आणि आलेगाव, वाणी, चिंचोले या रस्त्याचं काम रोजगार हमीमधून करण्यासाठी ग्रामपंचातीने पंचायत समितीला पत्र पाठवलं. आता बीडीओंच्या पातळीवर काम अडकून पडलं. त्यांचीही भेट घेतली. आता तर जानेवारी महिनाही संपत आला. म्हणजे कामाची मागणी करुन तीन महिने होत आले. मनरेगा कायद्यातल्या तरतुदीप्रमाणे इतका वेळ लागता कामा नये. काम मागणीची पोच लगेचच मिळाली पाहिजे आणि काम पंधरा दिवसात सुरू करायला पाहिजे, असं कायदा सांगतो. मजुरांच्या मागणीनंतर लगेच काम निघालं पाहिजे. नाही निघालं तर वेबसाईट वरुन तक्रारीचा मार्ग मजुर वापरू शकतात. पण तो वापरला जात नाही. कारण सरपंच, ग्रामसेवक यांच्या विरोधात तक्रार केली, तर त्यांचा रोष ओढवून घ्यावा लागेल. लोकांना तर गावातच राहायचंय. रेशन, घराचा उतारा, पाणीपट्टी, घरपट्टी, दाखले अशा अनेक कामांसाठी ग्रामपंचायतीत जावं लागतं. तक्रार केली तर बाकी कामांत अडवणूक होऊ शकेल, ही धास्ती मनात असते.

तक्रारीऐवजी पाठपुरावा करण्यावर भर दिला गेला. वारंवार बीडीओंशी संपर्क साधला. सततच्या भेटींनंतर अखेर गावात काम निघालं. मागणी ३७ जणांनी केली होती, त्यापैकी ८ जणांना गावात सुरू असलेल्या घरकुलांच्या बांधकामावर सहा दिवसांच्या मजुरीचं काम मिळालं. तीन महिने सतत पाठपुरावा केल्याचा परिणाम झाला. हे यश खूप मोठं नक्कीच नाही, पण आपल्या प्रयत्नातून गावातच काम मिळू शकतं हा आत्मविश्वास गावकऱ्यांना आला. ग्रामपंचायतीनं २०२२-२३ च्या पुढल्या आर्थिक नियोजन आराखड्यामध्ये रोजगार हमीची कामं घेतली पाहिजेत हेही यानिमित्ताने सरपंचांना समजलं. ज्यामुळे पुढच्या वेळी मागणी झाली की कामाची उपलब्धता वेळेत होऊ शकेल.

## कामाच्या ठिकाणी सुविधा

- पाळणाघर
- औषधउपचार पेटी
- नमुना खड्डा
- दर फलक
- सावलीची सोय
- पिण्याच्या पाण्याची सोय




- करोनाच्या संदर्गात साबण अथवा सॅनिटायझर उपलब्ध ठेवणे.
- सर्व मजुरांनी आपले नाक व तोंड झाकलेले असावे.
  (मास्क अथवा स्वच्छ रुमालाचा वापर करावा)
- दोन मजुरांमध्ये अंतर असावे.

# ११) रोजगार हमी : समज कमी – गैरसमजच जास्ती

**अक्षय आगे**

मी ग्रामीण लोकांसोबत काम केलं आहे, पण रोजगार हमीचा विषय माझ्यासाठी पूर्ण नवा होता. प्रगती अभियानमध्ये जून २०२१ मध्ये आमचं नाशिकमध्ये प्रत्यक्ष प्रशिक्षण झालं. तेव्हा वाटलं मनरेगा किती चांगली योजना ही, मजुरांना आपल्याच गावात काम मिळवून देणारी. गावागावात या योजनेची कशीकशी माहिती करून द्यायची याचं नियोजन मी परतीच्या प्रवासातच केलं.

पहिली भेट अकोला जिल्ह्यातल्या टेंभी गावाला दिली. बार्शी टाकळी तालुक्यातलं टेंभी अंदाजे साडेचार हजार लोकसंख्येचं गाव. टेंभीनं पाणी फौंडेशन स्पर्धेत भाग घेतला होता आणि तेव्हा मी तिथं काम केल्यानं गावाशी परिचय होता. गावात गेल्यावर मला पानपट्टीच्या दुकानाजवळ काही मजूर उभे दिसले. त्यांच्याशी बोलायला सुरुवात करून मी रोजगार हमीचा विषय काढला. त्यांना काम हवं होतं, पण रोजगार हमीत कुणालाच इंटरेस्ट नव्हता. माझं बोलणं अडवत 'आम्हाला नकोय ती योजना' असं एकानं म्हटलं. ही योजना फक्त रोजगार सेवकाच्या आणि सरकारी लोकांच्या फायद्याची आहे, हा त्यांचा समज. रोजगार हमी म्हणजे अर्ध तुम्हाला आणि अर्ध आम्हाला असं असतंय, पैसे खाण्याचे धंदे नुस्ते ! मला बोलून न देता तेच बोलत होते. माझं मन नाराज झालं. मला प्रश्न पडला जर रोजगार हमीबद्दल यांच्यात एवढी नावड असेल तर कसं करायचं? तेव्हा प्रशिक्षणात शिकलेल्या एका गोष्टीची आठवण झाली. 'गावातला गरजू व्यक्ती शोधा, कामाची ज्याला खरीखुरी गरज आहे तो नक्की तयार होईल' मी तसंच केलं. वेगवेगळ्या लोकांना भेटत गरजू मजुरांचा शोध घेतला. सात-आठ जणांनी कामाची तयारी दर्शवली, अन सुरुवातीला अशक्य वाटलेल्या कामामध्ये मला आशेचा किरण मिळाला. मग मी सरपंच, उपसरपंच आणि ग्रामसेवकांना भेटून रोजगार हमीत काय काम निघू शकते याची चर्चा केली, गावातले मजूर कामाला तयार आहेत, त्यांना काम हवंय, हेही सांगितलं.

टेंभी गावानं २०१८ व २०१९ दोन वर्ष पाणी फौंडेशनच्या स्पर्धेत भाग घेतला होता आणि सरपंच, उपसरपंच, ग्रामसेवक यांच्या



सक्रीयतेमुळे चांगली कामंही केली होती. त्यांना पाण्याचं आणि त्यासाठी वृक्षसंवर्धनाचं महत्व माहिती होतं. सर्वांनी मिळून वृक्ष लागवडीचं काम करायचा निर्णय घेतला. पंचायत समितीकडून माहिती घेतली. सप्टेंबरमध्ये लोकांच्या सहभागातून वृक्ष लागवडीचे खड्डे खोदण्यात आले, वनविभागाने पाहिजे ती रोपे उपलब्ध केली. ग्रामपंचायतीने रोपाची वाहतूक करून सप्टेंबरमध्ये चांगला पाऊस झाल्यावर वृक्ष लागवड केली. झाडांची निगा राखली. झाडं कशी जगवली हे तपासायला पंचायत समितीचे अधिकारी आले आणि काम चोख झालंय हे दिसल्यावर त्यांनी वृक्ष संगोपन व देखभाल करण्याच्या कामाचे पत्र काढले. गावातील १८ मजुरांनी हे काम केलं. साधारण रोजची मजुरी रू. २५० पर्यंत मिळाली आणि हे काम २५ दिवस चालले. अशा रितीने टेंभी गावात रोहयोची सुरुवात झाली. अजूनही सार्वजनिक नाही पण निदान वैयक्तिक कामं होण्यास सुरुवात झाली आहे. सध्या १० घरकुलाची कामे चालू आहे

जिथं पूर्वी रोजगार हमी बद्दल गैरसमज जास्त होते, त्या गावामध्ये आता रोजगार हमीची हालचाल दिसू लागली आहे. मजुरांनी केलेल्या मागणीमुळे या बदलाची सुरुवात झाली. जनजागृतीमुळे मजुरांना रोजगार हमी लक्षात आली आणि मजुरांनी केलेल्या मागणीमुळे रोजगार सेवकांना जाग आली.

## जितके काम, तितके दाम

**आपण केलेल्या कामाचे मोजमाप केले जाते. केलेल्या कामाची ठरवलेल्या दराप्रमाणे हिशोब करुन आपली मजुरी ठरवली जाते.**

**मजुरी रोजावर नाही, तर केलेल्या कामावर आधारित आहे.**
**साध्या मातीचा दर वेगळा असतो**
**कडक मुरुमाचा दर वेगळा असतो**
**६ ते ८ मजुरांच्या समुहाने काम करावे.**
**त्यामुळे मजुरी जास्त मिळू शकते**



**दर वर्षी एप्रिल महिन्यात नरेगाच्या मजुरीचा दर बदलतो सध्या मजुरीचा दर २५६/- असा आहे. मातीचा दर वेगळा असतो. कडक मुरुमाचा दर वेगळे असतो. त्यापेक्षा कडक खडकाचा दर वेगळा असतो. शिवाय आपण ज्या ठिकाणाहून माती डोक्यावर वाहुन नेतो व जेथे टाकतो त्या ठिकाणापासून ते जेथे टाकतो त्याचा चलाईचा, कीती उंचावर टाकतो त्या उंचाईचा दर देखिल वेगळा लावला जातो. दगड गोळा करून आणले तर ते किती अंतरावरून आणले त्याप्रमाणे दर असतो. दर वर्षी दरपत्रक तयार केले जाते.**

# १२) करोनाच्या संकटकाळात, रोजगार हमीची साथ

**केशव गभाले**

ठाणे जिल्ह्यात शहापूर तालुक्यापासून पंधरा-वीस किलोमीटरवर रस्त्यालगत वसलेलं बलवंडी हे गावं. मोठमोठी धरणं उशापायाशी झालेली असली तरी गावात पाण्याची व्यवस्थाही अगदी अलिकडे काही वर्षांपूर्वी झाली. रस्ते, गटारे, शौचालयाची दुरावस्था आणि शिक्षणाचा स्तरही खालावलेला. खरीपाचे चार-आठ महिने झाले की गावात रोजगाराची वानवा. जांच्याकडे येण्याजाण्याची सुविधा आहे असे काही तरुण मुलं, पुरुष मिळेल तिथे कंपनीत किंवा इतर ठेकेदारी कामासाठी शहरांकडे जातात, तर काहीजण लोक वीटभट्टीवर किंवा इतर कामाच्या शोधात स्थलांतर करतात. उर्वरित गावातच राहतात, ज्यात जास्त करुन स्त्रिया असतात.

खरं तर या परिस्थितीत रोजगाराला एकच हक्काचा पर्याय म्हणजे मनरेगा. पण लोकांना त्याबाबत माहिती नव्हती, होते ते सगळे गैरसमज. मागे काम केलं तेव्हा कामाचे पैसे मिळाले नव्हते, ही कुणाची तक्रार, तर फारच कमी रोज मिळाला म्हणून नाराजी. सगळी कागदपत्रं जमा करून मस्टर काढलं तरी काही ना काही कारणावरुन भांडणं व्हायची, म्हणून कंटाळून रोजगार सेवकानं दोन-तीन वर्षापासून काम काढणंच सोडून दिलेलं. लोकांच्या मनातले गैरसमज दूर करत त्यांना कामाच्या मागणीसाठी अर्ज भरायला उद्युक्त केलं. २०१९ च्या डिसेंबरमध्ये १००-१५० मजुरांनी अर्ज भरले. मागणी जमा झाली, पण पोच देण्यासाठी नेहमीप्रमाणे टाळाटाळ केली. काम निघालं नाही.

मार्च २०२० उजाडला आणि करोनामुळे लॉकडाऊन लागला. कामासाठी बाहेर जाणाऱ्यांचे रोजगारही बंद झाले. रोजच्या उदरनिर्वाहासाठी पण लोकांच्या हाती पैसा उरला नाही. आता गावातच काम काढण्याखेरीज दुसरा पर्याय उरला नाही. बलवंडीबरोबरच लगतच्या बेलवड, टेंभा गावं, गावातले वाडी-पाडे यातून ४००-५०० मजुरांनी कामाची मागणी केली. गावातल्या लोकांना मदत केली आणि त्यांचे मागणी अर्ज घेऊन दोन तरुणांना सोबत घेऊन ग्रामपंचायतीमध्ये दिले. याही परिस्थितीत पोच काही मिळाली नाही. 'पोच देणार नसाल, कामं काढणार नसाल, तर तालुक्याला जाऊन अर्ज जमा करू'असा दबाव आणल्यावर नाराजीनं का होईना त्यांनी मागणीची लगेच पोच दिली. त्यानंतर २१ फेब्रुवारी २०२१ या तारखेला १२० मजुरांचं पाहिलं मस्टर काढलं, आणि तलावातील गाळ काढण्याच्या कामाला सुरुवात झाली. मजुरांमध्ये उत्साह होता. मग बाकी मजुरांच्या कामासाठी पाठपुरावा सुरूकेला. काम मिळाल्यानं उत्साहानं फुललेले चेहेरे एक आठवड्यानंतर पाहिलं तर कोमेजले होते. संताप, राग, चीड यांच्या लहरी उडत होत्या. कारणंही तसंच होतं. उन्हातान्हात त्यांनी केलेल्या मजुरीपोटी दिवसाची शंभर रुपये मजुरी पण भरली नव्हती. कुणाला रू. ८५ तर कुणाला रू. ९६ मिळाले होते. मधल्यामधे आपले मजुरीचे पैसे खाल्ले गेले, ही त्यांची भावना झाली. लोकांचा राग अनावर झाला आणि त्यांनी सरपंच, ग्रामसेवक, रोजगार सेवक यांच्या भांडण करत काम बंद केलं.

ही वेळ पकडणं गरजेचं होतं, नाहीतर लोकांच्या मनातला मनरेगाचा गैरसमज आणखी पक्का झाला असता. मजुरांमधल्या थोडा पुढाकार घेणाऱ्यांना गटागटानं भेटून रोजगार हमी कायदा नीट समजून दिला. किती मजुरी भेटते, कामाच्या ठिकाणी कोणत्या सुविधा मिळतात, मुळात काम कसं काढलं जात, शेल्फ कसा तयार होतो रोजगाराच्या मागचं-पुढचं समजून सांगितलं. मागणी नंतर पोच घेतली तर १५ दिवसात काम मिळतं, आठवड्याला मजुरी बँकेत जमा होते, जितकं काम करू तितके पैसे मिळतात आणि जर नाही मिळाले तर तक्रार देखील करता येते हे लोकांना समजलं. सोबत रोजगार सेवकांना नेलं. त्यांनीही चुका मान्य केल्या की ६ ते ८ मजुरांची टोळी केली पाहिजे आणि साधारण रू. २००-२५० पर्यंत मजुरी पडण्यासाठी दिवसभर ८ तास काम करायला पाहिजे हे आधी सांगितलं नव्हतं, ते यावेळी त्यांनी सांगितलं. मजुरी कमी का मिळाली याचा अभ्यास करुन लोकांसोबत चर्चा केली.

पुन्हा ६०-६५ लोकांचं मस्टर करून तेच काम सुरु झालं. यावेळी एक मीटर लांबीच्या काठ्या करून दिल्या, साधारण मजुरीसाठी प्रत्येकानं किमान एक घनमीटर माती खोदणं आवश्यक आहे हे व्यवस्थित समजावून सांगितलं. मोठा गट न करता छोटे छोटे ८-९ लोकांचे गट केले आणि कामाला सुरूवात झाली. नंतर जसजसं मस्टर भरत गेले तसं मजुरी समजू लागली. कोणत्या अडचणीवर कुठला मार्ग काढायचा हे लोकांना समजलं. सगळ्यांचे चेहरे पुन्हा आनंदले. यावेळी मजूर गटांना रोजमजुरी रू. २५० ते रू. ३५० आणि सर्वात जास्त म्हणजे रू. ३८९ पर्यंत मिळाली. साधारण अडीच महिने काम चाललं, केलेल्या कामाचं दाम मिळालं आणि तलावाची पाणी धारण क्षमताही वाढली.

लोकांबरोबरच आता ग्रामरोजगार सेवकाचाही उत्साह वाढला. आधी काम काढायला कंटाळा करणारा रोजगार सेवक आता पुढाकार घेऊन कामे काढतो. या वर्षी ग्राम रोजगार सेवकाने स्वत: ६५ लोकांची मागणी भरून त्यात तलावातला गाळ काढण्याचं काम सुरु केलं. यात ५२ लोकांना काम मिळाले. शिवाय वैयक्तिक कामेही काढली. २५ लोकांना शोषखड्डे मिळाले. अर्थात सगळे प्रश्न सुटले असे म्हणता येणार नाही. पुढेही अडचणी येत राहतील, मात्र मुख्य शहरापासून दूर जंगलात, डोंगराच्या कुशीत वसलेल्या आणि रोजगारापासून वंचित गावातल्या लोकांना आता रोजगार हमीची खरी ओळख पटली.







# १३) लोकांना समजलं, लोकांनीच केलं

**पंढरी हेकडे**

रोजगार हमीची माहिती द्यायला जि. अमरावती ता. धारणी येथील कोटा गावात गेलो. लोकांना भेटलो. त्यांच्याकडनं समजलं गावात मनरेगाचं काम सुरू झालं नव्हतं. तुम्ही नमुना चार भरून दिलेला का, या प्रश्नावर ते म्हणाले रोजगार सेवकानं भरूनच नाही घेतला फॉर्म! माझ्या लक्षात आलं की रोजगार सेवकानं हे काम करायचं ही लोकांची समजूत झाली आहे. जिथे रोजगार सेवक ॲक्टीव्ह असेल तिथे ठीक, नाहीतर कामच होत नाही.

मग मी त्यांना सविस्तर समजून दिलं. 'रोजगार सेवक करेल तेव्हाच आपल्या गावामध्ये काम सुरू होतं असं नाही. आपणही नमुना चार अर्ज भरून कामाची मागणी करू शकतो. ग्रामपंचायतमधून नमुना चार अर्ज आणून, भरून रोजगार सेवकाकडे नाहीतर ग्रामसेवकाकडे द्यायचा. त्यांनी घेतला नाही तर थेट पंचायत समिती किवा बीडीओ कडे सुद्धा देता येतो. एक गोष्ट मात्र लक्षात ठेवायची, जेव्हा नमुना चार कुणाकडेही जमा करतो तर त्याची पोच घेणं तेवढंच आवश्यक आहे. कारण नमुना चार भरुन दिल्याच्या तारखेपासून पंधरा दिवसाच्या आत काम सुरू झालं नाही तर आपल्याला बेरोजगारी भत्याची मागणी करता येते, यासाठी मागणी केल्याचा सबूत म्हणून पोच पावती असायला पाहिजे. तोंडी उत्तर चालणार नाही, लेखी उत्तर असलं पाहिजे.' माझ्या जवळचा नमुना चारचा अर्ज मी त्यांना दाखवला व असाच अर्ज आणि त्यालाच लागून खाली नमुना पाच म्हणजे पोच पावती असते ती ग्रामपंचायतीतून आणायला सांगितलं.

मिळालेल्या माहितीनं लोकांमध्ये उत्साह आला. सुरुवातीला १०-१२ जणांनी नमुना चार भरला. बाकीच्यांना माहिती झाल्यावर आणखी लोकांनी भरले. जवळपास ७० लोकांनी नमुना चार भरून ग्रामसेवकाकडे सोपवले आणि पोचही मागितली. त्यानं अर्ज घेतले पण पोच पावती द्यायला नकार दिला. मात्र १५ दिवसाच्या आत आपल्या गावात काम सुरू होईल असं आश्वासन दिलं. आजवर असं कधी झालं नव्हतं. मजुरांनी स्वत:हून फॉर्म आणून देणं, पोच मागणं हे काहीतरी नवीन होत आहे. त्यांना सगळी माहिती झालीय हे ग्रामसेवकाच्या लक्षात आलं. म्हटल्याप्रमाणे १५ दिवसात गावात समतल चराचं काम सुरू झालं. एकूण २० दिवस काम झाले. सोबतच ग्रामसेवकांनी रोजगार सेवकाशी चर्चा करून त्यांनाही कामाला प्रवृत्त केलं.

म्हणजे जर गावकऱ्यांना कायदा समजला, तरच त्यांना त्यांच्या हक्काचं काम मिळेल. गावातली रोजगाराची समस्या कमी होईल आणि त्यांना रोजीरोटीसाठी बाहेरगावी वा शहरात जावं लागणार नाही.





# १४) जेव्हा पोच मिळेल, तेव्हा पेच सुटेल

**अर्चना ठोके**

प्रगती अभियानला जोडले गेले तेव्हापासून मला रोजगार हमी विषयी भरपूर माहिती मिळाली. कामाची सुरुवात मी स्वत:च्या गावापासून करायची ठरवलं. नांदेड जिल्ह्यातील हदगाव तालुक्यातील २५ गावाची माहिती मला होती. पळसे ग्रामपंचायत जिथे माझे सगळे परिचयाचे असल्याने समजून सांगण्यात अडचण आली नाही. लोक मागणी अर्ज भरायला तयार झाले. ५० मजुरांचे काम मागणी अर्ज भरुन घेतले. सुरुवातीला ग्रामसेवकाने ते स्वीकारले नाहीत. पंचायत समितीत नेऊन देऊ असं म्हटल्यावर घेतले. आठ दिवसात कामाला सुरवात करूअसंही म्हणाले. बरोबर आठ दिवसांनी शेततळ्याचं काम सुरूझालं. २३ जानेवारी २०२१ ला शिवाजी देवराम म्हस्के यांच्या शेतात काम सुरु झाले. आणि कामाचे ले आउट देणारे तांत्रिक सहाय्यक यांनी तुम्ही किती ही काम करा, मजुरी ४०,५० रुपये पडल मग माकडे येवु नका, असं मजुरांना सांगितलं त्यामुळे ५० मजुरांपैकी १५ मजूर पटापट निघून जाऊ लागले मग नाशिकला संस्थेत फोन करून सांगितले तेव्हा संगिता मॅडमने काही मजुरांशी व्हीडीओ कॉलवरुन चर्चा संवाद केला आणि १५ मजूर कामाला लागले. त्यांनी खूप काम केले. पण मजुरी खरच ४० रुपये पडली. मग लोक नाराज झाले. तरीही पुन्हा काम करुच म्हणाले.

माझा स्वत:च्या गावातला अनुभव मला इतर गावात काम करताना उपयोगी आला. हदगाव तालुक्यातल्या २५ गावांमध्ये मी रोजगार हमीबद्दल माहिती सांगू लागले. त्यातलंच एक बाभळी गाव. तिथले सरपंच आणि रोजगार सेवक यांना भेटले. दोघांचं म्हणणं एकच होतं, ‘आमच्या गावात रोजगार हमीचं काम कोणतेच मजूर करत नाही. तुम्ही इथे येऊ पण नका!’ ग्रामसेवकानंही हेच सांगितलं. पण जेव्हा मी मजुरांना भेटले, ते म्हणाले, ‘आम्हाला काम हवंय’. मग ज्यांची तयारी होती त्यांनी मागणी अर्ज भरले. एकूण ५० मजुरांचे अर्ज घेऊन ग्रामसेवकाकडे गेलो. सुरुवातीला स्वीकारायला तयार नसलेल्या ग्रामसेवकाने आमची पंचायत समितीत जायची तयारी पाहून अर्ज स्वीकारले. पोचही दिली. पण काम सुरू होत नव्हतं. पंधरा दिवसांनी आम्ही ग्रामसेवकाला विचारायला गेलो. त्याचं उत्तर तयार होतं, ज्या शेतात तुम्हाला शेततळं खोदायचं आहे, तिथलं सोयाबीन अजून काढलं नाहीय. ते काढल्यानंतर कामाला सुरवात करू' तो खरं सांगतोय का हे आम्ही शेतात जाऊन पाहिलं. खरंच सोयाबीन कापायचं राहिलं होतं. आम्ही शेतकऱ्याला विचारल्यावर तो म्हणाला चार-आठ दिवसात शेत रिकामं करून देतो. अशा रितीनं शेततळ्याच्या बांधकामाची सुरुवात झाली. काम मिळाल्याशिवाय आम्ही गप्प बसणार नाही असंच इथल्या मजुरांनी ठरवलं, कारण त्यांना आपल्या हक्कांची जाणीव झाली.







## १५) माझ्या शिकण्याचा प्रवास: रोजगार सेवक ते रोजगार हमी सल्लागार

**गोकुळ सोनोने**

मी गोकुळ गणेशराव सोनोने. अमरावतीच्या चांदूर रेल्वे तालुक्यातलं राजना हे माझं गाव. मी पूर्वी रोजगार सेवक म्हणून काम केलंय आणि आता प्रगती अभियानसोबत मनरेगा जागृतीचं काम पण करतोय. अशा प्रकारे यंत्रणेच्या आतला आणि बाहेरचा असे दोन्ही अनुभव माझ्या गाठिशी आहेत.

२०१०च्या सुमारास माझ्या गावाच्या ग्रामसभेतून रोजगार हमी योजनेत काम करण्याकरता रोजगार सेवकाची निवड होणार होती. माझ्यासह चार जणांनी अर्ज केले. गावातल्या प्रत्येक कार्यक्रमात माझा सहभाग आणि बारावीपर्यंतचं शिक्षण यामुळे मी सरस ठरलो. माझी निवड झाली. खूप आनंद झाला. आपण काहीतरी करून दाखवायचं या उत्साहानं मी कामाला लागलो. पहिल्या दोन वर्षात रोपवाटिकेचं काम निघालं, मग त्यातील जवळपास २००० झाडांची गावातच लागवड केली. वेगवेगळ्या विभागांच्या अधिकाऱ्यांची भेट घेऊन त्या कामांचा रोजगार हमीत समावेश केला. कृषी विभागाच्या फळबागा, बांधावरील वृक्ष लागवड केली. स्त्री, पुरुष दोघांनाही कामं मिळत होती. मजूर समाधानी होते. अधिकाऱ्यांशी ओळखी होत होत्या, अन माझ्या कामाची प्रशंसाही होत होती.

गाव म्हटलं की राजकारण आलंच. वेगवेगळे लोक आले. कोणी पाठीवर कौतुकाची थाप देतात, तर कोणी पाय खेचायला बघतात. रोजगार सेवक म्हणजे साधं पद आहे, पण माझ्या सगळीकडे झालेल्या ओळखी आणि नाव काहींच्या डोळ्यावर येत होतं. माझ्याकडून काय चूक होते यावर त्यांची बारीक नजर होती. एकदा दिवाळीचा सण जवळ आला असताना काही तांत्रिक अडचणींमुळे मजुरांचं पेमेंट थांबलं. विरोधकांना हे निमित्त मिळालं. मी मुद्दाम पेमेंट लेट केलं, कारण मला पैसे हवे होते, अशा माझ्याविरुद्ध तक्रारी पंचायत समिती व जिल्हाधिकारी यांच्याकडे केल्या. हे प्रकरण फारच वाढलं, पार वृत्तपत्रांमध्ये बातमी आली. भ्रष्टाचाराचा गंभीर आरोप माझ्यावर झाला. माझ्या घरचे काळजीत पडले. नंतर पंचायत समितीची तक्रार निवारण समिती गावात आली आणि सरपंच, ग्रामसेवक व बाकीच्यांशी बोलून सर्व चौकशी करून गेली. त्यांच्यावर राजकीय दबाव आणून ही केस रोहयोच्या जिल्हा तक्रार निवारण समितीकडे पाठवायला भाग पाडले. ही सुनावणी कोर्टात होते, तेव्हा मी पहिल्यांदा कोर्ट पाहिलं. तालुक्यातल्या रोजगार सेवकांच्या संघटनेनं मला सपोर्ट केला. वकील करून दिला. सुनावणीच्या तारखेला मी हजर झालो, गावातले तक्रारकर्ते मजूरही आले होते. इथेही माझी निर्दोष मुक्तता झाली. मला खूप बरं वाटलं. पण ज्या गावानं आपल्यावर खोटा आरोप केला तिथं पाय टाकायचा नाही असं मी ठरवलं. रोजगार सेवक पदाचा राजीनामा देऊन गाव सोडलं, दुसरी नोकरी शोधली आणि पदवीपर्यंत शिक्षण घेतलं. समाजकार्याची पदवी मिळवली. समृद्धी महामार्ग प्रकल्पावर तीन वर्षे काम केलं, वर्धा एकात्मिक विकास विभागात एक वर्ष काम केलं. रोजगार हमीशी पुन्हा कधी संबंध येईल असं वाटलं नव्हतं. अचानक नाशिकची प्रगती अभियान संस्था वर्धा जिल्ह्यात कार्यकर्ता शोधते आहे हे समजलं. वाटलं हीच संधी आहे. आपण कामाची सुरुवात ज्या रोजगार हमीपासून केली, रोजगार सेवक म्हणून जो अनुभव व कौशल्ये कमावली त्याचा वापर करून पाहता येईल. माझ्या गावासाठी मी जे करू शकलो नाही ते इतर गावात करून दाखवीन या जिद्दीनं मी ही जबाबदारी स्वीकारली. आधी मी रोजगार सेवक होतो, आता लोकांना त्यांचे हक्क सांगतो. रोजगार सेवक, सरपंच, ग्रामसेवक यांच्याकडे कामाची मागणी करण्यासाठी आणि आपले अधिकार मिळवण्यासाठी मी लोकांना प्रेरित करतो, त्यांची साथ देतो.

रोजगार सेवक म्हणून पूर्वीच्या अनुभवावरून मला यंत्रणेची सर्व माहिती असल्यामुळे कोणताही विषय लवकर लक्षात येतो, त्यामुळे काम हे प्रभावी प्रमाणे करता येते. उदा. तालुक्यातील रोजगार सेवकांना मानधन व काम वाढीबाबत माहिती देतांना मी सुद्धा रोजगार सेवक होतो असे सांगितल्यावर ते आपला माणूस म्हणून आपल्याला सविस्तर माहिती देतात व मदतही करतात.



## सामाजिक अंकेक्षण

- सामाजिक अंकेक्षण केंद्रसरकारच्या नियमाप्रमाणे एक वेगळी संस्था राज्य सरकारने निर्माण केलेली आहे. सामाजिक अंकेक्षणाच्या या संस्थेच्या प्रमुख पदी अप्रशासकीय व्यक्तीच असावी असा नियम आहे.
- या सामाजिक अंकेक्षणाच्या यंत्रणेमार्फत प्रत्येक ग्रामपंचायतचे वर्षातून दोनदा सामाजिक अंकेक्षण होणे अपेक्षित आहे.
- सामाजिक अंकेक्षण गावागावातून करतांना इतर गावातील तरुण मुलामुलींना गावकार्यकर्ता म्हणुन निवड करुन त्यांचे प्रशिक्षण घेतले जाते आणि त्यांच्या मार्फत सर्वेक्षण करून ग्रामसभा घेतली जाते.
- या सामाजिक अंकेक्षणा दरम्यान गावात नरेगामार्फत आलेल्या सर्व अडचणी आपण मांडल्या पाहिजे म्हणजे त्या दुरुस्त होण्यास, अंमलबजावणीमध्ये सुधारणा होण्यास मदत होते.

# १६) कोविडकाळात मिळाला रोजगार हमीचा आधार

**शंकर श्रावण भरडे**

ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पाचे बफर वन व्याप्त क्षेत्रात असलेलं १३५ कुटुंब असलेलं गाव. त्यात २४ अनु.जाती व १११ आदिवासी कुटुंबं आहे. १२ आदिवासी कुटुंबं शेती करतात. त्यातील ४ वनपट्यांचा समावेश आहे. सर्व शेतकरी अल्पभूधारक. जंगलातील मोह, टेंभुर फळ, तेंदुपत्ता गोळा करुन विकणे व बांबू आणून त्याचे कडे, डाले करुन विकणे हा येथील पारंपरिक मुख्य व्यवसाय. पर्यटनामुळे वनविभागाने जंगलात जाण्यास गावलोकांना बांबू व गौण वनोपज जंगलातून आणण्यास मनाई केल्याने पारंपारिक व्यवसाय मोळकळीस येऊन रोजगाराची फार मोठी समस्या भेडसावत होती. त्यामुळे गावात रोजगार मिळण्याचे उद्देशातून आमच्यासोबत गावलोकांची चर्चा सुरु झाली. या गावातील लोकांना रोजगार हमी योजनेतुन काम उपलब्ध करुन देणे एक आव्हानच होते. त्यातही एप्रिल २०२१मध्ये कोविड –१९ ची विदारक परिस्थिती.

१३५ कुटुंबापैकी फक्त २ कुटुंबाजवळ जॉबकार्ड होते. पण रोजगार हमी बाबत कुणालाही माहिती नव्हती. अभ्यास बैठकीत रोजगार हमीच्या कामाबाबत खूप चर्चा झाली. जॉबकार्ड मिळण्यासाठी सर्व कुटुंबानी एक संयुक्त अर्ज ग्राम पंचायतकडे देऊन जॉबकार्डची मागणी केली. गाव भद्रावती तालुक्यात व  ग्रा. पं. चंद्रपुर तालुक्यात येत असल्याने जॉबकार्ड कोणत्या पंचायत मधुन द्यायचा हा प्रश्न ग्रामसेवकाला निर्माण झाला. त्यामुळे जॉबकार्ड देण्यास खूप किचकट प्रक्रिया असल्याचे ग्रामसेवकानी लोकांना सांगितले. यावर अभ्यास बैठकित चर्चा झाली.

ग्रामसेवक जाबकार्डसाठी दिरंगाई करीत असल्याचे लोकांच्या लक्षात आले. त्यामुळे आता पहिल्यांदा संयुक्तपणे १५३ मजुरांनी नमुना ४ भरुन कामाची मागणी ग्राम पंचायतीकडे केली आणि त्याची पोचपावती म्हणून नमुना ५ वर सही शिक्का घेतला. त्या दिवसापासून रोजगार सेवकाने गावात येऊन सर्व कुटुंबाचे आधार कार्ड, बैंक पासबुक व फोटो काढून नेण्याचे काम सुरू करुन पंधराव्या दिवशी २३ जानेवारी २०२० ला गावालगतच्या तलावाच्या खोलीकरणाचे काम सुरू झाले. पहिल्याच दिवशी ११३ मजुरांना रोहयोचे काम मिळाले. याच कामावर रोहयो कुटुंबांचे जॉबकार्ड देण्यात आले. गावात पहिल्यांदाच रोजगार हमी चे काम सुरू झाले. त्यामुळे रोजगार मिळाला. गावातील ९६ कुटुंबांनी घरकुलाकरीता पहिल्यांदाच आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय चिमूर येथे अर्ज केले.

काम मागणीसाठी जॉबकार्डच हवे असे भासवले जाते परंतु मजुराला काम मागण्याचा हक्क असल्यामुळे तो मागणी भरुन देऊ शकतो. त्यांनतर रोजगारसेवक जॉबकार्ड काढण्यास मदत करतात. त्याला खुप वेळ लागत नाही. नमुना १चा अर्ज भरुन पंचायत समितीतील संगणक कक्षात दिला की तेथे सॉफ्टवेअरमध्ये जॉबकार्ड नंबर जनरेट होतो. शिवाय एका जॉबकार्डवरील नंबर हा एकदाच तयार होतो. पुन्हा तोच नंबर जनरेट होत नाही, भारतातील  कोणत्याही मजुराकडील जॉबकार्ड नंबर हा दुस–या  कोणा मजुराचा असूच शकत नाही.म्हणून जॉबकार्ड नाही म्हणून कोणी काम मागू शकत नाही असं मुळीच नाही.



# १७) मनरेगातून शेततळी, करी समृद्ध शेतकरी

**जीवन राठोड**

ऊसतोड कामगारांचा जिल्हा अशी महाराष्ट्रातल्या बीड जिल्ह्याची ओळख आहे. या जिल्ह्यातून दरवर्षी ५ ते ६ लाख मजूर ऊसतोडीसाठी राज्यात तसेच कर्नाटक, आंध्रप्रदेश, तमिळनाडू, मध्यप्रदेश या अन्य राज्यांत जातात. एकट्या माजलगाव तालुक्यातून जवळपास एक लाख मजूर ऊसतोडीसाठी जातात. वर्षातले सहा महिने गावात आणि सहा महिने ऊसतोडीवर हे स्थलांतराचं चक्र चालू राहतं, ज्यामुळे अनेक समस्या निर्माण होतात. गावातच रोजगार निर्माण झाला तर या मजुरांचं स्थलांतरित जगणं थांबू नाही का शकणार? मात्र यासाठी मजुरांमध्ये जागृती हवी आणि प्रशासनाची इच्छाशक्ती हवी. त्याचीच ही गोष्ट. माजलगाव तालुक्यातल्या पाली पारगावची.

सप्टेंबर २०२१ मध्ये या गावात पहिली बैठक घेतली तेव्हा सरपंच, रोजगार सेवक यांच्यासह दहा-पंधरा ग्रामस्थ आले होते. आपण आठ-दहा वर्षांपूर्वी रोजगार हमीचं काम केलं, पण त्यानंतर गावात तसं काही काम आलंच नाही, असं त्यांनी म्हटलं. रोजगार हमीची त्यांना नव्यानं ओळख करून दिली. रोजगार हमीतून लहान शेतकऱ्यांना वैयक्तिक लाभाची वृक्ष लागवड, विहीर, शोषखड्डे, विहीर पुनर्भरण, शेततळे, रेशीम उद्योग इत्यादी कितीतरी कामं करता येतीत, शिवाय सार्वजनिक कामं करता येतील हे समजल्यावर काहींनी तयारी दर्शवली. त्यातलेच एकजण जोतीराम गायकवाड. साडेतीन एकर कोरडवाहू जमिनीचे मालक. तीन वेळा बोअरचे काम केले, पण पाणी लागलं माही. शेततळ्याची कल्पना त्यांना पटली. याआधाही त्यांनी शेततळं करण्यासाठी कृषी विभागाकडून मदत मिळण्यासाठी प्रयत्न केला होता, पण त्याला यश आलं नव्हतं. आता मनरेगातून शेततळं होईल या उमेदीनं त्यांनी अर्ज देण्यासाठी सरपंचांची भेट घेतली.

जोतीरामची अपेक्षा होती की मनरेगाचा कायदा सांगतो, त्यानुसार मागणी केली आणि कागदपत्रं दिली की काम निघेल. पण प्रत्यक्षात हे इतकं सरळसोट होत नाही, हेही त्यांच्या लक्षात आलं. जोतीराम शेततळ्याचा अर्ज घेऊन ग्रामपंचातीमध्ये गेले. तिथे सरपंच ताईंच्या पतीच्या हातात कारभार होता. 'कामाची मागणी करून आम्हाला अडचणीत आणू नका.' असं सांगत त्यांनी अर्ज घ्यायचंच नाकारला. जेव्हा जोतीरामनं लावून धरलं तेव्हा शेततळ्याचा अर्ज आणि जमिनीची कागदपत्रं ग्रामसेवककाकडं द्यायला



सांगितली. तसं केलं तर ग्रामसेवकानेही कागदपत्रं स्वीकारली नाहीत. 'मनरेगा मध्ये घरकुल सोडून इतर कोणतंही काम घ्यायचं नाही असं माजलगावच्या ग्रामसेवकांच्या संघटनेनं ठरवलं आहे,' असं त्यांनी सांगितलं. मागणीनुसार काम दिलं नाही तर बेकारभत्ता द्यावा, ही कायद्यातली तरतूद आहे. त्यातून आपला बचाव करण्यासाठी ग्रामसेवकांनी हा मार्ग काढला आहे. 'तुम्ही फक्त कृती आराखडयात नाव घ्या. तसा ठराव ग्रामपंचायतीच्या बैठकीत किंवा ग्रामसभेत घ्या,' अशी विनंती आणि सतत पाठपुरावा केल्यावर ग्रामसेवकांना काम करावंच लागलं. त्यांनी अखेर कृती आराखडयात शेततळ्याचा समावेश केला. सोबतच परिसरातली आणखी काही कामे सुचवली होती तीही घेतली. नंतर या कामांच्या मंजुरीसाठीही त्यांनी प्रस्ताव दिला. दरम्यानच्या काळात जोतीराम आणि बाकी शेतकऱ्यांच्या सोबतीनं गावातल्या जवळपास ६० ते ६५ मजुरांनी काम मागणीचा नमुना ४ अर्ज भरून दिले. हे अर्जही ग्रामसेवकाला दिले, पण त्याने ते स्वीकारले नाहीत.

सरपंच, ग्रामसेवक या दोघांचंही सहकार्य मिळेना तेव्हा संस्थेच्या कार्यकर्त्यांच्या मदतीनं जोतीराम आणि बाकी मजुरांनी तालुक्याला **APO** ची भेट घेतली. त्यांनी सर्वांना **BDO** मॅडमला भेटायला पाठवलं. मॅडमना सगळा घटनाक्रम सांगितला, ग्रामसेवक अर्ज घेत नाही म्हणून ते आपल्याकडे दाखल करुन घ्या, अशी विनंती केली. 'अर्ज ग्रामसेवकाला द्या, मी त्यांना सांगते', असं म्हणून त्यांनीही अर्ज घेण्याचं टाळलं. बीडीओंच्या भेटीतूनही काही साध्य झालं नाही, पण मजुरांनी जिद्द सोडली नाही. आम्ही बीड जिल्हाधिकारी कार्यालयात जाऊन मनरेगा उपजिल्हाधिकारी यांची भेट घेतली. या सगळ्या भेटचक्रातून काम पुढं जात नव्हतं, पण एका ग्रामरोजगार सेवकाचं सहकार्य सोडलं तर खालपासून वरपर्यंत सर्व यंत्रणा साफ उदासीन होती. मनरेगाची अंमलबजावणी करायची जबाबदारी ज्या अधिकाऱ्यांवर आहे त्यांना निगेटीव्ह विचार करून कसं चालेल? 'इथल्या मजुरांची काम करण्याची इच्छा नाही.', 'तुम्ही का या भानगडीत पडता तुम्ही तुमची कामं करा आणि आम्हालाही रिकामे उद्योग लावू नका.'– ज्यांची काम करण्याची तयारी आहे तेही अशा भाषेनं नाउमेद होतात. जर इथले लाखो मजूर जगण्यासाठी सहा–सहा महिने घरापासून लांब जाऊन पालात राहून ऊसतोडीचं काम करतात, तर त्यांना कामाची गरज नाही असं कसं म्हणता येईल!

या अधिकाऱ्यांची मानसिकता आम्ही बदलू शकलो नाही, पण आमच्या काम मागणी अर्जाचा पाठपुरावा मात्र करत राहिलो. काही महिन्यांनी शेततळ्याला मंजुरी मिळाली. एकूण पाच लाख पस्तीस हजार निधी मंजूर झाला. १० जानेवारी २०२२ ला काम सुरू झालं, सुरुवातीपासून १५ ते २० मजुरांना काम मिळालं. २० गुंठ्यावर विस्तारलेलं १०,००० चौरस फूट परीघ आणि १० फूट खोल शेततळ्याचं बांधकाम पूर्णत्वाला येऊ लागलं. येत्या पावसाळ्यात तळं भरेल. ज्यामुळं त्यांची ३.५ एकर जमीन ओलिताखाली येईल. 'शेतीला जोडून मत्स्य व्यवसाय पण करणार. या पाण्यामुळं रेशीम, भाजीपाला घेता येईल. तसंच माझ्याकडे असलेल्या म्हशीला देखील चाऱ्यांची व्यवस्था होईल,'

जोतीरामनं सांगितलं. आम्ही अंदाज बांधला, त्यांचं सध्याचं उत्पन्न वर्षाला साधारण दीड लाख आहे, शेत तळ्यामुळं ते दुप्पट–तिप्पट होईल ही खात्री त्यांना आहे. या तळ्याचा अप्रत्यक्ष लाभ आजूबाजूच्या जमिनींना देखील होईल.

मजुरांना, शेतकऱ्यांना मनरेगाची गरज आहे, त्यांची काम करायची तयारीही आहे, पण घरकुलाच्या पलिकडे इतर कोणतंही काम मनरेगाखाली न करण्याची यंत्रणेची चुकीची मानसिकता बदलायचीही गरज आहे. ते झालं तर जिल्हाभरात चांगलं काम होऊ शकेल, मजुरांचं स्थलांतरित जगणं थांबू शकेल.

मुख्य म्हणजे शासकीय यंत्रणेनं मनावर घेतलं तर हे काम सुरळीत होऊ शकेल. आमच्या या म्हणण्याला प्रतिसाद मिळू लागलाय. १ मे २०२२ रोजी बीड येथे मनरेगा मंत्रीसाहेब, जिल्हा नरेगा कलेक्टर, सीईओ आणि नरेगा यंत्रणेचे सर्व अधिकारी यांची बैठक झाली. यात बीडमध्ये मोठया प्रमाणात नरेगाची कामे सुरू आहे रस्ते, रेशिम लागवड, शेततळे ह्या कामाची मोठी प्रशंसा झाली आणि पुढेही अशी मोठी कामे करण्याच्या नियोजनावर ठोस चर्चा झाली. ज्यामुळे लोकांचाही नरेगासंबधीचा उत्साह वाढला.

# १८) स्थलांतराला कंटाळलेल्या दामूला मिळाली नरेगाची साथ

**सुनिल घोडे**

नाशिक पासून ८० किमी दूर त्र्यंबकेश्वर तालुक्यातील बाफनविहीर हे छोटेसे आदिवासी गाव. रस्ते, बेरोजगारी, शिक्षण, पाणी अशा विविध समस्यांनी वेढलेले. दरवर्षी भरपूर पाऊस होऊन सुद्धा डिसेंबर नंतर पाण्यासाठी वणवण करावी लागायची. पावसाळा संपला की विनापर्याय दरवर्षी सारखेच स्थलांतर करावे लागायचे.

याच गावात दामू सोनू पागी यांनी स्थलांतराला कंटाळून प्रगती अभियान संस्थेच्या मार्गदर्शनाने रोहयोची कामे आपल्या शेतात करून घेतली. दामु पागी या आधी नाशिकमधील द्राक्षबागेच्या कामासाठी कुटुंबासहीत स्थालांतर करीत होते. पण सर्व कुटुंब बाहेर असल्यामुळे घराकडील जनावरे उपासमार होते.त्यामुळे ते स्थलांतराला खूप कंटाळले होते.

जमिनीचं सपाटीकरण करून त्यानंतर त्यांनी रोहयोतून १५x२० चे शेततळं घेतलं. (साधारण अडीच एकर जमीन आहे ? त्यातील दोन एकर पडीक आहे आणि अर्धा एकरवर जमिनिचे सपाटीकरण केले.स्वत:च्या शेतात शेततळे व त्यावरच मजुरीसाठी काम म्हणून त्याचीही काही मजुरी मिळत होती. शेततळ्याचे काम २०१९ साली सुरू झाले काही काम २०२० मध्ये केले एकूण तीन महिने काम सुरु होते, २३८ रुपये मजुरी या कामात मिळाली होती. शिवाय त्यांनी सौर ऊर्जा योजनेचा लाभ घेतलेला आहे. कृषी विभागाने फळबाग लागवड दिली. शेततळ्यात वर्षभर पाणी असल्याने ते वर्षभर शेतात काम करतात. म्हणून स्थलांतराचा प्रश्न सुटल्यासारखाच आहे. हा बदल व्हायला साधारण तीन वर्षे जावी लागली ? या बदलाबद्दल दामू पागी सांगतात की वर्षानवर्षाची स्थंलातराचा त्रास संपला. गावातचकाम मिळते कुटुंब व मीही समाधानी आहे. घरातील जनावरांकडे लक्ष देता येते.

काही दिवसातच शेततळ्याला अस्तरीकरण भेटणार आहे. पाणी उपलब्ध झाल्यामुळे त्यांना अजून एक जोडधंदा करावा वाटला. म्हणून त्यांनी आंबे कलम करून स्वत:च्या शेतातही लावले व आता दुसऱ्या शेतकऱ्यांना या झाडांची विक्री करायला लागले. म्हणूनच अशा वेगवेगळ्या विभागांच्या योजनांची सांगड घालता आली तर नक्कीच शेतकरी समृद्ध होईल यात शंका नाही. दामु पागी प्रमाणेच सुनिल पागी म्हणून शेजारी कुटुंब आहे तेही यांच्या शेततळ्यातील पाणी घेऊन त्यांच्या शेतात ते सुध्दा आंबा लागवड करीत आहे.तेही शेततळे मागणार आहेत.दामु पागी हे आता सतत नवनविन योजना कोणत्या आल्या हे त्यांना माहित असते कारण ते सरकारी अधिकाऱ्यांच्या संपर्कात असतात आणि विविध माहिती मिळवून गावातील इतरांना सांगतात.



# १९) महिलांची एकी, रोजगार हमीवर झाली दाटी

**शालू कोल्हे**

गोंदिया जिल्ह्यातील मोरगाव अर्जुनी तालुक्यातले सावरटोला हे माझं गाव. गावातल्या गावात रोजगार मिळावा ही इथल्या लोकांची, विशेषत: महिलांची मागणी आहे. एकेकटयाने मांडून प्रश्न सुटत नाहीत त्यामुळे आम्ही प्रथम एकत्र यायचं ठरवलं. जवळपास २३० मजूर एकत्र आले आणि विकल्प मजूर संघटना तयार झाली. फेब्रुवारी २०२१ मध्ये सर्वांनी मिळून १०० दिवसांचं काम मिळावं ही मागणी केली. अर्ज तर लिहिला पण लोक सरपंच, ग्रामसेवकाला भेटून अर्ज द्यायला घाबरत होते. या गावात महिलांची चांगली एकजूट झाली आहे. नियमित महिला सभाही होतात. कामाच्या मागणीचा अर्ज नेऊन द्यायला मी पुढाकार घेतला, सोबत यायला ३० महिला तयार झाल्या. महिलांना एकत्र आलेलं पाहून आणि त्यांची मागणी ऐकून ग्रामसेवकावर चांगला दबाव आला, त्याला म्हणणं ऐकून घ्यावंच लागलं. संघटनेच्या महिला म्हणाल्या, 'आम्हाला काम मागणीसाठी नमुना चार फार्म भरायचा आहे व नमुना पाचची पोचपावती पाहिजे आहे.' पोच देत नाही असं म्हणत ग्रामसेवक उलट सुलट बोलायला लागला. महिलांनी मात्र हा मुद्दा लावूनच धरला. 'नमुना ४ भरल्यानंतर नमुना ५ची पावती दिलीच पाहिजे, तो पुरावा आहे आमच्यासाठी. आमच्या जॉबकार्डवरच हा नियम लिहिलेला आहे.' दुसरी म्हणाली, 'तुम्ही देणार की नाही एवढं सांगा, नाहीतर आम्ही पंचायत समितीमधे जाणार'. खूप वादावादी झाली. महिलांनी मागणी लावून धरली. त्याला वाटलं या गावातल्या महिला फार काही करू शकणार नाहीत, त्यामुळे 'तुम्हाला जिथं जायचं तिथं जा.'असं म्हणून त्यानं पोच द्यायला नकारच दिला.

दुसऱ्याच दिवशी सगळ्यांनी मिळून मोरगाव अर्जुनी पंचायत समितीला जायचं ठरवलं. एक ट्रॅक्टर करून आम्ही सगळ्याजणी मिळून तहसील कार्यालयात पोहचलो. तिथेही इतक्या संख्येनं आलेल्या महिला पाहून तहसीलदार चकीत झाले. महिलांनी कालचा प्रसंग सांगितला.'महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी कायदा २००५ या अधिनियमानुसार आम्ही फॉर्म ४ भरून कामाची मागणी केली, पण पोचपावती द्यायला ग्रामसेवक टाळाटाळ करतोय म्हणून आम्हाला तुमच्याकडे यावं लागलं'. सर्व महिला टेबलाभोवती उभ्या राहून आपल्या न्याय्य हक्काची मागणी करू लागल्या. तहसीलदाराने लगेचच सरपंचांना फोन लावून ग्रामसेवक, रोजगार सेवकासह तहसील कार्यालयात यायला सांगितलं. जे काम गावातच व्हायला हवं होतं ते करायला या महिलांना तहसीलपर्यंत का यावं लागलं, असा सवाल त्यांनी ग्रामसेवकाला विचारला. सर्व फॉर्म स्वीकारून शिक्के दिले. काम होईल असं आश्वासन दिलं..

खरोखरच त्यांनी दिलेला शब्द पाळला. बरोबर पंधरा दिवसात तलाव खोलीकरणाच्या कामाची मंजुरी आली. फेब्रुवारी २०२१ अखेर ४५० मजुरांना त्यावर काम मिळालं. काम महिनाभर चाललं आणि बंद झालं. मजुरांनी तर १०० दिवसांच्या कामाची मागणी केली होती, तरी काम का थांबलं, हे विचारायला मजुरांनी बीडीओ ऑफीस गाठलं. पुन्हा मार्चपासून काम सुरू झाले जे एप्रिलपर्यंत चालू राहिलं. तलाव खोलीकरणाच्या कामाबरोबरच नाली सरळीकरणाचेही काम सुरू करण्यात आलं. मनरेगाचा कायदा आहे, पण या कायद्याच्या अंमलबजावणीसाठी आणि मजुरांच्या हक्कासाठी खूप संघर्ष करावा लागत आहे. याच संघर्षातून गावात आज रोजगार उपलब्ध झाला आहे. संघर्ष करायचा तर संघटना हवी. एकीचे बळ आणि त्याला कायद्याच्या माहितीची जोड मिळाली की लोकांचा फायदा होतो, हे या अनुभवावरून आम्ही शिकलो.





# २०) पूर्ण १०० दिवसांचा रोजगार मिळवणारे सितारामपेठ

**शंकर श्रावण भरडे**

ताडोबा–अंधारी व्याघ्र प्रकल्पाच्या बफर वनक्षेत्रात सितारामपेठ हे गाव वसलेलं आहे. या आदिवासी बहुल गावाची लोकसंख्या १७७ असून आदिवासींसोबतच बौध्द, ओबीसी, मुस्लीम कुटुंबंही राहतात. या अल्पभूधारक लोकांची उपजिविका जंगलावर अवलंबून आहे. जंगलातील बांबू आणून त्याचे कडे, डाले बनवून विकण्याचे काम ते करतात. पण वाढत्या वाघांच्या भीतीमुळे जीव धोक्यात घालून हे काम चालू ठेवणे त्यांना शक्य नव्हतं. 'आम्हाला सुरक्षित ठिकाणी रोजगार हवाय,' ही इथल्या गावकऱ्यांची मागणी होती.

सितारामपेठमधल्या रामभाऊ धांडे, विष्णु नैताम, पंढरी उईके यांनी पुढाकार घेऊन १७ डिसेंबर २०२१ ला मिटींग घेतली. रोजगार हमीतून कामाची मागणी करता येते हे समजल्यावर लोकांनी तयारी दाखवली. कामाच्या मागणीचा अर्ज प्रत्येकाने स्वत:च्या हातानं कसा भरायचा हे समजून घेतलं. पुढच्या काही दिवसातच गावातून ३२ मजुरांनी ३१ मार्चपर्यंत काम मिळावे अशा मागणीचा अर्ज करून ग्रामपंचायतीला दिला. लगेचच मजगीचे कामही सुरू झाले. सुरुवातीला २२ जणांना काम मिळालं. पहिल्या हप्त्याची मजुरी रूपये ९६ ते १२० रुपये एवढीच पडल्यानं काहीजण नाराज झाले. पण निदान काम तरी मागणीप्रमाणे सुरू आहे, याचं समाधान होतं. पुन्हा जोमानं काम केलं. दुसऱ्या हप्त्यात मजुरी रू. २२५ ते २४५ इतकी झाली. आता लोकांना विश्वास आला. इथवर सगळं तत्परतेनं आणि सुरळीत झालं होतं.





अचानक पाऊस आल्यानं ७ ते १५ जानेवारी २०२२ काम बंद झाले. १६ जानेवारीला पाऊस ओसरला, पण कामाच्या ठिकाणी पाणी साचल्यानं काम करणं शक्य नव्हतं. इथलं पाणी ओसरेपर्यंत दुसऱ्या ठिकाणी काम द्या, ही लोकांची मागणी होती. तर इंजिनिअर मानायला तयार नव्हता. 'आधीचं काम पूर्ण होत नाही तोवर दुसरं काम देता येत नाही.' असं तो सांगत होता.


आपण काम तर ३१ मार्च पर्यंत मागितलंय, पण आता हातात काम नाही. हा आपल्यावर अन्याय आहे, हे मजुरांचं म्हणणं होतं. १९ जानेवारीला सगळ्यांची मिटींग झाली, त्यात चर्चा झाली. त्यांना सांगितलं की अन्याय झालाय असं वाटत असेल, तर वरिष्ठांकडे दाद मागता येईल. सर्वानुमते तक्रार करण्याचे ठरले आणि तक्रार अर्जातील मुद्द्यांवर चर्चा झाली. त्यानुसार सर्व परिस्थिती लिहून काढली आणि नमुना ५चा संदर्भ देत एकतर काम द्या किंवा बेरोजगार भत्ता मंजूर करून बँकेत जमा करा, या मागणीचा तक्रार अर्ज सर्वांच्या सही/अंगठ्यानिशी तयार झाला. सर्वांच्या प्रतिनिधी म्हणून हर्षकला देवानंद नैताम यांनी तहसिलदार व पंचायत समितीमध्ये संवर्ग विकास अधिकारी यांना अर्ज देऊन सही शिक्यानिशी पोच घेतली.

अर्जाचा अपेक्षित परिणाम झाला, कारण मजुरांची मागणी रास्त होती. संबंधित इंजिनिअरवर दबाव आला. आपण मजुरांना असं बोललोच नव्हतो, असे शब्द तो फिरवू लागला. मजूर प्रतिनिधि हर्षकला नैताम व रामभाऊ धांडे यांनाही त्याने फोन केला, 'तुम्ही मला तक्रार करण्याचे अगोदर सांगितले असते तर मी काम दिले असते' असे म्हणू लागला. पण तांत्रिक सहाय्यकाने जर आधीच परिस्थिती ओळखून सहकार्य केलं असतं तर तक्रार करायची वेळंच आली नसती. मजुरांना नविन काम त्वरित उपलब्ध करुन देण्यासाठी वेगाने हालचाली सुरू झाल्या. गावातील किशोर कोवे यांचे कागदपत्र घेऊन मजगी कामाचे नवे अंदाजपत्रक करून २४ जानेवारी पासून काम सुरु झालं. त्यात २४ मजुरांना काम मिळालं.

आपल्या हक्कांची जाणीव झाली आणि कायद्यानुसार काय कारवाई करायची हे समजल्याने मजूर मागे हटले नाहीत आणि आपल्या मागणीनुसार काम त्यांनी मिळवले. या वर्षामध्ये १९४ कुटुंबाना १०० दिवस काम मिळाले. काम मिळालेल्या कुटुंबाची संख्या यंदा पूर्वीपेक्षा खूप वाढली हे उत्साह वाढवणारं आहे.

## ग्रामपंचायत सहभाग

१) मजुर नोंदणी.
२) जॉब कार्ड तयार करणे.
३) काम मागणी.
४) संबंधीत रेकॉर्ड, माहिती तयार करणे, सांभाळणे.
५) गावाच्या कामांचा नियोजन आराखडा तयार करणे.
६) ग्रामसभेतून हा विषय चर्चेसाठी घेणे
७) गावातील प्रत्येक गरजू मजुराला काम मिळवून देणे.
८) हजेरी पत्रक, मोजमाप, मजुरी पत्रकाची प्रत असणे.
९) मजुरी वाटपात सहभाग घेणे.
१०) १५ ऑगस्ट २६ जानेवारी २ ऑक्टोबर १ मे या ग्रामसभा नरेगाच्या कामासाठी व मजुरांना त्याच्या शेतात लाभाची कामे सुचविण्साठी अतिशय महत्वाच्या असतात.






# २१) मासेमारी व्यवसायाला रोजगार हमीचा जोड

**शंकर श्रावण भरडे**

विदर्भातल्या चंद्रपूर जिल्ह्यातील बहुतेक अल्पभूधारक आणि भूमीहीन मुख्यत: मासेमारी करतात. भद्रावती तालुक्यातील सोनेगाव(तुकूम) गावातला संपूर्ण मासेमारी समूह भूमीहीन असून पावसाळा व हिवाळ्यातील नैसर्गिक मासेमारी हेच त्यांच्या उपजिविकेचं साधन आहे. हा व्यवसाय बहुतांश पुरुषांच्या हातात असून त्यात महीलांना त्यात स्थान नाही. त्यामुळे महीलांना दुसऱ्याच्या शेतात मजुरीला जावं लागतं. शेतीचा हंगाम संपला की त्यांच्यापुढे कामाची मोठी समस्या निर्माण होते. ती सोडवण्यासाठी आणि महिलांना स्थानिक पातळीवरच काम मिळावं यासाठी मासेमारी व्यवसायात महीलांना जोडून घेण्याची कल्पना आम्ही राबवायचं ठरवलं. या कामासाठी पर्यावरण मित्र संस्थेचे ॲड. विजय देठे, मासेमारी विषयातील तज्ज्ञ मनिषभाऊ रंजनकर, नंदूभाऊ मेश्राम, वाल्मिक मच्छीमारी सेवा सहकारी संस्थेचे संदीपभाऊ यांची मदत झाली.

एप्रिल २०२१ पासून महिलांची मच्छिमार संस्था तयार करण्याबरोबरच त्यांना रोजगार हमीची माहिती देऊन गावात काम मिळवून द्यायला सुरुवात केली. या कामात पुढाकार घेणाऱ्या इंदीरा नन्नावरेंनी ४ नोव्हेंबर २०२१ ला गावात रोजगार हमीची मिटींग लावली. मिटींगच्या आधी गावात फिरून त्यांनी सर्वांना माहिती दिली. पण कोणाचाच विश्वास बसेना. 'कामच नाही तर सरकार तरी काम कुठून देणार?' हा सर्व पुरुषांचा प्रश्न. 'रोजगार हमीचं काम भेटतं, असं गावात सांगितलं तर लोकं इंदिराबाईचीच टिंगल करायला लागले आहे. त्यांच्या शब्दावर विश्वास असलेल्या पाच-सहा जणी मिटींगला जमलेल्या. मिटींग सुरू झाल्यावर उत्सुकतेनं आणखी महिला, पुरुष, लहान बच्चे पण आले. रोजगार हमीची प्रक्रिया सविस्तर समजावून सांगितल्यावर मी विचारलं 'कामाची गरज कोणाकोणाला आहे आणि कधीपासून काम पाहीजे आहे?' ज्यांची तयार होती त्या १९ कुटुंबांनी नमुना ४ अर्ज लगेच भरून घेतले. त्यात १५ जानेवारी पासून ३० जून २०२२ पर्यंत कामाची मागणी केली. त्याच दिवशी नमुना ४ ग्राम पंचायतला देऊन नमुना ५ घेतला. १८ जानेवरीला तलावाच्या खोलीकरणाचं काम सुरू झालं. पहील्या दिवशी ५९ मजूर कामावर होते. आठवड्याभराच्या कामानं लोकांचा विश्वास वाढला. दुसऱ्या आठवड्यापासून मजुरांची संख्या ११८ झाली. त्यांच्या कामाची मजुरी रू. ३०० च्या वर मिळाली. गावात पहिल्यांदाच सुरू झालेली रोजगार हमी योजना यशस्वीपणे राबवली गेली. गावातच काम मिळाल्याचा आनंद मजुरांच्या चेहेऱ्यावर पसरला.

या कामामुळे मासेमारीसाठी पाण्याची उपलब्धता वाढली, लोकांचे माशांचे उत्पादन वाढून उत्पन्न वाढेल आणि हा व्यवसाय चांगला जोम धरेल असे वाटते. गावातच रोजगार मिळाला याचे समाधान आहे. कारण स्थलांतराला पर्याय उपलब्ध झाल्याने लोक आनंदी आहे.





# २२) पालकांना शेतीची आणि मुलांना शाळेची गोडी लावणारा खोमारपाड्याचे शिक्षक

**केशव गभाले आणि आनंद बांबळे**

एक शिक्षक ज्याने स्वत:च्या शाळेतील मुलांची उपस्थिती वाढावी म्हणून शिक्षण विभागाच्या बालरक्षक चळवळीला प्रतिसाद दिला. मुलांचे स्थलांतर थांबावे यासाठी काम सुरू केले. पर्यायाने पालकांचे स्थलांतर थांबवणे क्रमप्राप्त होते. त्यासाठी या शिक्षकाने – बाबु चांगदेव मोरे, शाळा खोमारपाडा, विक्रमगड तालुका, पालघर – काय केले त्याची ही गोष्ट.

खोमारपाडा हे डोंगराच्या पायथ्याला असलेलं आणि जंगलाच्या नजिक वसलेलं गाव साधारण १५० घरांचं गाव. पावसाळ्यात इथं भरपूर पाऊस होतो. डोंगरावरून पाणी खाली येतं आणि वाहून जातं. भात हे इथले प्रमुख पीक. गावात सिंचनाची सुविधा नसल्यानं लोक फक्त पावसाळी शेती करायचे. एरवी मजुरीसाठी पालघर वा ठाणे जिल्ह्यातल्या वीट भट्ट्यावर कामाला जायचे. मोरे सरांनी पाहिलं की हंगामी स्थलांतर इथली नित्याची बाब आहे.

मूळचे बीड जिल्ह्याचे बाबु मोरे डिसेंबर २०१३ मध्ये शिक्षक म्हणून खोमारपाडा प्राथमिक शाळेत शिक्षक म्हणून रूजू झाले. तेव्हा त्यांना समजलं की इथे ९०%हून जास्त कुटुंबं रोजगारासाठी स्थलांतर करतात आणि त्यातले २०% पालक सोबत मुलांनाही नेतात. जेव्हा ही मुलं गावी परततात, तेव्हा ती अभ्यास विसरलेली असतात. त्यामुळे शाळेत येतात तेव्हा त्यांचे शिक्षण कच्चे राहते, ती मागे पडतात. एकट-पीक शेती हे इथल्या स्थलांतराचं मूळ कारण आहे आणि ते दूर होण्यासाठी गावकऱ्यांना गावातच काम मिळालं पाहिजे. या प्रश्नावर विचार करून त्यांनी मनात एक योजना आखली आणि ती पालकांना सांगायचं ठरवलं.

२०१६ मध्ये त्यांनी एक पालक सभा बोलावली. सर्वसाधारणपणे मुलांच्या शिक्षणाविषयी बोलण्यासाठी पालक सभा होतात, पण ही सभा मुलांच्या शैक्षणिक प्रगतीविषयी नव्हती, पालकांच्या आर्थिक परिस्थितीविषयी होती. बैठकीला ३५-४० पालक जमले होते. तुम्ही बाहेर कामाला जाता त्याऐवजी इथं काम मिळालं आणि तिकडे जेवढे पैसे मिळतात ते इथेच मिळाले तर मोरे सरांच्या या प्रश्नाने पालकांच्या चेहऱ्यावर प्रश्नचिन्ह उमटले. तुम्ही मजुरीला बाहेरगावी जाता, सोबत मुलांनाही घेईन जाता. तिथे त्यांची आबाळ होते आणि शिक्षणही मागे पडतं, सर म्हणाले. पालकांना हे तर पटत होतं, पण त्यांच्याही पुढे दुसरा मार्ग नव्हता. सर्वांकडे लहान लहान जमिनी होत्या, पण गावात पाण्याची म्हणावी तशी सोय नाही. सरांनी त्यांना विश्वास दिला की गावातल्या गावात काम निघू शकेल आणि पाण्याची सोयही होऊ शकेल. रोजगार हमीतून जलसंधारणाची कामं करता येतील आणि उपलब्ध पाण्यावर गावात भाजीपाला पिकवता येईल. पालकांचा चटकन विश्वास बसेना. तरी अनिश्चेनं, सर सांगतायत म्हणून करून बघूया असं वाटून काहीजण तयार झाले.

मोरे सर हाडाचे शिक्षक होते. केवळ पुस्तकी शिक्षण त्यांना मान्य नव्हते. त्यांनी शाळेसमोरच्या अर्धा गुंठा पडीक जागेला आपली शेतीची प्रयोगशाळा बनवली. ही जमीन त्यांनी मुलांच्या मदतीने साफ केली. तिथं मेथी, पालक, टोमॅटो, कांदा, कोथिंबीर अशी लागवड त्यांना सोबत घेऊन केली. तयार होणाऱ्या भाज्या मुलांच्या माध्यान्न आहारात दिल्या. यांमुळे मुलांना ताज्या, पौष्टिक भाज्या मिळाल्या आणि पालकांनाही प्रेरणा मिळाली. या प्रात्यक्षिकातून मुलांना शेतीची अधिक माहिती झाली.

आपल्या शैक्षणिक कामासोबतच सुट्टी किंवा शाळेच्या व्यतिरिक्त वेळेत मोरेसर घरी वा शेतात जाऊन लोकांसोबत चर्चा करायचे. रोजगार सेवकाच्या आणि ग्रामपंचायतीच्या मदतीनं गावात एकेक कामं सुरू झाली. २०१३-१४ पासून गावात मनरेगाची महत्त्वाची कामं झाली. जलसंधारणासाठी चर खोदले; गावतळ्यातला गाळ काढला, ज्यामुळे वाहून जाणारं पाणी थांबू लागलं;

शेततळी तयार केली, ज्यामुळे पावसाळ्याखेरीज अन्य मोसमातील पिकांचं नियोजन शक्य झालं; नाल्याचं सरळीकरण करून पाण्याला वाट करून दिली, ज्यामुळे डोंगरावरून वाहात येणारे पाणी शेतात घुसायला अटकाव झाला व शेताचे नुकसान थांबले; जंगलात जाण्यासाठी वाट केली व जंगलात वनीकरण केलं ज्यामुळे वनसंवर्धन झालं आणि जाळरेषा आखल्या ज्यामुळे आगीपासून पिकांचा व झाडांचा बचाव शक्य झाला.

भाजीपाला, आंबा व काजू सारखी फळे व फुलांची लागवड करायला लोकांना उद्युक्त केलं आणि त्यासाठी हरप्रकारे मदत व मार्गदर्शन केलं. याखेरीज गुरांसाठी गोठे आणि कंपोस्ट खताचे खड्डे यांसारख्या वैयक्तिक लाभाच्या योजनाही भरपूर प्रमाणात राबवल्या. या सगळ्या बदलांमुळे पावसाळ्याखेरीज शेती न करणारे खोमारपाड्याचे गावकरी आता दुसरे पीक घेऊ लागले. भाजीपाला, फळे, फुले यांमुळे उत्पन्नाचे नवे साधन त्यांना मिळाले. कालांतराने गावात दोन वीटभट्ट्याही सुरू झाल्या, ज्यामुळे भूमीहीन कुटुंबांना गावात काम मिळू शकलं. वनसंवर्धनामुळे वन्य प्राणी जंगलात राहू लागले, त्यांचे माणसांच्या वस्तीकडे फिरकणे कमी झाले

गावात फळझाडेही लावलेली आहेत. त्यातून आंबा, आवळा, काजू, जांभूळ, सीताफळ, केळी, पपई याचे उत्पादन होते. अक्षरधारा फौंडेशनने या फळझाडांचे वाटप केले आहे. शेती, फळझाडांचे उत्पादन पूर्णत: सेंद्रीय पद्धतीने होते. त्यामुळे त्याला मागणीही आहे.

या प्रयत्नातून शेतकऱ्यांना करावं लागणारं सक्तीचं स्थलांतर कमी झाले. पाणी, वीज, जमीन आदी संसाधनांच्या मर्यादेमुळे अजून काही शेतकऱ्यांना कमाईसाठी बाहेर जावेच लागते आहे. ही समस्याही कालांतराने दूर होईल. एका शिक्षकाच्या दूरदर्शी आणि अथक प्रयत्नांनी मुलांना पुन्हा शाळेशी तर पालकांना शेतीशी जोडले!

# २७) दहा वर्षात कोटंबीचा कायापालट

नाशिक जिल्हयातल्या त्र्यंबकेश्वर तालुक्यातील कोटंबी गाव. चहुबाजूंनी डोंगररांगांचा कोट घातलेले गाव म्हणून कोटंबी हे गांव नाशिकपासून साधारण ८० किमी अंतरावर हिरव्याकच्च झाडाझुडापांनी सजलेल्या डोंगरदऱ्यात वाडीपाड्यावर राहणारे इथले आदिवासी. त्यांचा मुख्य व्यवसाय शेती असून भात, नागली, वरई ही मुख्य पिकं आणि त्यासोबतची पिकं म्हणजे उडीद, मूग, तूर आणि भुइमूग. सिंचनाची सोय नसल्यानं मोजकेच शेतकरी रब्बी पिकं घेतात.

साधारण साधारण २०० कुटुंबसंख्या असलेल्या शेतीखेरीज दुसरा उद्योग इथं नाही. रोजगारहमीचं काम मात्र गावात जोमानं चालतं. मागच्या वर्षी ६०हून अधिक कुटुंबाना १०० दिवसांपेक्षा जास्त दिवस काम मिळालं होतं. त्यांना या वर्षीपण जास्त काम मिळालं आहे. याचं कारणही तसंच आहे, ते समजून घ्यायला दहा वर्षे मागं जावं लागेल.

खरीपाची पिक काढणी झाली की स्थलांतर करायचं हा गावकऱ्यांचा नित्यक्रम. मोजक्या आवश्यक गोष्टींचं गाठोडं बांधून लोक नाशिकला कामासाठी येत असत. त्याच काळात कोटंबी शेजारी असलेल्या हांडपांड्यात नरेगाचं काम  सुरू झालं होतं, लोकांना गावातच काम मिळू लागलं होतं. ते पाहून आपल्यालाही कामं मिळू शकतील हे त्यांच्या लक्षात आलं. २०११-१२ साली कोटंबीच्या गावकऱ्यांनी पहिल्यांदा रोजगार हमीअंतर्गत कामाच्या मागणीचे अर्ज भरले. सुरुवातीला साधारण ३० मजुरांनी मागणी अर्ज भरून ग्रामपंचायत कार्यालयात ग्रामसेवकाकडे दिले. पण ते मागणी स्वीकारायला तयार नव्हते. गावकऱ्यांनी आठ दिवस वाट पाहिली, पण त्यांनी मागणी काही घेतली नाही! तेव्हा गावकऱ्यांनी आपले अर्ज पंचायत समितीत जाऊन द्यायचे ठरवले. तिथे पिंगळे बिडीओसर होते. त्यांनीही 'टपालात द्या' असं सांगितलं. पुढचे दोन महिने या कामाचा पाठपुरावा केला. पण काम काही सुरू झालं नाही. शेवटी लोक शहराकडे निघून केले.

त्याच दरम्यान प्रगती अभियान त्र्यंबकेश्वर, पेठ आणि इगतपुरी तालुक्यातल्या ग्रामरोजागर सेवक आणि स्थानिक होतकरू तरुणांना (गावकार्यकर्ता) प्रशिक्षण देण्याचे काम करत होती. कोटंबीचा रोजागर सेवक आणि मी गाव कार्यकर्ता म्हणुन या प्रशिक्षणात सहभागी होऊ लागलो.

दर महिन्याला होणाऱ्या या प्रशिक्षणामध्ये नरेगासंबंधीचे सगळे विषय एकेक करून घेतले जात - मनरेगा कायद्याची माहिती, मजुरांचे अधिकार, ग्रामसभेचे महत्व, कृतीआराखडा कसा तयार होतो, शेल्फ म्हणजे काय, काम कसे सुरू होते, रोजगार सेवकांचे कर्तव्य व आधिकार, मानधन कसे वाढेल, सरपंचाचे काम, वैयक्तिक शेती दुरुस्तीची कामं नरेगातून कशी मिळवता येतील इत्यादी. ही माहिती गाव कार्यकर्त्याने लोकांपर्यंत कशी न्यायची, नरेगासाठी कसे काम करायचे याविषयीही प्रशिक्षणात चर्चा व्हायची. माहिती अधिकाराचा वापर करून हवी ती माहिती कशी मिळवायची, वनहक्क दावे कसे करायचे अशी नरेगाला पूरक कायद्यांची व लोकांना त्यांच्या अधिकारांची जाणीव करून देणारी माहितीही या प्रशिक्षणात समाविष्ट होती. या सगळ्याचा फायदा पुढील वर्षी झाला. कोटंबीत ५० मजुरांनी कामाची मागणी केली आणि आराखड्यात शेती दुरुस्तीची कामे मंजूर करून घेतली.





काम मिळेल. म्हटल्याप्रमाणे कामं सुरुही झाली आणि मागणी अर्ज करणाऱ्यांची संख्याही वाढू लागली. २०१४–१५ च्या डिसेंबरला २४५ मजुरांनी कामाची मागणी भरली. आराखड्यात कामं नसल्यानं ग्रामसेवक मागणी घेण्यास पुन्हा टाळाटाळ करू लागला. मग सुरेश फुफाने रोजगार सेवक आणि गावकार्यकर्ता म्हणुन मी व संगीता ताइ आम्ही संस्थेच्या मदतीने तहसीलदार यांच्याकडे मागणी दिली. त्यांनी ती बिडिओकडे दिली, त्यांच्याकडून ती पुन्हा ग्रामसेवकाकडेच आली. त्याला तर काम सुरू करायचेच नव्हते.

मग गावात मोठी बैठक झाली आणि हेल्पलाइनवरून जिल्हयाच्या तक्रारनिवारण अधिकाऱ्यांकडे तक्रार करायचे ठरले. त्याचा परिणाम असा झाला की ग्रामसवेकांना नोटीस दिली गेली. तक्रार निवारण आधिकाऱ्यांकडे दोन बैठका झाल्या, बीडीओंकडे अनेक बैठका झाल्या, पण मुद्दा काही केल्या सुटत नव्हता. मग बेरोजगार भत्ता मिळावा हा अर्ज करण्यावाचून पर्याय उरला नाही. ग्रामसवेकांनी तो अर्जही स्वीकारता नाही. मात्र तातडीची ग्रामसभा आयोजित करुन गावतलावातील गाळ काढण्याचं काम सुरू करण्यास मंजुरी मिळवून एस्टीमेटसहीत पुढील प्रक्रीया पूर्ण केल्या आणि मार्चमध्ये काम सुरू झालं.

या अनुभवानंतर गावाने वेगवेगळ्या गोष्टी अवलंबल्या. गावातील प्रत्येक कुटुंबाने आपल्या शेतात शेतदुरुस्तीची कामे गाव आराखड्यात समाविष्ट करून घेतली. दगडी बांधाचे कामे, साखळी बांध, सिसिटी इत्यादी. याशिवाय सामाजिक वनीकरणाच्या कामांच्या नियोजनात सहभाग वाढवला आणि कामांचा भरीव असा आराखडा तयार होऊ लागला. परिणामी गावात मागणीच्या प्रमाणात कामेही उपलब्ध झाली. गावात काम मिळेल हा विश्वास लोकांना आला आणि त्यांनी कामाला बाहेरगावी जाणे कमी केले, नंतर पूर्ण थांबवले.

नरेगा वेबसाइटच्या डेटानुसार २०१८ ते २०२२ पर्यंत दर वर्षी गावात ८ ते १० लाखाचे काम झाले. या प्रत्येक वर्षांत १०० ते १७० कुटुंबांना काम मिळालं. दर वर्षी ५ हजार मनुष्य दिवस काम निर्माण होत असून मजुरांत महिलांचं प्रमाण ५०% म्हणजे पुरुषांच्या बरोबरीनं आहे.

दगडी बांधासारख्या सार्वजनिक कामासोबतच गोठे, बांध, शेततळी इत्यादी कामे झाल्याने शेती आणि शेतीपूरक कामांत सुधारणा झाली. पावसाळ्यात एरवी पळत जाणारे पाणी साखळी दगडीबांधामुळे थांबत थांबत जाऊ लागले. परिणामी पाणी जमिनीत झिरपले आणि शेतीला फायदा झाला. शेततळ्यात पाणी साठू लागले, त्यामुळे विहिरींतील पाणी साठा वाढला. पिण्याच्या पाण्याचा गंभीर प्रश्न सुटला.

सर्वात महत्वाचे, कोविड काळात सर्व रोजगार बंद असतांना देखील गावात १४५ कुटुंबांतील ३३५ मजुरांनी नरेगाचे काम केले. ज्यात ५००० मुनष्यदिवस काम तयार झाले. या आपत्तीच्या काळात लोकांना जगण्याचा आधार आणि उमेद या कामाने दिली. मनरेगाची ही खूप मोठी ताकद आहे, जी अन्य कोणत्याही योजनेत नाही.

कोटंबी, हांडपाडा आणि आजूबाजूच्या गावातून मजूर उपस्थिती पाहता त्र्यंबक पंचायत समितीनेच पुढाकार घेऊन ग्रामपंचायतींना नोटीसा दिल्या आहेत की मागणी आणि नियोजन आराखडा हे दोन्ही सुत्रं एकमेकात गुंफली जावीत. म्हणजे मागणी आली की लगेच काम सुरू होईल. ही घडी बसायला, त्याची समज तयार व्हायला आणि गाव व प्रशासन यांच्या नियोजनाला तब्बल १० वर्षांचा कालावधी लागला. आज नरेगाच्या कामात जी सहजता आपल्याला कोंटबीत दिसत आहे त्यामागे संस्थेने आणि कार्यकर्त्यांनी दहा वर्षे जिद्दीने व आत्मविश्वासाने केलेला संघर्ष आहे हे विसरुन चालणार नाही.

आज जेव्हा गावात मजुरांना भेटलो तेव्हा वेगळ्या प्रश्नाने डोके वर काढले. काही कुटुंबांना १०० दिवसांपेक्षा जास्त काम हवं आहे. महाराष्ट्र शासनानं तशी तरतूदही केली आहे. त्याची अंमलबजावणी कशी करून घ्यायची या प्रश्नाचा भुंगा आता डोक्यात फिरतो आहे!

## २४) कोविडकाळात मनरेगाला प्राथमिकता देणारी नाशिक जिल्हा परिषद

**आश्विनी कुलकर्णी**

मार्च २०२० च्या शेवटच्या आठवड्यात पहिला लॉकडाऊन जाहीर झाला, तो किती काळ चालेल याचा अंदाज नव्हता. रोजगारासाठी गावाबाहेर गेलेले लोक घरी परतू लागले. त्याकाळात कोविडची धास्तीही लोकांच्या मनात होती. या समग्र परिस्थितीचा अंदाज घेत नाशिक जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी लिना बनसोड एकेका गोष्टीचे नियोजन करत होत्या. त्यांच्या लोकाभिमुख नेतृत्वशैलीचा प्रशासनाला परिचय होता, कोविडबद्दल जनजागृती करण्यापासून सुरक्षितेच्या उपाययोजना लोकांना समजावून देण्यापासुन मुलांच्या आहारात, मध्यान्ह भोजन आणि अंगणवाडी पुरक आहार मिळण्यात खंड पडू नये यासाठी विविध उपाययोजना करण्यापासून महिलांच्या सुरक्षिततेची काळजी घेण्यापर्यंत... विविध पातळ्यांवर काम चालू झाले.

लॉकडाऊन सुरू होऊन दोन आठवडे उलटले. एप्रिल २०२० मध्ये सीईओ मॅडमना एक गोष्ट प्रकर्षाने जाणवली. लोक गावी परतल्याने त्यांना आता गावात कामाची गरज होती आणि नाशिकच्या आदिवासी भागात तरी उन्हाळ्याच्या काळात लोक रोजगार हमीच्या कामांवर अवलंबुन असतात कोविड बाबतची सुरक्षा राखणे जितके महत्त्वाचे आहे तितकेच लोकांच्या हाताला काम मिळेल याची खबरदारी घेणेही तितकेच आवश्यक आहे. काम मिळाले तर कमाई होईल आणि घर चालेल. अन्यथा लोक हवालदील होऊन अन्यत्र काम शोधायला जातील आणि तसे करणे कोविडकाळात जोखमीचे ठरेल.

सीईओ मॅडमनी माझ्याशी संपर्क साधला आणि मनरेगातून आपण गावात कोणकोणत्या गोष्टी तातडीने सुरू करू शकतो याविषयी विचारविनिमय केला. 'मागेल त्याला काम मागेल तेव्हा काम, मागेल तितके काम हे मनरेगाचे ब्रीद आहे, त्यातील मतितार्थ या कोविडकाळाने अधोरेखित केला. लोकांच्या हाताला काम देण्याच्या समस्येचे उत्तरही सीईओ मॅडमना याच योजनेत सापडले. तातडीने कामाची आखणी केली.

कामाच्या आखणीमध्ये नाशिक जिल्हा परिषदेने दोन महत्त्वाच्या गोष्टी केल्या पहिली, मनरेगाची कामे गावात मिळतील याची माहिती लोकांपर्यंत पोहोचवली. ते काम मिळवण्यामध्ये लोकांना येणाऱ्या संभाव्य अडचणी दूर केल्या जसे की, जॉब कार्ड नसलेल्यांना प्राधान्याने जॉब कार्ड दिले गरजू गरीब कुटुंबांना प्राधान्याने जॉब कार्ड दिले.

दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे कोविड प्रतिबंध पाळूनही मनरेगातून कोणकोणती कामे सुरू करता येतील यावर निर्णय घेतले. एकमेकांपासून सुरक्षित अंतर राखून काम करता येतील अशी कामे काढली. या काळात सरकारी कार्यालयेही पूर्ण क्षमतेने चालू नव्हती, निम्मे कर्मचारी कार्यालयात होते, तर निम्मे घरून काम करत होते, अपुरे मनुष्यबळ सक्रिय असल्याने मोजमापाची भेट पुढेमागे होण्याची शक्यता होती. हे लक्षात घेऊन मोजमापाअभावी अडून पडणार नाहीत अशी कामे काढण्यावर भर दिला, जसे वृक्ष लागवडीसाठी खड्डे वा शोष खड्डे २३ एप्रिल २०२० पासून नाशिक जिल्ह्यामध्ये गावागावात मनरेगाची कामे सुरू झाली.

हे असे नियोजन करत असताना, नरेगाच्या ताकदीचा पुनश्च अनुभव आला. जसजसे लॉकडाऊनचे प्रतीबंध शिथील होऊ लागले तसतसे त्यांनी रोजगार हमीवर अनेकविध प्रकारे वाढवायला सुरुवात केली. जिल्ह्यातील गरजू कुटुंबांपर्यंत प्रशासनाने पोचण्याचे प्रयत्न सुरु केले. गरजू, गरीब कुटुंब ओळखायचे निकषही ठरवले – ज्या कुटुंबात कुपोषित बालक/बालके आहेत, ज्यांना कामासाठी सक्तीचे स्थलांतर करावे लागते अशा कुटुंबांपर्यंत पोहोचून त्यांना मनरेगाची कामे उपलब्ध करून देण्यावर भर देण्यात आला.

नाशिक जिल्हा परिषदेने राज्य आणि केंद्र शासनाच्या चालू असलेल्या योजनांमध्ये मनरेगाचा अंतर्भाव केला. उदाहरणार्थ, केंद्र व राज्य शासनाचे संयुक्तपणे चाललेले जलजीवन मिशन, प्रत्येक घरापर्यंत पिण्याचे शुध्द पाणी पुरवण्यासाठी हे मिशन राबवले जात आहे. ज्यासाठी जलस्रोत सक्षम केले पाहिजेत. नाशिक जिल्हा परिषदेने गावातील जलस्रोतांचे पुनरुज्जीवन, पुनर्भरणाची कामे मनरेगाअंतर्गत करायचा निर्णय घेतला.

कोविडकाळातील पहिले वर्ष २०२०-२१ मध्ये त्याआधीच्या वर्षाच्या तुलनेत जवळ जवळ २०% अधिक निधी खर्च केला, तर या वर्षीत मंजूर लेबर बजेटच्या तुलनेत ९०% निधी सहा महिन्यातच खर्च झालेला आहे. नाशिक जिल्ह्यातील फक्त १३ ग्रामपंचायती वगळता इतर सर्व गावांत मनरेगाचे काम पोचवले आहे.

मगरेगावरील कामाचा जोर नाशिक जिल्हा परिषदेने चालुच ठेवला आहे. या वर्षी प्रगती अभियान संस्थेच्या बरोबर जिल्हयातील सर्व पंधरा तालुक्यात ग्राम रोजगार सेवकांचे प्रशिक्षण प्रत्येक पंचायत समितीने आयोजीत केले या प्रशिक्षणात जिल्हा परिषदेचे अधिकारी उपस्थित होते. या प्रक्रियेत मनरेगा राबवणाऱ्या यंत्रणेतील बिनीचा शिलेदार ग्राम रोजगार सेवक यांना सामावुन घेऊन नियोजन आणि अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. हेच यातुन त्यांनी अधोरेखित केले.

यंत्रणेतील सर्व अधिकारी यांचा समन्वय असेल तर अंमलबजावणीतल्या अडचणी थिजून राहत नाहीत. त्या दुर होतात आणी अंमलबजावणी परिणामकारक होऊ शकते. हे जिल्हा परिषदेच्या कामाच्या पध्दतीतुन आवर्जुन लक्षात आले.

'आपण देणारे व लोक घेणारे' ही भावना ठेवून नव्हे तर आपण लोकांसोबत काम करायचे आहे ही धारणा ठेवून काम करण्याची गरज असल्याचे मत सीईओ मॅडम मांडतात. या वृत्तीने काम केले तर उत्तरांचे मार्ग दिसू लागतात, प्रश्नांचे अडसर दूर होतात.

ग्रामीण भागात नरेगा ही फक्त लोकांच्या हाताला काम देणारा कार्यक्रम नसून, गावातील इतर विकास कामांची सांगड घालून, दोन वेगवेगळ्या योजनांच्या संगमातून शाश्वत विकास घडवून आणता येतो, हा अनुभव या नाशिक जिल्हा परिषदेच्या या उदाहरणातून दिसतो प्रशासनाकडून नरेगाच्या संबंधित उदासीनता दिसते, असे कार्यकर्त्यांच्या अनुभवाला येत असताना नाशिक जिल्हा परिषदेचे हे प्रयत्न खूप प्रोत्साहन आणि प्रेरणा देणारे आहेत.








# २५) नरेगातून ग्रामसमृध्दी

**सुशासनातून समृध्दीकडे**

**संजय दिलीप वायाळ** - सहाय्यक गटविकास अधिकारी, संगमनेर



अमळनेर पंचायत समितीत १५ नोव्हेंबर २०१७ रोजी मी सहायक गटविकास अधिकारी म्हणून हजर झालो. अमळनेर पंचायत समितीत महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कक्षातील अधिकारी व कर्मचारी यांच्याविषयी नागरिकांच्यां खूप मोठया प्रमाणावर तक्रारी होत्या.

नरेगा अंतर्गत लाभार्थ्यांचे मस्टर वेळेत निघत नसल्याने लाभार्थी वारंवार पंचायत समितीत चकरा मारत होते. वैयक्तिक लाभार्थ्यांचे शौचालयाचे geo-tag झाले नसल्याने वैयक्तिक लाभार्थ्यांचे देयके अदा करता येत नव्हती. नरेगा अंतर्गत सिंचन विहीरींचे प्रस्ताव वर्षानुवर्षे प्रलंबित होते त्यामुळे पदाधिकारी व लाभार्थी वारंवार पंचायत समितीत पाठपुरावा करत होते. अमळनेर तालुक्यातील ६२ गावेही डार्क झोनमध्ये असल्याने या गावांमध्ये सिंचन विहीरींची कामे अनुज्ञेय नसल्याने व याच ठिकाणी सिंचन विहीरींची मागणी मोठया प्रमाणावर असल्याने कुणीही अधिकारी यासंदर्भात निर्णय घेण्याचे धाडस करत नव्हते. नरेगा अंतर्गत कुठल्याही प्रकारची कामे सुरू नव्हती. सन २०१६-२०१७ या वर्षात फक्त ४२००० मनुष्य दिवस रोजगार निर्मिती झाली होती. मी हजर झाल्यानंतर नरेगा कक्षातील अधिकारी कर्मचारी यांना दररोज प्राप्त होणारे मजुरांचे मस्टर त्याच दिवशी काढण्याच्या सूचना दिल्या. त्यामुळे लाभार्थ्यांचे पंचायत समितीला वारंवार चकरा मारणे बंद झाले. सिंचन विहीरीच्या प्रस्तावांची छाननी करुन डार्क झोन मधील गावे व महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या कृती आराखड्यात नाव समाविष्ट नसणाऱ्या त्या लाभार्थ्यांचे प्रस्ताव वगळता बाकी पात्र लाभार्थ्यांच्या नावांच्या यादया प्रकाशित केल्या. परिपूर्ण असणाऱ्या लाभार्थ्यांच्या तात्काळ प्रशासकीय व तांत्रिक मान्यता देऊन सिंचन विहीरींची कामे तात्काळ सुरु केली. सिंचन विहीरींचे अपूर्ण प्रस्ताव असणाऱ्या लाभार्थ्यांशी तात्काळ पत्रव्यवहार करून त्रुटींची पुर्तता करून त्या लाभार्थ्यांनाही तात्काळ सिंचन विहीरी मंजूर केल्या व त्यांनाही प्रशासकीय व तांत्रिक मान्यता देऊन त्यांचीही कामे तात्काळ सुरू केली. त्यानंतरच्या कालावधीत लाभार्थ्यांचे सिंचन विहीरींचे प्रस्ताव सादर होताच तात्काळ मंजुरी देऊन सिंचन विहीरींचा एकही प्रस्ताव प्रलंबित राहणार नाही याची दक्षता घेतली. अमळनेर तालुक्यात आतापर्यंत सिंचन विहीरींची ३११ कामे पूर्ण करण्यात आली आहेत. २०१८-२०१९ या वर्षात जलयुक्त शिवार योजनेत विहीर पुनर्भरणाची कामे मोठया प्रमाणात करण्यात आली. मागील तीन चार वर्षात अमळनेर तालुक्यात विहीर पुनर्भरणाची २८२ कामे करण्यात आली




असून त्याचपैकी १३८ कामे ही अटल भूजल योजनेच्या गावांमध्ये करण्यात आली आहेत. २०१८-२०१९ या वर्षात अमळनेर तालुक्यात प्रधानमंत्री आवास योजना व राज्यस्तरीय घरकुल योजनांची कामे मिशन मोडवर करण्यात आली. महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या माध्यमातुन सर्व घरकुल लाभार्थ्यांचे चार मस्टर काढणे बंधनकारक केले त्यामुळे सर्व घरकूल लाभार्थ्यांना नरेगा अंतर्गत ९० मनुष्य दिवस रोजगार उपलब्ध झाला. तसेच महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत अकुशल निधीचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढून कुशल कामे मोठ्या प्रमाणात करणे शक्य झाले. अमळनेर तालुक्यात जनावरांच्या गोठ्यांची कामांची खूप मोठ्या प्रमाणावर मागणी होती. परंतु कुशल निधीविषयी इतकी भीती घालून ठेवली आहे की शक्यतो जनावरांचे गोठे व इतर वैयक्तिक लाभाच्या योजनांचा लाभ देण्यासाठी प्रशासनात खूप मोठ्या प्रमाणात उदासीनता दिसून येते. माझ्याकडे गटविकास अधिकारी म्हणून कार्यभार असतांना मी तालुक्यातील लाभार्थ्यांना जनावरांचे गोठे नाडेप कंपोस्ट गांडूळ खत व शोषखड्डा यांचे प्रस्ताव सादर करण्याचे आवाहन केले. अमळनेर तालुक्यातील निष्कर्षात बसणाऱ्या सर्व लाभार्थ्यांचे जनावरांचे गोठे मंजूर केले. आतापर्यंत अमळनेर तालुक्यातील दोन हजारांहून अधिक लाभार्थ्यांना जनावरांचे गोठे मंजूर केले आहेत. सुरवातीच्या टप्प्यात कुशल निधी मिळणार की नाही यासंदर्भात संदिग्धता असल्यामुळे मंजुरी मिळाल्यानंतरही लाभार्थी गोठ्यांची कामे सुरू करण्यास इच्छुक नव्हते. परंतु सुरूवातीच्या टप्प्यातील कामे पूर्ण केलेल्या लाभार्थ्यांना वेळेत कुशल निधी मिळाल्यामुळे आज रोजी ३०० पेक्षा जास्त कामे पूर्ण झाली असून दोनशे गोठ्यांची कामे प्रगतीत आहेत. अजून तरी आम्हाला कुशल निधीची कोणत्याही प्रकारची अडचण आली नाही. जळगाव जिल्हयांचे तत्कालीन जिल्हाधिकारी श्री. अविनाश ढाकणे साहेब व जळगाव जिल्हा परिषदेचे मा. मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. बी.एन.पाटील साहेब यांच्या संकल्पनेतून महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या माध्यमातून अभिसरणातून शाळा संरक्षण भिंतीची कामे जळगाव जिल्हयात खूप मोठया प्रमाणावर सुरू असून नरेगा सोबतच चौदावा वित्त आयोग व जिल्हा नियोजन निधी यांचीही जोड देण्यात आली आहे. अमळनेर तालुक्यात शाळा संरक्षण भिंतीची ६० कामे मंजूर असून ४० कामे पुर्ण होऊन १४ कामे प्रगतीत आहे. सन २०२१-२२ या वर्षी लॉकडाऊनच्या कालावधीत शहरी भागातुन ग्रामीण भागात खूप मोठया प्रमाणावर स्थलांतर सुरू झाले. त्यामुळे ग्रामीण भागातील जनतेला शाश्वत स्वरूपाचा रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी अमळनेर तालुक्यात बिहार पॅटर्नच्या माध्यमातून दोन लाख झाडे लावण्याचा संकल्प केला परंतु बिहार पॅटर्न विषयी माहिती नसल्याने काम उशिराने सुरू झाले. त्यामुळे अंदाजपत्रकात खड्डे खोदणे व वृक्षारोपणासाठी रोपे विकत घेण्यासाठी अंदाजपत्रकात तरतुद करणे शक्य झाले नाही. त्यामुळे सामाजिक वनीकरण विभाग य वनविभाभाच्या नर्सरीतून मोफत रोपे मिळण्यासाठी मागणी केली परंतु रोपे तुलनेने छोटी असल्याने व उशिरा लागवड केल्याने झाडांचे जिवंत राहण्याचे प्रमाण कमी होते तरीही जवखेडा,दहिवद,हिंगोणे बु. निम,वासरे,नांद्री,म्हसले या गावांमध्ये बिहार पॅटर्नच्या माध्यमातुन वीस हजार झाडे जगली

असून या माध्यमातून वर्षाला ४०० लोकांना सरासरी १०० मनुष्य दिवस इतका रोजगार उपलब्ध झाला आहे. मागच्या वर्षी बिहार पॅटर्नच्या माध्यमातुन रोजगार उपलब्ध झालेल्या गावांसोबतच इतरही गावांनी यावर्षी वृक्षारोपणाचे मोठया प्रमाणावर नियोजन केले असून यावर्षी एक लाख २८ हजार वृक्षांचे वृक्षारोपण करण्यात आले. यामाध्यमातून अमळनेर तालुक्यात पुढील तीन वर्षांत ११ लाख मनुष्य दिवस इतका रोजगार उपलब्ध होणार आहे. यावर्षी बिहार पॅटर्नच्या कामाची मे महिन्यापासूनच तयारी केल्याने खड्डे खोदणे व रोपे विकत घेण्यासाठी अंदाजपत्रकात तरतूद असून त्यामुळे मोठी रोपे विकत घेणे शक्य आहे. बांधांवरची वृक्षलागवड हे काम पूर्वी सामाजिक वनीकरण विभागाकडे होते परंतु अमळनेर तालुक्यातील शेतकऱ्यांची मागणी लक्षात घेऊन हे काम ग्रामपंचायतींनाही अनुज्ञेत असावे यासाठी आदरणीय अतिरिक्त मुख्य सचिव नंदकुमार साहेब यांच्याशी चर्चा केली. आदरणीय साहेबांना शासकीय पातळीवरुन हा विषय तात्काळ मार्गी लावला. मागील वर्षा अमळनेर तालुक्यातील कळमसरे येथील एका शेतकऱ्याने नरेगा अंतर्गत आपल्या शेतात सिताफळाची ६०० झाडे लावली आहेत. यावर्षी नगाव बुद्रुक येथील विनोद नामदेव जाधव यांनी ३ एकर शेतात २००० सागाचे झाडे लावली आहे आणि जानवे लोनचाराम,सारबेटे खु.एकरूखीव इतर गावांतील वीस पेक्षा जास्त शेतकऱ्यांनी वीस हजारांपेक्षा जास्त झाडे स्वत:च्या शेतात व बांधावर लावण्याचे नियोजन केले असून या कामाची सुरुवात करण्याची मुदत डिसेंबर अखेर पर्यंत असल्याने ही संख्या भविष्यात वाढू शकते. महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना ही केंद्र शासन व राज्य शासनाची महत्वाकांक्षी योजना असून या योजनेची अंमलबजावणी प्रभावीपणे करण्यासाठी स्वच्छ, पारदर्शक, गतिमान आणि लोकाभिमुख प्रशासकीय व्यवस्था उभी करणे गरजेचे आहे. अंमलबजावणी प्रभावीपणे करण्यासाठी लोकांचा व्यवस्थेवरचा विश्वास वृध्दींगत करणे गरजेचे आहे. त्यासाठी रोजचे मस्टर रोज काढणे गरजेचे आहे. वैयक्तिक व सामूहिक कामांचे कुशल व अकुशल देयके वेळच्या वेळी अदा करणे गरजेचे आहे. महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेची मोठया प्रमाणावर प्रचार प्रसिध्दी करणे. अमळनेर तालुक्यात महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेची प्रचार व प्रसिध्दी मोठया प्रमाणावर करण्यासाठी फेसबुक/थहरी अिॅया डिजिटल पद्धतीचा प्रभावीपणे वापर करण्यात आला. प्रशासना सोबतच नरेगामध्ये लोकसहभाग वाढविण्यासाठी मारवड विकास मंच,साने गुरूजी विकास मंच, दहिवड विकास मंच आणि पातोंडा विकास मंच यांसारख्या तरूणांच्या संघटनांनाही सहभागी करून घेतले आहे. पाणी फाउंडेशनची टीमही समृद्धीच्या अनुषंगाने सक्रियपणे मदत करत आहे. अमळनेर तालुका नरेगाच्या माध्यमातून समृद्धीच्या दिशेने वाटचाल करत आहे. सन २०१६-२०१७ मधील ४२००० मनुष्य दिवसांवरून २०१७-२०१८ मध्ये ६९००० मनुष्य दिवस २०१८-२०१९ मध्ये ९०००० हजार मनुष्य दिवस
२०१९-२० मध्ये ७२००० मनुष्य दिवस तर २०२०-२१ मध्ये ४०००० मनुष्य दिवस २०२१-२२ मध्ये २ लाख ३८ हजार मनुष्य दिवस एवढा टप्पा गाठला असून यावर्षी ११ लाख मनुष्य दिवस एवढा टप्पा पार होईल. अमळनेर पंचायत समितीत आज रोजी वैयक्तिक व सार्वजनिक कामाची कुठलाही प्रस्ताव प्रलंबित नाही. जळगाव जिल्ह्याचे जिल्हाधिकारी आदरणीय अभिजीत राऊत साहेब जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आदरणीय डॉ. बी .एन पाटील साहेब यांनी यासंदर्भात वेळोवेळी मार्गदर्शन केले असून सहकार्य केले आहे. अमळनेर तालुक्यातील नरेगाच्या कामाची शासन स्तरावरून दखल घेण्यात आली असून महाराष्ट्र राज्याचे अतिरिक्त मुख्य सचिव आदरणीय नंदकुमार साहेब यांनी अमळनेर तालुक्याचे कौतुक केले आहे.

अमळनेर तालुक्यात मागील एक वर्षापासून वृक्षसंवर्धनाची चळवळ जोमात सुरू असून यासाठी जिल्हा परिषदेचे तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी आदरणीय बी.एन.पाटील साहेब मुख्य कार्यकारी अधिकारी आदरणीय पंकज आशिया साहेब रोहयो चे नाशिक विभागाचे उपायुक्त आदरणीय अर्जुन चिखले साहेब रोहयो चे सहायक संचालक आदरणीय विजयकुमार कळवले साहेब यांचे मार्गदर्शन लाभत आहे. सिने अभिनेते आदरणीय सयाजी शिंदे सर यांची सह्याद्री देवराई संस्था व सरपंच परिषद महाराष्ट्र यांच्यां संयुक्त विद्यमाने स्वातंत्र्यांच्या ७५ व्या वर्धापन दिनानिमित्त मोठ्या प्रमाणावर वृक्षारोपण करण्याचे आवाहन केले आहे. महाराष्ट्रातील ग्रामपंचायती मध्ये मोठ्या प्रमाणावर गावठाण जागा, शासकीय जागा गावरान जागा सार्वजनिक संस्थांच्या जागा, स्मशानभूमीच्या जागा शाळा व अंगणवाड्यांच्या जागा रस्त्याच्या दुतर्फा असणाऱ्या जागा उपलब्ध आहेत परंतु या जागांवर मोठ्या प्रमाणावर अतिक्रमण होत आहे. तसेच शासकीय जमीनीवर अवैध मार्गाने गौण खनिज उत्खनन मोठ्या प्रमाणावर सुरू आहे. त्यामुळे महापूर व दरड कोसळण्याच्या घटनांमध्ये दिवसेंदिवस वाढ होत आहे. परिणामी मोठ्या प्रमाणावर जीवीत व वित्त हानी होत आहे. निसर्गाचे दृष्टचक्र थांबविण्यासाठी महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या माध्यमातून खूप मोठ्या प्रमाणावर वृक्षारोपण व वृक्षसंवर्धन करणे गरजेचे आहे. महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या माध्यमातून वृक्षरोपण व वृक्षसंवर्धन केल्यामुळे पर्यावरणाचा समतोल साधण्यासोबतच ग्रामीण भागात खूप मोठ्या प्रमाणावर रोजगार निर्मिती होणार आहे.

अमळनेर तालुक्यातील पंचायत समिती येथील चळवळ निरंतर सुरु असुन गट विकास अधिकारी श्री विशाल शिंदे व त्यांच्या टिमने २०२२–२३ या वर्षी महात्मा गांधी रोजगार हमीच्या माध्यमातुन मैत्री पॅटर्नच्या अंतर्गत ५५ हजार झाडे व लोकसमुहातुन ५००० झाडे मियावाकी पद्धतीने लावले आहेत. शासनाची महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण योजना ही केवळ कागदावरच न राहता ती लोकचळवळ झाली आहे आणि अमळनेर तालुक्यातील समाजाच्या संस्कृतीचा भाग झाली आहे म्हणुन अमळनेर तालुक्यातील वृक्षसंवर्धनाचा मैत्री (चरळीशश) (चरहरीरिहीीर+ढीशश) पॅटर्न महाराष्ट्राला भविष्यात दिशा दाखवणारा आहे.








प्रगती अभियान

# २६) पालकांना शेतीची आणि मुलांना शाळेची गोडी लावणारा खोमारपाड्याचे शिक्षक

**केशव आणि आनंद**

एक शिक्षक ज्याने स्वत:च्या शाळेतील मुलांची उपस्थिती वाढावी म्हणून शिक्षण विभागाच्या बालरक्षक चळवळीला प्रतिसाद दिला. मुलांचे स्थलांतर थांबावे यासाठी काम सुरू केले. पर्यायाने पालकांचे स्थलांतर थांबवणे क्रमप्राप्त होते. त्यासाठी या शिक्षकाने – बाबु चांगदेव मोरे, शाळा खोमारपाडा, विक्रमगड तालुका, पालघर – काय केले त्याची ही गोष्ट.

खोमारपाडा हे डोंगराच्या पायथ्याला असलेलं आणि जंगलाच्या नजिक वसलेलं गाव साधारण १५० घरांचं गाव. पावसाळ्यात इथं भरपूर पाऊस होतो. डोंगरावरून पाणी खाली येतं आणि वाहून जातं. भात हे इथले प्रमुख पीक. गावात सिंचनाची सुविधा नसल्यानं लोक फक्त पावसाळी शेती करायचे. एरवी मजुरीसाठी पालघर वा ठाणे जिल्ह्यातल्या वीट भट्ट्यावर कामाला जायचे. मोरे सरांनी पाहिलं की हंगामी स्थलांतर इथली नित्याची बाब आहे.

मूळचे बीड जिल्ह्याचे बाबु मोरे डिसेंबर २०१३ मध्ये शिक्षक म्हणून खोमारपाडा प्राथमिक शाळेत शिक्षक म्हणून रूजू झाले. तेव्हा त्यांना समजलं की इथे ९०%हून जास्त कुटुंबं रोजगारासाठी स्थलांतर करतात आणि त्यातले २०% पालक सोबत मुलांनाही नेतात. जेव्हा ही मुलं गावी परततात, तेव्हा ती अभ्यास विसरलेली असतात. त्यामुळे शाळेत येतात तेव्हा त्यांचे शिक्षण कच्चे राहते, ती मागे पडतात. एकट–पीक शेती हे इथल्या स्थलांतराचं मूळ कारण आहे आणि ते दूर होण्यासाठी गावकऱ्यांना गावातच काम मिळालं पाहिजे. या प्रश्नावर विचार करून त्यांनी मनात एक योजना आखली आणि ती पालकांना सांगायचं ठरवलं.

२०१६ मध्ये त्यांनी एक पालक सभा बोलावली. सर्वसाधारणपणे मुलांच्या शिक्षणाविषयी बोलण्यासाठी पालक सभा होतात, पण ही सभा मुलांच्या शैक्षणिक प्रगतीविषयी नव्हती, पालकांच्या आर्थिक परिस्थितीविषयी होती. बैठकीला ३५–४० पालक जमले होते. तुम्ही बाहेर कामाला जाता त्याऐवजी इथं काम मिळालं आणि तिकडे जेवढे पैसे मिळतात ते इथेच मिळाले तर मोरे सरांच्या या प्रश्नाने पालकांच्या चेहेऱ्यावर प्रश्नचिन्ह उमटले. तुम्ही मजुरीला बाहेरगावी जाता, सोबत मुलांनाही घेईन जाता. तिथे त्यांची आबाळ होते आणि शिक्षणही मागे पडतं, सर म्हणाले. पालकांना हे तर पटत होतं, पण त्यांच्याही पुढे दुसरा मार्ग नव्हता. सर्वांकडे लहान लहान जमिनी होत्या, पण गावात पाण्याची म्हणावी तशी सोय नाही. सरांनी त्यांना विश्वास दिला की गावातल्या गावात काम निघू शकेल आणि पाण्याची सोयही होऊ शकेल. रोजगार हमीतून जलसंधारणाची कामं करता येतील आणि उपलब्ध पाण्यावर गावात भाजीपाला पिकवता येईल. पालकांचा चटकन विश्वास बसेना. तरी अनिश्चेनं, सर सांगतायत म्हणून करून बघूया असं वाटून काहीजण तयार झाले.

मोरे सर हाडाचे शिक्षक होते. केवळ पुस्तकी शिक्षण त्यांना मान्य नव्हते. त्यांनी शाळेसमोरच्या अर्धा गुंठा पडीक जागेला आपली शेतीची प्रयोगशाळा बनवली. ही जमीन त्यांनी मुलांच्या मदतीने साफ केली. तिथं मेथी, पालक, टोमॅटो, कांदा, कोथिंबीर अशी लागवड त्यांना सोबत घेऊन केली. तयार होणाऱ्या भाज्या मुलांच्या माध्यान्न आहारात दिल्या. यांमुळे मुलांना ताज्या, पौष्टिक भाज्या मिळाल्या आणि पालकांनाही प्रेरणा मिळाली. या प्रात्यक्षिकातून मुलांना शेतीची अधिक माहिती झाली.

आपल्या शैक्षणिक कामासोबतच सुट्टी किंवा शाळेच्या व्यतिरिक्त वेळेत मोरेसर घरी वा शेतात जाऊन लोकांसोबत चर्चा करायचे. रोजगार सेवकाच्या आणि ग्रामपंचायतीच्या मदतीनं गावात एकेक कामं सुरू झाली. २०१३–१४ पासून गावात मनरेगाची महत्त्वाची कामं झाली. जलसंधारणासाठी चर खोदले; गावतळ्यातला गाळ काढला, ज्यामुळे वाहून जाणारं पाणी थांबू लागलं;

शेततळी तयार केली, ज्यामुळे पावसाळ्याखेरीज अन्य मोसमातील पिकांचं नियोजन शक्य झालं; नाल्याचं सरळीकरण करून पाण्याला वाट करून दिली, ज्यामुळे डोंगरावरून वाहात येणारे पाणी शेतात घुसायला अटकाव झाला व शेताचे नुकसान थांबले; जंगलात जाण्यासाठी वाट केली व जंगलात वनीकरण केलं ज्यामुळे वनसंवर्धन झालं आणि जाळरेषा आखल्या ज्यामुळे आगीपासून पिकांचा व झाडांचा बचाव शक्य झाला. भाजीपाला, आंबा व काजू सारखी फळे व फुलांची लागवड करायला लोकांना उद्युक्त केलं आणि त्यासाठी हरप्रकारे मदत व मार्गदर्शन केलं. याखेरीज गुरांसाठी गोठे आणि कंपोस्ट खताचे खड्डे यांसारख्या वैयक्तिक लाभाच्या योजनाही भरपूर प्रमाणात राबवल्या. या सगळ्या बदलांमुळे पावसाळ्याखेरीज शेती न करणारे खोमारपाड्याचे गावकरी आता दुसरे पीक घेऊ लागले. भाजीपाला, फळे, फुले यांमुळे उत्पन्नाचे नवे साधन त्यांना मिळाले. कालांतराने गावात दोन वीटभट्ट्याही सुरू झाल्या, ज्यामुळे भूमीहीन कुटुंबांना गावात काम मिळू शकलं.

गावात फळझाडेही लावलेली आहेत. त्यातून आंबा, आवळा, काजू, जांभूळ, सीताफळ, केळी, पपई याचे उत्पादन होते. अक्षरधारा फौंडेशनने या फळझाडांचे वाटप केले आहे. शेती, फळझाडांचे उत्पादन पूर्णतः सेंद्रीय पद्धतीने होते. त्यामुळे त्याला मागणीही आहे.

या प्रयत्नातून शेतकऱ्यांना करावं लागणारं सक्तीचं स्थलांतर कमी झाले. पाणी, वीज, जमीन आदी संसाधनांच्या मर्यादेमुळे अजून काही शेतकऱ्यांना कमाईसाठी बाहेर जावेच लागते आहे. ही समस्याही कालांतराने दूर होईल. एका शिक्षकाच्या दूरदर्शी आणि अथक प्रयत्नांनी मुलांना पुन्हा शाळेशी तर पालकांना शेतीशी जोडले!










# हजेरी पत्रक

दर दिवशी एकदा संगणकीय हजेरी पत्रकावर प्रत्येक मजुराची उपस्थिती नोंदवलेली असणे जरुरी आहे.



**MUSTER ROLL**

The Mahatma Gandhi National Rural Employment Guarantee Act
Mustroll Report

Govt. of India
Ministry of Rural Development
Department of Rural Development
06-May-2015
Back Home

| | | | |
|---|---|---|---|
| राज्य : महाराष्ट्र | जिल्हा : NASHIK | पंचायत समिती : TRIMBAKESHWAR | ग्राम पंचायत : AMBOLI |

हजेरीपट क्रमांक : 1518 | दिनांक पासून : 26/03/2015 दिनांक पर्यंत : 31/03/2015 | मंजुर क्रमांक : 67/15 मंजूरीचा दिनांक : 09/03/2015

कामाचा संकेतांक : 1806015021/WC/473379082 | कामाचे नाव : Dagadibandh Amboli(Shravan Dharma Lachake)PS

**Measurement Book Detail**

MB NO. 072588 Page NO. 1

**Mustroll Detail**

| अनुक्रमांक | नांव/रजिस्टर क्रमांक | Aadhaar No | जात | गाव | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | एकूण मजूर उपस्थिती | प्रतिदिन मजदूर (माप के अनुसार) | हजेरी वरुन देय असलेली रक्कम | प्रवास व राहण्याचा दर्जा | Implements / Sharpening Charge | अदा केलेली एकूण रक्कम | खाते क्रमांक | Postoffice/ Bank Name | Postoffice Code/ Branch name | Postoffice address/ Branch code | Wagelist No. | Status | Payment Date | सही/ अंगठा निशाणी | A/c Credited Date |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | मेंगाळ सोमनाथ सखाराम(Son) MH-06-015-021-001/335 | | OTHER | AMBOLI | P | P | P | | P | P | 5 | 151 | 755 | 0 | 0 | 755 | 31385793737 | STATE BANK OF INDIA | TRIMBAKESHWAR | SBIN0006292 | 1806015WL023798 | | 16/04/2015 | | |
| 2 | देवराम रामा गुंबाडे(Self) MH-06-015-021-001/235 | | OTHER | AMBOLI | P | P | P | P | P | P | 6 | 151 | 906 | 0 | 0 | 906 | 32556402916 | STATE BANK OF INDIA | TRIMBAKESHWAR | SBIN0006292 | 1806015WL023798 | | 16/04/2015 | | |
| 3 | नवळुबाई देवराम गुंबाडे(Wife) MH-06-015-021-001/235 | | OTHER | AMBOLI | P | P | P | P | P | P | 6 | 151 | 906 | 0 | 0 | 906 | 32556402916 | STATE BANK OF INDIA | TRIMBAKESHWAR | SBIN0006292 | 1806015WL023798 | | 16/04/2015 | | |
| 4 | चंद्रभागा [illegible] गुंबाडे(Self) MH-06-015-021-001/223 | | OTHER | AMBOLI | P | P | P | P | P | P | 6 | 151 | 906 | 0 | 0 | 906 | 32556402949 | STATE BANK OF INDIA | TRIMBAKESHWAR | SBIN0006292 | 1806015WL023798 | | 16/04/2015 | | |
| 5 | गणपत भाउ दांडेकर(Self) MH-06-015-021-001/221 | | OTHER | AMBOLI | | P | P | P | P | | 4 | 151 | 604 | 0 | 0 | 604 | 32556403205 | STATE BANK OF INDIA | TRIMBAKESHWAR | SBIN0006292 | 1806015WL023798 | | 16/04/2015 | | |
| 6 | मेंगाळ बाळू रामा(Son) MH-06-015-021-001/336 | | OTHER | AMBOLI | P | | P | P | P | P | 5 | [illegible] | 755 | 0 | 0 | 755 | 32870553615 | STATE BANK OF INDIA | TRIMBAKESHWAR | SBIN0006292 | 1806015WL023798 | | 16/04/2015 | | |
| 7 | मेंगाळ कैलास हरी(Son) MH-06-015-021-001/334 | 26984592XXXX | ST | AMBOLI | P | P | P | P | P | P | 6 | 151 | [illegible] | 0 | [illegible] | 906 | 32870553637 | STATE BANK OF INDIA | TRIMBAKESHWAR | SBIN0006292 | 1806015WL023798 | | 16/04/2015 | | |
| 8 | पार्वताबाई एकनाथ गुंबाडे(Wife) MH-06-015-021-001/196 | | ST | AMBOLI | P | P | | P | P | P | 5 | 151 | 755 | 0 | [illegible] | [illegible] | [illegible]870553706 | STATE BANK OF INDIA | TRIMBAKESHWAR | SBIN0006292 | 1806015WL023798 | | 16/04/2015 | | |
| 9 | बोंबले गिताबाई भाऊराव(Self) MH-06-015-021-001/256 | | OTHER | AMBOLI | P | P | P | | P | P | 5 | 151 | 755 | 0 | 0 | 755 | 3287[illegible] | [illegible] | TRIMBAKESHWAR | SBIN0006292 | 1806015WL023798 | | 16/04/2015 | | |
| 10 | बोंबले भाऊराव विठोबा(Husband) MH-06-015-021-001/256 | | OTHER | AMBOLI | P | P | P | P | P | | 5 | 151 | 755 | 0 | 0 | 755 | 32870553842 | [illegible] | [illegible] | SBIN0006292 | 1806015WL023798 | | 16/04/2015 | | |
| | | | | दररोजची हजेरी | 9 | 9 | 9 | 8 | 10 | 8 | | | | | | | | | | | | | | | |

| वर्गवारी अदा केलेली रक्कम(In Rs.) | |
|---|---|
| अदा केलेली रक्कम अनुसूचित जाती | 0 |
| अदा केलेली रक्कम अनुसूचित जमाती | 1661 |
| अदा केलेली रक्कम दुसरा | 6342 |

हजेरी घणाऱ्याची सही

तपासणी करणाऱ्याची स्वाक्षरी

| अदा केलेली एकूण रक्कम(In Rs.) | |
|---|---|
| नगदी | 8003 |
| प्रति मजूर | 800.3 |

एकूण मनुष्य दिवस : 53

# मजूरी वाटप

**आपण केलेल्या कामाची मजुरी दर पंधरा (१५) दिवसांनी मिळणे कायद्याने बंधनकारक आहे.**






- नरेगाच्या कामाचा मजुरी बँकेतच जमा होते.
- तो स्वत:च काढण्यास जावे.
- महिला व पुरुषांना समान वेतन आहे.
- आपल्या गावात बँक मित्र येत असेल तर तेही बँकेचे व्यवहार करू शकतात.
- नरेगाचे खाते 0 बॅलन्स वर काढता येते.
- बँकेच्या नियमानुसार ६ महिन्यात पैशांची देवाण घेवाण झाली नसल्यास खाते आपोआप निशक्रीय होते. त्यामुळे अधून मधून बँकेचे आर्थिक व्यवहार करुन खाते सक्रिय ठेवावे.



**आपले जवळचे पोस्ट आता आपली जवळची बँक झाली आहे पोस्टमन म्हणजे बँकच, ते बँक मित्रही आहेत. त्यांच्याकडे आपले खाते उघडावे.**

प्रगती अभियान

# कोणकोणती कामे गावात होऊ शकतात ?

## सार्वजनिक कामे

१) वनतळे
२) वृक्षलागवड
३) माती नालाबांध
४) गावतलाव
५) ग्रामपंचायतसाठी विहिर
६) रस्ता
७) वृक्षरोपणाचे खड्डे खोदणे
८) जंगलातील जाळरेषा
९) क्रीडांगण
१०) भुमीगत बंधारे
११) जलाशयातील गाळ काढणे
१२) कालव्यांचे नुतनीकरण
१३) पडिक (गायरान) जमिनीवर वृक्ष लागवड
१४) वैरण विकास योजना
१५) रोपवाटीका
१६) रस्त्याच्या दुतर्फा वृक्ष लागवड
१७) वृक्ष संगोपन
१८) सलग समतल चर
१९) वनबंधारे
२०) गेबीयन बंधारा
२१) पाणंद रस्ता
२२) इतर...



# व्यक्तीगत लाभाच्या योजना

## वैयक्तिक कामे

१) सिंचन विहिर
२) रोपवाटीका
३) शोषखड्डा
४) फळबाग
५) व्हर्मी कंपोस्टिंग
६) शेततळे
७) नाडेप कंपोस्टिंग
८) शौचालय
९) वृक्ष लागवड
१०) बांधदुरुस्ती (भातखाचरं)
११) दगडींबांध
१२) घरकुल
१३) सिसिटी
१४) गोठा
१५) कुकुटपालन शेड
१६) सपाटीकरण
१७) परस बाग
१८) इतर...



# ग्रामरोजगार सेवक

**ग्रामरोजगार सेवक**

- प्रत्येक ग्रामपंचायतीत ग्रामसेवकांना सहाय्यक
- ग्रामरोजागरसेवक हा गावतलाच सदस्य असतो. त्याची निवड करणे व पदमुक्त करणे हे दोन्ही अधिकार ग्रामसभेलाच असतात.
- शासन व मजुर याच्यातील सह्हायक म्हणुन त्याची नियुक्ती असते.
- प्रशासन व मजुर यांच्यातील दुवा म्हणुन काम करतो.
- गट ग्राम पंचायत असेल तर प्रत्येक गावात एक ग्राम रोजगार सेवक असु शकतो.

**ग्रामरोजगार सेवकाची कामे**

- जॉबकार्ड बनवणे.
- नरेगाचे जॉबकार्ड मधील नोंदी पूर्नकरणे.
- काम मागणी अर्ज भरुन घेणे.
- मजुरांची बँक खाती उघडुन देण्यास मदत करणे.
- हजेरी पत्रक भरणे.
- कामाच्या ठिकाणी सुविधा पुरविणे.
- रोजगार दिवस भरविणे.
- मजुरांची नोंद ठेवणे इ–मस्टर नोंदणी करणे.
- गावातील नरेगाच्या कामाच्या नियोजनात मदत करणे.
- ग्राम सभेत नरेगाचा विषय मांडणे.

# कामांचे नियोजन

गावात सर्व गावकऱ्यांनी शिवार फेरी करून, आपल्याकडील नैसर्गिक संसाधनांची नोंद करावी. पाणी, माती, वृक्ष, जंगल यांचे संरक्षण व संवर्धन होण्यासाठी कामांची निवड करावी.

गावातील ज्या कुटूंबांना नरेगाच्या कामावर मजुरी करायची आहे त्यांची यादी करून, त्यांना वर्षभरात केव्हा, कोणकोणत्या महिन्यात आणि किती दिवस काम हवे आहे याची सविस्तर नोंद करणे.

गावात शक्य असलेल्या आणि आवश्यक असलेल्या सार्वजनिक कामे व वैयक्तिक लाभाची कामे याची नोंद करावी.

हे सर्व ग्राम सभेत मंजुर करून ठराव करावा.

रोजगार हमी योजना गावातील प्रत्येकाच्या हाताला काम देते. रोजगार मिळणे हा आपला हक्क आहे.

आपल्या गावातच राहून, काम करुन मजुरी मिळवता येते. गावातील कितीही मजुरांना, कितीही दिवस काम मिळू शकते. दिवसभर भरपूर कष्ट केले तर किमान २३८ रुपये मजुरी मिळू शकते. असे अंगमेहनतीचे काम करुन आपल्याच गावासाठी तलाव, शेततळे, बांध, विहीर, सपाटीकरण, सलग समतल चर, रस्ते अशी विविध कामे करता येतात.

या योजनेमुळे आपल्या गावाचे दोन फायदे आहेत. गावातल्या गावात रोजगार आणि कामांमधून पाणी अडविण्यासाठी, जिरण्यासाठी व साठविण्यासाठीच्या साधनांची निर्मिती, यामुळे आपल्या शेतीचा आणि गावाचा विकास नक्कीच होऊ शकतो.या योजनेसाठी निधीची मर्यादा नाही.

या पुस्तिकेत या योजनेची थोडक्यात माहिती दिली आहे. याचा गावातील तरुण, ग्रामपंचायत सदस्य व सरपंच, ग्रामसेवक व सर्वच ग्रामस्थांनी गावाच्या विकासासाठी जरूर उपयोग करावा.

या बाबतीत काही अधिक माहिती हवी असल्यास *'प्रगती अभियानशी'* संपर्क साधा. आपल्याशी संवाद करण्यास आम्ही उत्सुक आहोत.

# नरेगातील अधिकार


- जॉब कार्ड मिळण्याचा अधिकार.
- काम मागणी करण्याचा आणि पंधरा दिवसात मिळण्याचा हक्क.
- बेरोजगार भत्ता मिळण्याचा अधिकार.
- योजेनचे नियोजन करण्याचा आणि नियोजनामध्ये सहभागी होण्याचा हक्क.
- ग्रामपंचायतीच्या ५ किमी हद्दीत काम मिळवण्याचा हक्क.
- कामाच्या ठिकाणी सोयी सुविधा मिळण्याचे हक्क.
- दर पत्रकानुसार मोजमाप घेवुन, १५ दिवसात मजुरी मिळण्याचा हक्क.
- मजुरी वेळेत न भेटल्यास विलंब भत्ता मिळण्याचा हक्क.
- वेळेत तक्रार निवारण होण्याचा हक्क.
- सामाजिक अंकेक्षणात समावेश होण्याचा हक्क व झालेल्या खर्चाची माहिती मिळवण्याचा हक्क.


हेल्पलाईन नंबर 1800223839



प्रगती अभियान

समतल चर खोदणे हे काम डोंगर उताराला केले जाते, डोंगर माथ्यापासुन ते पाया माथापर्यंत हे चार एक बाय एक मिटरच्या अंतरावर केले जातात. पाणी अडवणे, जिरवणे हे मुख्य काम ह्या चर खोदाईमुळे केले जाते. यामुळे जेथे मोठ्या प्रमाणात हे चर खोदायचे कामे होतात, त्या परिसरातील जमीन ओली राहते, शिवाय झिरपलेली पाणी विहीर किंवा शेततळ्याला मिळते. पाणी सिचंनाचे महत्वाचे संसाधन आहे.




































सोशल ऑडीट, सुरगाणा, धुळे, नंदूरबार





राज्य सचिवांची महाराष्ट्रातील संस्था सोबत एकदिवसीय बैठक नाशिक येथे




मुंबई, मंत्रालय येथे सोशल कन्सल्टेशन मिटींग




जिल्हास्तरीय मनरेगाची प्रशिक्षणे, ग्रामसेवक रोजगार सेवक




रोहोयो कलेक्टर सचिव यांच्या हस्ते रस्ता कामाची सुरवात







लोकमत

# जुनोना तलावामुळे परिसरातील १९ मासेमारांना मिळाला रोजगार

शेतीही आली ओलिताखाली : गाळ साफ व कालव्याचीही केली दुरुस्ती






मनरेगा अंतर्गत पाझर तलावातील गाळ काढणे ही कामे मुबलक प्रमाणात पाणीसाठवण आणी मजुरांसाठी जास्त दिवसाचे काम उपलब्ध करुन देणारे काम आहे. पावसाळ्यातील पाणी साठवनुकितुन पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सुटुनकायमस्वरुपी  उत्पन्नाचे स्त्रोत निर्माण करणारे मोठे संसाधन आहे. या कामात जास्त मजुरांना काम मिळतात. मजुरीही चांगली मिळते पाणी सिंचन होवुन लोक दोन पिके घेतात. मासेमारी सारख्या व्यवसायाला पाठबळ मिळते. जास्त शेती ओलिताखाली येते. म्हणुन अशी ही गाळ काढण्याची कामे प्रत्येक गावाने नियमित आणी प्राधान्याने करावी.












## दगडीबांध

ही कामे शेतकऱ्यांच्या शेतात, सार्वजनिक ठिकाणी गावकीच्या जागेमध्ये डोगंराच्या आजुबाजुला अशी करता येण शक्य आहे. दगडीबांधांमुळे डोंगर माथ्यावरील पावसाचे पाणी पळत जोरात वाहत जाणारे पाणी थांबत जाते. त्यामुळे जमिनीचा सुपिक थर टिकुन धुप कमी होते. माती वाहुन जात नाही. आणी शेतीला पाणी मिळुन फायदा होतो.चैन साखळी दगडीबांध केले आणी खालील बाजुस जर शेततळ्यासारखे काम केले तर पाणी सिंचन मोठ्या प्रमाणात होते. एक दगडीबंधावर ६,७ मजुर काम करुन २७५/–पर्यत मजुरी पडुन एक हप्ता काम करु शकतात.









## रस्ते – गांव विकासाची हृदय वाहिनी आहे

नरेगातून गावअंतर्गत रस्ते शिवार, रस्ते स्मशानभूमीकडे जाणारे रस्ते, पाणवठ्याकडे जाणारे रस्ते. गावातील महत्वाचे संसाधन ज्यात जास्तीत जास्त मजूरांना काम मिळते. मजुरीही चांगली मिळते. गावाची नितांत गरजेचे साधन आहे.




















## वृक्षलागवड

गाव शिवार  आणी गावचे डोगंर हिरवे करणे, पडलेला पाउस धरुन ठेवणे, गावातील पडित जमिनिला हिरवे करुन जंगल वाढविणे, जनावरांना चारा उपलब्ध होणे, आणी शेतक-यांचे  उत्पन्न वाढविण्यास हातभार लावणे हे काम वृक्षलागवडीतुन होते आहे. अति महत्वाचे आणी मजुरांना निरंतर काम मिळवुन देणारे काम आहे. वृक्षाच्या वाढीच्या टप्यावर मजुरांना यातुन लाभ मिळतो त्यामुळे तो दीर्घकाळ मजुरी उपलब्ध करुन देतो. म्हणुन गावासाठी व लोकांसाठी महत्वाचे काम आहे. पर्यावरणाचे संवर्धन होते. पशुधन विकास











## शेततळे विहीर

अल्पभुधारक शेतकऱ्याला जगण्याचे बळ देण्यासाठी, पुरक व्यवसाया साठी आणी खरीपासोबत रब्बीसारखे पिकाला पाणी मिळावे या सोयीसाठी शेततळे, विहीर हे उत्तम संसाधन आहे. गरीबीतुन नक्कीच शेतकरी बाहेर पडु शकतो. इतके महत्वाचे संसाधन हे आहे पाणी साठवुन ठेवणे हे एकमेव काम शेततळ्यामुळे विहीरीमुळे होते. जगंल भागातील वनतेळे च्या देखिल जगंलप्राणीना पिण्याच्या पाण्याची सोय यामुळे होते. गाविवहीरीमुळे गावतल्या बाईच्या डोक्यावरील हंडे खांद्यावर येवुन कोसो मैलाची पायमिट आणी वेळेची बचत होवुन तीला रात्रीची शांत झोप मिळु शकते.

# प्रगती अभियानचे इतर प्रकाशने



















